शान्त और नीरस जल–जीवन में सहसा बम–विस्फोट हुआ। समाचार मिला कि रैमजे मैक्डोनैल्ड ने अपने सांप्रदायिक निर्णय में दलित जातियों को पृथक निर्वाचन का जो अधिकार दिया है उसके विरोध में गांधीजी ने आमरण अनशन करने का निश्चय किया है।''8 गांधी जी का मानना था कि **''पृथक निर्वाचन मंडल का सबसे बड़ा खतरा यह है कि यह 'अछूतों' को हमेशा अछूत बने रहने की बात सुनिश्चित करता है।''9** गांधीजी का मानना था कि दलितों की स्थिति में बदलाव समाज में सुधार के माध्यम से ही लाया जा सकता है। इस कानून के विरोध में गांधीजी 10 सितम्बर 1932 ई0 को आमरण अनशन पर बैठ गये। देशभर में 20 सितम्बर का दिन उपवास दिवस के रूप में मनाया गया और देश के मंदिर, कुएं आदि स्थल दलितों के लिए खोल दिये गये। दलित समाज के प्रमुख नेता के रूप में अम्बेडकर जी ने इस प्रस्ताव का स्वागत किया था। वह इसे दलितों के उद्धार से जोड़ रहे थे। उन्हें ना चाहते हुए भी **''मानवता के नाम पर गांधी जी की जान को बचाने के लिये, उनके स्वार्थपूर्ण हठ को मानकर, अछूतों को दिये गये दो वोटों के स्थान पर 'पूना पैक्ट' को मान लिया।''10** 26 सितम्बर 1932 ई. को महात्मा गांधी और भीमराव अम्बेडकर जी के बीच पूना पैक्ट हुआ। जिसमें पृथक निर्वाचन मण्डल समाप्त कर दिया गया परन्तु प्रान्तीय विधानमण्डलों में दलितों की सीटों की संख्या 71 से बढ़ाकर 147 स्वीकार कर ली गई। इस प्रकार अंग्रेजी सरकार द्वारा चलाया गया षड्यंत्र असफल हो गया। अब महात्मा गांधी ने अपने लक्ष्यों को थोड़ा परिवर्तित करते हुए दलितों को समाज में सम्मान दिलाने की मुहिम की ओर मोड़ दिया। भारत की आजादी की लड़ाई में सभी वर्गों की आवश्यकता थी। गांधी जी इसे समझते थे। इसलिए उन्होंने दलितों के मुद्दों को उठाना प्रारम्भ किया। महात्मा गांधी ने दलितों को **'हरिजन'** नाम दिया। गांधीजी के अनुसार वे उन्हें हरि की सन्तान मानते थे। यह नाम विवादित हो गया जिसके पीछे यह कारण था – दक्षिण भारत के मन्दिरों में देवदासियों के जो पुत्र उत्पन्न होते थें उन्हें हरिजन कहा जाता था। अतः इस नाम का विरोध भीमराव अम्बेडकर, दादासाहेब गायकवाड़ आदि लोगों ने किया। यह नाम समाज में प्रचलन में रहा। गांधीजी ने अपने भाषणों, अनशनों तथा विचारों के माध्यम से लोगों की भावनाओं को बदलने का प्रयास किया। महात्मा गांधी ने 19 फरवरी 1933 ई0 में 'हरिजन' साप्ताहिक पत्र का प्रकाशन आरम्भ किया। डॉ. अम्बेडकर से भी उनके विचारों को इस पत्र में रखने की मांग की। अम्बेडकर ने अपने विचार हिन्दू समाज के लिये कुछ इस प्रकार रखे – **''अछूत लोग जाति व्यवस्था की उपज है। जब तक जातियां है तब तक अछूत भी रहेंगे। जाति प्रथा समाप्त हुए बिना अछूतों की मुक्ति संभव नहीं है। हिन्दू धर्म में जब तक इस घृणित और पापपूर्ण सिद्धान्त का उन्मूलन नहीं किया जाता तब तक आने वाले संघर्ष में हिन्दुओं को कोई चीज बचा नहीं सकती और यह धर्म जिंदा नहीं रह सकता।''11** 13 सितम्बर 1933 ई0 को 'हरिजन सेवक संघ' का निर्माण किया गया और घनश्याम दास बिरला इसके प्रथम अध्यक्ष बनाये गये। हरिजन सेवक संघ ने भारत में हरिजन छात्र–छात्राओं के लिए विद्यालय बनवाये। हरिजन बस्तियों में कुएं खुदवाये, होटलों और धर्मशालाओं आदि का निर्माण किया गया। स्वतन्त्रता के बाद भी भारत में सामाजिक सुधार की प्रक्रिया चलती रही क्योंकि समाज में लोगों की सोच को किसी नियम या कानून के द्वारा एक दिन में बदला नहीं जा सकता है। अतः हम कह सकते हैं कि सिर्फ कानून बना देने से किसी समस्या का सम्पूर्ण समाधान नहीं हो जाता है। समाज में लोगों की सोच को बदलना आवश्यक होता है। अतः हम 19वीं और 20वीं शताब्दियों में हुए सामाजिक सुधारों को भारतीय समाज में एक नई और सकारात्मक पहल मानकर नवीन भारत के निर्माण में उन महापुरुषों के योगदान को नमन करते हैं जिन्होंने अपना सम्पूर्ण जीवन देश और समाज के उत्थान पर अर्पित कर दिया।

संदर्भ ग्रंथ सूची

1. प्रकाश, ओम : प्राचीन भारत का सामाजिक एवं आर्थिक इतिहास (पंचम संस्करण), पृ0 सं0 180
2. तिवारी, विवेकानन्द : अछूत मतवाद के सच गांधी और अम्बेडकर, सस्ता साहित्य मण्डल प्रकाशन, नई दिल्ली, 2019, पृ0 सं0 70
3. बंधोपाध्याय, शेखर ; अनुवाद नरेश 'नदीम' : प्लासी से विभाजन तक, ओरियंट लांग्मैन, हैदराबाद, 2007, पृ0 सं0 381
4. तिवारी, विवेकानन्द : अछूत मतवाद के सच : गांधी और अम्बेडकर, पृ0 सं0 129
5. शर्मा, रामविलास ; गांधी; अम्बेडकर : लोहिया और भारतीय इतिहास की समस्याएँ, वाणी प्रकाशन, नयी दिल्ली, 2017, पृ0 सं0 382 उन्नीसवीं व बीसवीं शताब्दी में सामाजिक सुधार132
6. गांधी, महात्मा : हमारा कलंक, सस्ता साहित्य मण्डल प्रकाशन, नई दिल्ली, 2019, पृ0 सं0 20
7. विश्वनाथ ई.डी. ; माथुर नीना (अनु0): क्या मैं हिन्दू हूँ ? रूपा एंड कम्पनी, इलाहाबाद, 2004, पृ0 सं0 248
8. नेहरू, जवाहरलाल : राष्ट्रपिता, सस्ता साहित्य मण्डल प्रकाश, नई दिल्ली, 2019, पृ0 सं0 86
9. चन्द, बिपिन : भारत का स्वतन्त्रता संघर्ष, हिन्दी माध्यम कार्यान्वयन निदेशालय, पृ0 सं0 178
10. शास्त्री, शंकरानन्द : युगपुरूष बाबासाहेब डॉ0 भीमराव अम्बेडकर जीवन–संघर्ष एवं राष्ट्र सेवाएँ, सिद्धार्थ बुक्स, दिल्ली, 2009, पृ0 सं0 125
11. मंत्री, गणेश : गांधी और अम्बेडकर, प्रभात प्रकाशन, दिल्ली, 2018, पृ0 सं0 208

ग्रामीण परिसरात राहण्याचा अनुभव व अपरिहार्यता : वास्तविक दृष्टिकोन

प्रा. डॉ. रवींद्र बापूराव शेंडे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

लोकमान्य महाविद्यालय, वरोरा जिल्हा-चंद्रपूर 442907.

गोषवारा

भारतीय शेती किमान परवडत असताना किंवा पुढे उत्पन्न मिळेल व इतर कारणामुळे शेतकरी शेती धरसोड न करता कायम करीत असलेले पाहायला मिळतात. श्रीमंतीची कुठलीच लालसा नाही व श्रमाची कुठलीही लाज न बाळगता प्रखर मानसिकतेने भारतीय शेतकरी शेती करीत आहे व शेतीसोबत काही जोडधंदे करून आनंदाने जीवन जगत आहे. हरित क्रांतीच्या प्रयोगापासून शेतीत वैज्ञानिकांचा व शासनाचा हस्तक्षेप वाढला आहे व शेतीत जो नैसर्गिक आनंद होता तो हरवलेला पाहायला मिळतो. रासायनिक खते ,औषधी व फवारणी यांचा वापर करतेवेळी शेतक़ऱ्यांचे नुकसान होत आहे. तसेच निर्माण झालेल्या वस्तू पासून मनुष्याचे आरोग्य तसेच जमिनीचेही आरोग्य धोक्यात आले आहेत. शेतीत परतावा अधिक मिळेल या आशेपोटी संपूर्ण जीवन शेतकरी शेतीत घालवतो व आनंदाने जीवन जगत असतो.स्थानिक परिसरासोबत जुळवून तो आपला आनंद मिळवत असतो. अशा सर्व अडचणीत शेतक़ऱ्यांनी बऱ्याचश्या सुधारणा केल्यास उदा. पिकांच्या नोंदी ठेवून उत्पन्नात वाढ करणे, अंधश्रद्धेला थारा देऊ नये, कमी खर्चिक विम्यावर भर, ताण कमी व उत्पन्न - आनंदाची हमी, शेतीतील अलिखित पेटेंट याचा वापर नैसर्गिक प्रवृत्तीने वापरल्यास शहराच्या तुलनेत ग्रामस्थांचा आनंद मोठा होईल व आजही मोजक्या बाबी सोडल्या तर शहरी जीवनापेक्षा ग्रामीण जीवन हे आनंदी आहे. कारण पुढच्या पिढ्यांना काय चांगलं देता येईल. याचा विचार ग्रामस्थ प्रत्येक वेळी करताना पाहायला मिळतात.

प्रस्तावना

शाश्वत विकास करण्याची प्रचंड क्षमता खेड्यात आहे. नैसर्गिक साधनांचा चांगला वापर करून पुढच्या पिढीला ती साधने चांगल्या स्थितीत हस्तांतरण करण्याची कला ग्रामस्थांना होती. जुने ग्रामीण कौशल्य त्याचे उत्तम उदाहरण म्हणून सांगता येते. पुढे हरितक्रांती मार्फत शासनाचा आणि वैज्ञानिकांचा हस्तक्षेप शेतीत मोठा वाढला. त्यामुळे उत्पादन वाढले, परंतु नैसर्गिक साधन संपत्तीचे फार प्रचंड नुकसान झालेले पाहायला मिळते.शेतीत नवीन बियाने वापरून उत्पादनासाठी रासायनिक खतांचा वापर अतोनात वाढला. त्यामुळे जमिनीची सुपीकता नष्ट होत आहे. हरितक्रांतीपूर्वी अन्नधान्याची टंचाई होती, परंतु येणाऱ्या पिढ्या कशा आरोग्य संपन्न राहिली याचा विचार होत होता. अडाण्यातील- अडाणी व्यक्तीला शेतीत सामावून घेतल्या जात होते. कुठलाही ताण न वाढवता, एकमेकांना संकट व सामान्य परिस्थितीत मदत करून जीवन आनंदाने जगत होते. करमणुकीची साधने संयुक्त परिवार होता तसेच गाव होते. पुढे हरित क्रांतीमार्फत ग्रामीण उत्पादनात बदल झाला व दळणवळण-वाहतूकीमुळे म्हणजे पायाभूत सुविधांमुळे प्रत्येकजण शहराच्या संपर्कात येत असल्यामुळे व शहरे विकसित देशाच्या संपर्कात आले असल्यामुळे प्रदर्शन प्रभाव मोठा वाढला आहे. त्यामुळे भारताचे शहरी जीवन कृत्रिम पद्धतीने आनंददायी बनत जात आहे,आर्थिक तणाव वाढत आहे.त्याचा परिणाम ग्रामीण जीवनावर झाला. परंतु सर्व बाबी लक्षात घेतल्यास ग्रामीण परिसरात जी जुनी समृद्धता होती. काटकर करण्याची जी सवय होती, ती नव्याने पुन्हा वाढविल्यास शहरांच्या तुलनेत ग्रामीण जीवन अतिसुंदर आहे. आनंदाचा किंवा समृद्धपणाचा हा तुटलेला धागा ,ग्रामीण रोजगार व कौशल्यमार्फत जोडने अपरिहार्य आहे.

बीज शब्द - सांस्कृतिक पर्यावरण, शाश्वत विकास, नैसर्गिक साधन ,पशुधन, प्रदर्शन प्रभाव

विषय निवडण्यामागचे कारण-

शहरात जीवघेणी गर्दी वाढत चाललेली आहे. नागरिकांचा श्वास गुदमरत आहे. त्या तुलनेत ग्रामीण परिसरात मोकळी हवा घेता येईल असे वातावरण आजही बऱ्याच प्रमाणात आहे. सांस्कृतिक, जैविक व अजैविक पर्यावरण फळे, फुले, हवा मोठ्या प्रमाणात शहराच्या तुलनेत उपलब्ध करून देत आहेत. परंतु प्रत्येक जनगणनेत ग्रामीण लोकसंख्या कमी कमी होत आहे. ती रोखण्यासाठी व शाश्वत विकास वाढविण्यासाठी तसेच ग्रामीण परिसरात वास्तव्य करणारी लोकसंख्या कशी वाढेल? या वास्तविक दृष्टिकोनातून हा विषय निवडण्यात आला आहे.

पूर्व साहित्याचा आढावा

1.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज"- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या **ग्रामगीता** या ग्रंथातून कृषी व्यवस्थापन, प्रथा-परंपरा, सण- उत्सव, स्वच्छता, स्त्री- पुरुष समानता याबाबत मूलभूत विचार मांडले. नवभारताच्या निर्मितीत ग्रामीण अर्थव्यवस्थेची योगदान मोठे आहे. यावर मुख्य भर दिला.ग्रामगीता ग्रामनाथाला अर्पण करणारे ते पहिलेच होते.

2.सुरेश मात्रे आणि सुरेश घाटे-

यांनी आपल्या **शेतकरी संघटना कार्यपद्धती : शरद जोशी** या पुस्तकात शेतकऱ्यांना दरवर्षी भेडसाविणाऱ्या उलट्यापट्टीच्या समस्येचा उल्लेख केला.उलटीपट्टी म्हणजे शेतकऱ्यांनी दलालामार्फत शेतमाल किंवा भाजीपाला विकल्यावर मिळणाऱ्या हिशोबाच्या पट्टीत दलाली, हमाली व इतर खर्च वजा जाता काहीच उत्पन्न न उरता उलट शेतकऱ्यांवरच देणी येतात. या उलट्या पट्टीतून वाचण्यासाठी व रास्त भावासाठी शेतकऱ्यांनी एकत्र येणे गरजेचे आहे.हे मुख्य मत या पुस्तकात मांडले.

व्याप्ती व मर्यादा- या शोधनिबंधात निवडक प्रवाहंचा आढावा घेण्यात आला आहे. शक्यतो अद्यापत माहितीचा आधार घेण्यात आहे. ही या संशोधनाची व्याप्तीी व मर्यादा आहे.

संशोधन पद्धती- या शोधनिबंधासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करताना घटक विश्लेषण या पद्धतीचा वापर केला आहे. तथ्य संकलनासाठी प्रामुख्याने दुय्यम सामग्रीचा वापर केला.

शोधनिबंधाची उद्दिष्टे.

1. ग्रामीण परिसरात राहण्याचा आनंद आजही मोठा आहे.या संदर्भातील विविध घटनांचा अभ्यास करणे.
2. सांस्कृतिक पर्यावरण व ग्रामीण जीवन यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.
3. ग्रामीण परिसरातील लघु आणि कुटीर उद्योगधंदे, शेती, शेतमजूर व ग्रामीण जीवन यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.
4. ग्रामीण परिसर व सहकारी पतसंस्था, नाबार्ड, केंद्रीय बँक, राज्य सहकारी बँक याचा अभ्यास करणे.

शोधनिबंधाची गृहीतक

1.शहरी परिसराच्या तुलनेत ग्रामीण जीवन शाश्वत विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे.

विषयाचे विश्लेषण

कृषी प्रधान असलेल्या आपल्या देशात शेती हा भविष्यातही अर्थव्यवस्थेच्या कणा असणार आहे. शेती आणि शेतमजूर यांचा जवळचा संबंध आहे. उद्योग व सेवा क्षेत्रात उच्च कौशल्य असणाऱ्या लोकांना सामावून घेण्याची शक्ती आहे. परंतु शेती क्षेत्रात उच्च कौशल्य व्यक्तीसोबत सामान्य व्यक्तीलाही सामावून घेण्याची प्रचंड शक्ती सुरुवातीपासून

ते भविष्यातही आहे. उदा.शेतीत वैज्ञानिकासोबतच अडाण्यातील -अडाणी व्यक्तीला सुद्धा काम मिळत असते. कधी ना कधी आपले भले होईल या आशेपोटी शेतमजूर शेतात काम करतात. अनेक प्रकारच्या अनिश्चितता, नैसर्गिक आपत्ती, शासनाची वेगवेगळी धोरणे, स्वतःमधील क्षमता सांभाळत, स्त्री व पुरुष शेतमजूर आनंदाने जीवन जगत आहे.सहकार्य वृत्ती या क्षेत्रात प्रचंड मोठी आहे.शेती क्षेत्रातील प्रत्येकजण संपन्न झाला पाहिजे, जगला पाहिजे, यासाठी प्रत्येकजण देवाकडे प्रार्थना करीत असले तरी शेतक़्यांच्या मालाला मोबदला देत असताना मात्र व्यापारी, शासन, ग्राहक आणि विकसित देश सुद्धा, आंतरराष्ट्रीय संस्था सुद्धा किफायतशीर मोबदला देण्यासाठी कूचकरतो. शेती क्षेत्रातील किमतीतील बदल किंमत स्थिरता निर्माण करण्यासाठी आणि टिकवण्यासाठी अनुकूल आहे.महागाईचा प्रश्न मिटवण्यासाठी शेती क्षेत्रातील वस्तूंच्या किमतीतील बदलांचा आधार महत्त्वाचा आहे.या क्षेत्राची ताकद मोठी आहे. हे करोणा आपत्तीमध्ये सुद्धा सर्वांना माहीत पडले आहे. या असंघटित क्षेत्रातील, शेतकरी व शेतमजूर या क्षेत्राला पूर्ण बदलविणार की इतर सर्व क्षेत्राची मदत घेत बदल घडविणार किंवा नेमकी कोणती परिस्थिती या क्षेत्राच्या प्रगतीबाबत मदत करणार याचा संकल्प आणि प्रयत्न प्रत्येक भारतीय नागरिकांनी करणे अत्यावश्यक झाले आहे. परंतु ग्रामीण परिसरात राहण्याचा अनुभव आनंददायी आहे व अपरिहार्य आहे. विषयाच्या विश्लेषणात विषयाच्या अनुषंगाने आढावा लक्षात घेण्यात आला आहे.

1.ग्रामीण परिसरात राहण्याचा आनंद

मर्यादित साधनात आपल्या गरजा कशा पूर्ण करायच्या यावर ग्रामस्थ भर देतात. कारण शेतक़्यांच्या हातात पैसा रोजचा येत नाही, तर वर्षातून फार कमी वेळा किंवा शेतमाल विकल्यावर पैसा येतो. पैसा वर्षभर किंवा पुढील उत्पन्न मिळेपर्यंत सांभाळायचा असल्यामुळे पैशाचा वापर बऱ्याच अंशी चांगल्या पद्धतीने करावा लागतो. काटकसर हा स्थायीभाव ग्रामीण परिसरात जुनाच आहे.मुलांचे शिक्षण, शेती खर्च, काही किरकोळ कामे हे महत्त्वाचे कामे आहेत. पुढील उत्पन्न येतपर्यंत शेतकरी आपल्या दैनंदिन खर्चावर, प्रत्येक वेळी नियंत्रण ठेवतो. (काही अपवाद किंवा काही अपवाद परिस्थिती) अतिरेकी खर्च नसल्यामुळे त्याला त्याच्या कमी उत्पन्नात संसार चालविता येतो. परंतु आधुनिक काळात जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या नवीन साधनांमुळे उत्पन्न व खर्च यात मेळ बसवणे शेतक़्यांना कठीण होत आहे.सण- उत्सव, तीर्थयात्रा, दळणवळणाची साधने, लग्न समारंभ, आरोग्य व शिक्षणावरील खर्च, शेती विकास कर्ज, शेतमजुरांचा खर्च, धार्मिक उत्सव व इतर किरकोळ खर्च यामुळे आवश्यक खर्चाबरोबर अनावश्यक खर्च हा वाढत चालला आहे. आवश्यक व अनावश्यक खर्च यामध्ये अनावश्य खर्च वाढण्याचा वेग जास्त आहे व उत्पन्न वाढण्याचा वेग तपासल्यास खर्चापेक्षा तो नेहमी कमी आहेत. त्यामुळे या नवीन काळात शेतक़्यांवर खर्चाचा ताण येत असलेला पाहायला मिळतो. शेतकरी, शेतमजूर, छोटे व्यावसायिक शहरातील लोकांची नक्कल करण्याचा प्रयत्न करत आहेत, ग्रामीण भागातील मुले-मुली शहराच्या संपर्कात येत असल्यामुळे आई-वडिलांना बऱ्याचशा गोष्टी समजावून सांगून शहरी जीवनशैली आणण्याचा प्रयत्न चालत आहेत. खर्चिक वृत्ती ग्रामस्थांची वाढली असली तरी बचत प्रवृत्ती ग्रामस्थांची वाढविणे आवश्यक आहे. ग्रामीण जीवन पूर्वीचे पुनर्जीवित होईल. ही मोठी संधी आजही शिल्लक आहे. शहरी चित्र वरवर चांगले आहे.परन्तु वास्तविक पाहता कर्जबाजारीपणा वाढला आहेत. क्रेडिट कार्ड, मोठ्या गाड्या, मोठ्या घराचे बांधकाम, राहणीमान व इतर खर्च प्रचंड असल्यामुळे, कर्जफेडिची क्षमता त्या तुलनेत कमी असल्यामुळे आवश्यक उत्पनाबरोबरच अधिकचे उत्पन्न कसे मिळेल, अनावश्यक खर्च कमी न करता कसा पूर्ण करायचा याचा शोध हा शहरी वर्ग घेत आहे. अशावेळी शहरी वर्ग ग्रामस्थांचे मोठे

नुकसान करत आहेत. शहरातील व्यावसायिकाकडून शेतकरी लुबाडल्या जात आहेत तसेच ग्रामीण ग्राहक वर्ग लुबाडल्या जात आहे. ग्रामस्थ शहराच्या संपर्कात आल्यामुळे खर्च व ताण वाढला आहे. यासाठी शहरी परिसर जबाबदार आहेत. ग्रामीण परिसरात राहण्याचा जुना आनंद मोठा होता, तो बऱ्याच प्रमाणात कमी कमी होत आहे. परंतु शहरांच्या तुलने तो बराच जास्त आहे. ग्रामीण परिसरात पायाभूत सुविधा वाढल्यास, एकमेकांच्या संपर्कात येणाऱ्या सर्वांनीच (ग्रामीण व शहरी परिसर) आपल्या सुविधांमुळे इतरांवर आर्थिक ताण येणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. तसेच भांडवल पुरवठा करणाऱ्या संस्थांनी अनावश्यक खर्चाची पूर्तता करणाऱ्या कर्जांना आळा घालणे आवश्यक आहे. थोडक्यात ग्रामीण परिसरात राहण्याचा आनंद जुना चांगला असून सद्यस्थितीत तो बदलला आहे. परंतु शहरांच्या तुलनेत आज व भविष्यासाठी ग्रामीण परिसरात राहणे सदा सर्वकाळ आनंद देणारे आहे.

2.ग्रामीण आर्थिक जीवन समृद्ध करणारे केंद्र -सहकार

भारतात 1904 ला सहकार कायदा संमत झाला आणि सहकारी चळवळीला गती मिळाली. भारतात सहकारी संस्थांची रचना त्री- स्तरीय स्वरूपाची आहे. वरच्या स्तरावर राज्य सहकारी बँक, जिल्हास्तरावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व खालच्या ग्रामीण स्तरावर प्राथमिक सहकारी पतसंस्था कार्यरत आहे. या त्रि- स्तरीय सहकार रचनेमुळे ग्रामीण आर्थिक जीवन सुंदर बनले आहेत. या ग्रामीण सहकार रचनेत नाबार्ड व रिझर्व बँक ऑफ इंडियाची भूमिका नियामक म्हणून चांगली आहे. ग्रामीण परिसरात व्यापारी बँकांचे जाळे राष्ट्रीयकरणामुळे वाढले. परंतु सहकारी बँकेने ग्रामीण क्षेत्रात सुरुवातीपासूनच राष्ट्रीयकरणाचे फायदे मिळवून दिले आहेत. ग्रामीण वित्तीय समावेशनात व्यापारी बँकांबरोबरच सहकारी बँकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. ग्रामीण सहकारी बँका ग्रामीण परिसरातील शेतमजूर, शेतकरी व छोटे व्यावसायिक यांना अल्पतारणावर अल्प, मध्यम व दीर्घकालीन कर्ज पुरवठा करतात. त्यामुळे कुठलाही आर्थिक ताण या वर्गावर निर्माण होत नाही. शासनही वेळोवेळी नैसर्गिक आपत्ती व इतर आपत्ती लक्षात घेऊन कर्जमाफी व इतर सहकार्य करतात. सहकारी बँका ग्रामीण जीवनात निदर्शनास आणून देते की मनुष्याची हाव कोणीही पूर्ण करू शकत नाही. परंतु त्यांच्या महत्त्वाच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी कुठलाही ताण येणार नाही, यासाठी शासन व सहकारी बँक ग्रामीण व कृषी परिसरासाठी नफ्याकडे लक्ष न देता ग्रामीण परिसर समृद्ध कसा होईल? याकडे विशेष लक्ष देत आहे. सहकारी पतसंस्थांची भूमिका पुन्हा सक्रिय झाल्यास ग्रामीण आर्थिक समृद्धपणा पुन्हा वाढणारा आहे.याचवेळी प्रत्येक परिसरातील शेतकऱ्यांनी तसेच शेतमजूर व व्यावसायिक यांनी कर्जफेडीबाबत प्रचंड सहकार्य करणे आवश्यक आहे. ग्रामीण परिसरातील कॅशलेस व्यवहार, बँकिंग व्यवहार, वेगवेगळी वित्तीय साधने, विविध ॲप, ई- बँकिंग अशा सर्व सोयी पुन्हा वाढविल्यास भारतीय अर्थव्यवस्थेचा आर्थिक कणा विकसित भारतासाठी मजबूत होईल यात कुठलीही शंका नाही. या आधुनिक आर्थिक सोयी वापरण्याचा आनंद शहरी परिसरापेक्षा ग्रामीण परिसरात वाढत आहे.

3. नैसर्गिक साधन संपत्ती.

भारत नैसर्गिक साधन संपत्तीबाबत श्रीमंत आहे. परंतु या नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर चांगला होत नसल्यामुळे भारताला गरीब म्हटल्या जात आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या चांगल्या वापराबाबत खूप मोठ-मोठे प्रयोग करण्याची गरज नाही. फक्त लोकांनी स्वतःची मानसिकता बदलविणे आवश्यक आहे. उदा. शेतीत तुषार व ठिबक सिंचनाच्या सोयी उपलब्ध करणे. पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालचा परिसर होय. पर्यावरणामार्फत फळे, फुले अशा बऱ्याच गोष्टी तात्काळ आनंद देत आहे. तर निसर्गातील बऱ्याच उपलब्धता इतर पिढ्यांनाही तेवढाच

आनंद उपलब्ध करून देईल. त्यासाठी वर्तमान शहरी व ग्रामीण परिसराला तसेच एका देशाबरोबर इतरही देशांना साधनांच्या वापराबाबत काळजी घेणे गरजेचे आहे.आज सांस्कृतिक पर्यावरण जैविक व अजैविक पर्यावरणाचा ऱ्हास करत आहे. मनुष्याच्या सर्व क्रिया व प्रक्रियांचा समावेश सांस्कृतिक पर्यावरणात होतो. हे सांस्कृतिक पर्यावरण प्रथमता टिकवणे गरजेचे आहे. अधिक लोकसंख्येमुळे अतिभार वाढला असला तरी लोकसंख्येत गुणात्मक बदल आणून किंवा भविष्यकालीन अंदाज नवीन पिढीला देणे गरजेचे आहे. यासाठी शासनाने शिक्षण पद्धतीत आवश्यक असा फेरबदल करणे गरजेचे आहे. कारण शिक्षण सर्व प्रकारचे अज्ञान दूर करणारे साधन आहे. नवीन काळातील जागतिकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणात उत्पन्न मिळविण्यासाठी मर्यादा नाही परंतु आपण मिळवत असलेल्या उत्पन्नातून विषमता पसरणार नाही. याचा मेळ लावणे अपेक्षित आहेत. जैविक- अजैविक पर्यावरण मानवी पर्यावरणामुळे खराब झाले आहे. दुरुस्ती करण्यासाठी सध्या चांगला वेळ आहे. यासाठी प्रत्येक जिल्ह्याने एकत्र येऊन आपली कृती योजना नियोजनाने आखणे गरजेचे आहे.खेड्यातील लोकांची बोलीभाषा, कौटुंबिक प्रेम, विवेक, खाने-पिने, राहणीमान, शिक्षण, इत्यादी संबंधित गोष्टी वाढल्यास सांस्कृतिक पर्यावरण समृद्ध होऊन जैविक व अजैविक पर्यावरण समृद्ध होणारे आहे. सांस्कृतिक पर्यावरण हे प्रदूषण नष्ट करणारा चांगला स्त्रोत आहे. घराघरातून या सांस्कृतिक पर्यावरणाचे संरक्षण होणे गरजेचे आहे, छोट्या मुलांना या संदर्भात संस्कार देणे वेळोवेळी गरजेचे आहे.

4.लघु आणि कुटीर उद्योगधंदे

लघु आणि कुटीर उद्योगधंदे पर्यावरणाला सांभाळणारे आहे. आरोग्यासाठी अति महत्त्वाच्या वस्तू या धंद्यामार्फत सुरुवातीपासून निर्माण होत आहे. सोबतच पर्यावरणाचे रक्षण आपोआपच होणारे आहे.कौशल्य स्नेही, तंत्रज्ञानाशी मैत्री, उत्पन्नाचे विकेंद्रीकरण, रोजगार निर्मिती, निर्यात प्रभाव , इत्यादी बऱ्याच मोठ्या क्षमता या धंद्यात आहे. त्यामुळे लघु व कुटीर उद्योगधंदे वाढणे गरजेचे आहे.ग्रामीण परिसर हा या धंद्यांच्या केंद्रबिंदू असायला पाहिजे. भ्रष्टाचार, काळा पैसा, कृत्रिम टंचाई, किंमत वाढ, आर्थिक विषमता, दारिद्र्य, बेकारी, करबुडवेपणा, प्रदूषण, जागतिक तापमानात वाढ, हरितगृह परिणाम, कर्जबाजारीपणा, कर्ज परतफेड या सर्व समस्यावर छोटे धंदे मोठी जीवनदायिनी आहे. नैसर्गिक साधनसंपत्ती आणि मानवी कौशल्याच्या आधारावर हे धंदे पिढ्यांना पिढ्यांचे रक्षक आहे. या सर्व गोष्टी अनुकूल वाढल्यास आर्थिक विकासाचे स्मार्ट इंजिन लघु व कुटीर उद्योगधंदे आहे. संगीत, साहित्य, विश्वास, विवेक, नैतिकता, कौटुंबिक जिव्हाळा, निर्यात, विवेकशीलता अशा सर्व बाजूंनी हे धंदे महत्त्वाचे आहेत.ग्रामीण परिसराच्या वतीने हे धंदे टिकवणे व वाढविणे अपेक्षित आहे. रोजगारातील अनिश्चितता दूर करण्याची ताकद या धंद्यांमध्ये आहे. पुढील प्रत्येक ग्राहक वर्ग ग्रामीण परिसरातच निर्माण होऊन देशाच्या विकासाचे स्मार्ट इंजिन हे छोटे धंदे आहेत, या दृष्टिकोनातून या धंद्यांना वाढविणे खूप गरजेचे आहेत. ग्रामीण भागातील समृद्धता टिकविण्याच्या दृष्टिकोनातून हे धंदे महत्त्वाचे आहे. रोजगाराबाबतची अनिश्चितता दूर करण्यात या धंद्यांचे महत्त्व मोठे आहे. अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांना प्रेरित करणारे हे धंदे आहेत. कुटुंब नियोजनाला व लोकसंख्येला नियंत्रित करणारे हे छोटे धंदे आहेत. अधिक लोकांना छोटे उद्योगधंदे सांभाळू शकत नाही. ती आठवणही हे छोटे अर्थव्यवस्थेला वेळोवेळी करून देत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे विकसीत स्वरूप या धंद्यांच्या हातात आहे.त्यामुळे या धंद्यांकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. या धंद्यासमोर असणाऱ्या अनेक अडचणी शासनाने सोडविल्यास ग्रामीण परिसर समृद्ध होऊन शहराच्या समृद्धीला चालना मिळणारी आहे.

निष्कर्ष

1. शहराच्या तुलनेत खेड्यात राहण्याचा आनंद मोठा आहे. याचा आनंद घेणारा वर्ग ठराविक का होईना उपलब्ध आहे.
2. ग्रामीण परिसरात राहण्याचा आनंद मोठा असला तरी बऱ्याच सुशिक्षित लोकांची मानसिकता खेड्यात राहण्याची नाही.
3. शहरातील वातावरण खराब असताना सुद्धा शहरात राहण्यासाठी पसंती देणारा वर्ग वाढत आहेत.
4. सांस्कृतिक पर्यावरण दिवसेंदिवस खराब होत आहेत. यासाठी मानवाची वागणूक जबाबदार आहे.
5. एकमेकाविरुद्ध असलेला द्वेष एकमेकांच्या पराभवाला कारणीभूत आहेत.
6. ग्रामीण लोकसंख्या दिवसेंदिवस कमी होत चाललेले आहेत व शहरी लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे.
7. आवश्यक पायाभूत सुविधांचा अभाव हे मागील ग्रामीण- शहरी स्थानांतरणाचे कारण होते. तर वर्तमानात प्रदर्शन प्रभाव हे मूलभूत कारण आहे. उदा.तो राहतो त्यामुळे मलाही शहरात राहणे अपेक्षित आहे.
8. 2011 च्या जनगणनेनुसार शहरात वास्तव्य करणारी संख्या 32 टक्के व ग्रामीण परिसरात वास्तव्य करणारी संख्या 68% आहे. हे प्रमाण दिवसेंदिवस बिघडत चाललेले आहेत व दुरुस्तीकरणासाठी संधी आहे.

उपाययोजना

1. शाश्वत विकासाचे महत्त्वाचे साधन ग्रामीण परिसर व त्यातील कौशल्य आहे. यात सदासर्वकाळ वाढ करणे आवश्यक आहे.

2. लघु आणि कुटीर उद्योगधंदे, सहकारी बँका, नैसर्गिक साधनसंपत्ती व पर्यावरण यांचे महत्त्व ग्रामीण जीवनात प्रचंड आहे. ग्रामीण समृद्धपणासाठी या सर्व स्त्रोतांचा नव्याने वापर वाढविणे गरजेचे आहे.

3. निमशहरी परिसरात राहणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे शासनाने निमशहरी परिसर आणि ग्रामीण परिसर यातील दुवा शोधून रोजगाराच्या योजना आणणे आवश्यक आहे.

4. ग्रामीण परिसरातील पर्यटन स्थळे, सुरक्षा आणि सुविधा ग्रामीण समृद्धपणासाठी वाढविणे गरजेचे आहे.

5. ग्रामीण परिसरात ज्या अजूनही चुकीच्या प्रथा- परंपरा शिल्लक आहेत तसेच रोजच्या वर्तमान सवयी यातही आवश्यक बदल होणे गरजेचे आहे. उदा भाषा,खाण-पाण,शुद्ध पाणी, वर्तणूक, राहणीमान, स्वच्छता, व्यसन इत्यादी.

6. पायाभूत सुविधांमधील द्ळणवळणाची साधने, शिक्षण व आरोग्य सेवा, वाहतूक व्यवस्था, या सुविधा प्रथमता वाढविणे गरजेचे आहे.

7. सुशिक्षित लोकांनी खेड्यात राहणे गरजेचे आहे.त्यांचा प्रभाव इतर कुटुंबावरील नक्की होईल.

8. शहरी- ग्रामीण वास्तव्याच्या आधारे वारसाहक्काच्या निकषात बदल होणे गरजेचे आहे. उदा-ग्रामीण परिसरात राहत असल्यास वारसाहक्कानुसार त्याला शेतजमीन जास्त मिळणे किंवा आई-वडिलांच्या संपत्तीतील वाटा आधिक मिळणे.

9. ग्रामीण परिसरात वास्तव्य करणाऱ्यांना प्रवास खर्च अर्धा, आरोग्य खर्च व इतर सुविधांमध्ये सवलत मिळणे अपेक्षित आहे. यामुळे ग्रामीण शहरी स्थानांतरणाचा प्रश्न काही प्रमाणात मिटेल.

10. संबंधित जातींना आरक्षण देतेवेळी ग्रामीण व शहरी अशी विभागणी होणे गरजेचे आहे. शहराच्या तुलनेत ग्रामीण विभागाला जास्त वाटा देणे गरजेचे आहे. तसेच विधानसभा, लोकसभा व संबंधित संस्थांमध्ये ग्रामीण- शहरी वास्तव्याची पात्रता व अट, प्रतिनिधीं कोटा, असणे गरजेचे आहे.

11. शहरी समृद्धी म्हणजे विकास नव्हे तर ग्रामीण समृद्धपणा म्हणजे विकास होय. या समीकरणाचा वापर करणे गरजेचे आहे.

12. आपल्याकडे माहितीचे अनेक स्त्रोत उपलब्ध असल्यामुळे, शास्त्रज्ञान असल्यामुळे, मागील अनेक अडचणी व क्षमतांवर विजय मिळवल्यामुळे ग्रामजीवन सुंदर करणे गरजेचे आहे.

सारांश.

ग्रामीण परिसरात राहण्याचा अनुभव, अपरिहार्यता व ग्रामीण समृद्धता म्हणजे शहरी समृद्धता तयार करणे नव्हे तर शाश्वत विकासाला प्रेरणा देणारा स्त्रोत निर्माण करून रोजचा वापर करणे होय. देशाला खरा विकास मिळवायचा असेल तर शहरी परिसरापेक्षा ग्रामीण परिसरात राहणे अनिवार्य आहे. ग्रामीण परिसरात राहून भौतिकवाद न वाढवता मर्यादित गरजात आनंद वाढविणे अपेक्षित आहेत.त्यामुळे वर्तमान पिढिवर कोणताही आर्थिक ताण निर्माण न होता सर्व साधने चांगल्या स्थितीत पुढच्या पिढीला हस्तांतरित होईल. साधनांच्या हस्तांतरणाची प्रक्रिया चांगली राहण्याकरिता ग्रामीण परिसरात राहणे अनिवार्य आहे. शहरांमधूनसुद्धा साधनांच्या हस्तांतरणाची प्रक्रिया ही सुदृढ असणे गरजेचे आहे. नैसर्गिक साधन संपत्तीच्या चांगल्या सुस्थितीतील हस्तांतरणामार्फत आर्थिक विकास अपेक्षित आहे.

संदर्भग्रंथ सूची:

1. दक्षिणकर ना.पू,समग्र पशुसंवर्धन, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर
2. मार्कंडेय नितीन, शाश्वत दूध व्यवसाय तंत्र- पशुपालन, सांकेत प्रकाशन, पुणे
3. खांदेवाले श्रीनिवास व निमजे नरेश, महाराष्ट्रात राहण्याचा अनुभव व विदर्भ राज्याची अपरिहार्यता, विदर्भ राज्य आंदोलन समिती, नागपूर
4. कवीमंडन विजय, कृषी अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर
5. उद्योजकतेचे मूलमंत्र, महिला व बालकल्याण समिती, पुणे महानगरपालिका.
6. सरोदे आर, 21 व्या शतकातील उद्योजकतेच्या संधी, मॅनेजमेंट रिसर्च जर्नल, ISSN 2319-7943.
7. गोविलकर विनायक, भारतीय अर्थव्यवस्थेतील निर्णायक वळणे, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
8. देशपांडे विनायक, भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास) हिमालया पब्लिकेशन, नागपुर, 2003.
9. कुलकर्णी अविनाश, औद्योगिक अर्थशास्त्र, डायमंड पब्लिकेशन, पुणे, 2021.
10. अर्थसंवाद, मराठी अर्थशास्त्र परिषद, नियतकालिक, जानेवारी ते मार्च- 2019.
11. दैनिक वर्तमानपत्रे, मार्च -2026

इंद्रजीत भालेराव यांची कविता: एक आकलन

प्रा. डॉ. भगवान शिवाजीराव काळे
बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी.

प्रस्तावना

इंद्रजित भालेराव हे १९८९ साली प्रकाशित झालेल्या पहिल्याच 'पीकपाणी' या कवितासंग्रहाने काव्यरसिक-समीक्षकांना परिचित झाले. 'पीकपाणी' या कवितासंग्रहापासून सुरू झालेला त्यांचा काव्यप्रवास 'भूमीचे मार्दव' या कवितासंग्रहापर्यंत आजतागायत सुरू आहे. दरम्यान, त्यांच्या कवितेने एकूणच मराठी कवितेत आपला वेगळा असा प्रभाव निर्माण केला आहे. कविता लेखनाबरोबरच कविता सादरीकरणाच्या अप्रतिम शैलीमुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून ते शेतकरी चळवळीतील कार्यकर्त्यांपर्यंत त्यांची कविता पोहोचली आहे. कविता अशा वेगवेगळ्या स्तरांवर पोहोचण्याचे भाग्य फारच थोड्या कवींच्या वाट्याला येते. अनाकलनीय प्रतिमांच्या भाषेत त्यांची कविता कधी बोलत नाही; साध्या सरळ बोलीभाषेत त्यांची कविता थेटपणे वाचक-श्रोत्यांपर्यंत पोहोचते आणि आपला परिणाम साधते. काय सांगावयाचे आहे याबद्दल त्यांची धारणा पक्की आहे. ज्या परिसर आणि समाजाशी त्यांचे घट्ट नाते आहे, ज्या परिसर आणि समाजाने त्यांच्यावर संस्कार केलेले आहेत त्याबद्दलच ही कविता बोलते. शेती, शेतकरी आणि त्या अनुषंगाने येणारा निसर्ग यांच्याशी या कवितेचे घट्ट नाते आहे. शेतकऱ्यांच्या व्यथा-वेदनांबरोबरच त्यांचे गुणदोष, त्यांच्या धारणा, रूढी-परंपरा, समज-अपसमज, लोकसंकेत यांच्यासह संपूर्ण कृषिजीवन त्यांची कविता विविध बारकाव्यांसह आपल्या आवाक्यात घेताना दिसते. म्हणूनच संपूर्ण कृषी संस्कृतीचे दर्शन त्यांच्या कवितेत होताना दिसते.

इंद्रजीत भालेराव यांची कविता: एक आकलन

शब्दांना शेणामातीचा दर्वळ अपेक्षिणारी त्यांची कविता केवळ अभावाचे चित्रण न करता कृषिसंस्कृतीतील सौंदर्यस्थळांचाही वेध घेते. अशा विविधांगी आशयामुळे त्यांची कविता एकसुरी होत नाही. कृषिसंस्कृतीशी संबंधित असणारे सर्व घटक, पशुपक्षी, झाडेझुडपे, गवत, विविध पिके, विविध हंगाम, पाऊस, शेतीची अवजारे, अशा सर्व गोष्टी कवितेचा विषय होताना दिसतात. ह्या सर्व बाबी कवितेचा विषय होतात यातही एक सहजता आहे. प्रत्यक्ष पाहिलेल्याआणि भोगलेल्या शेतकरी जीवनाच्या वास्तवामुळे ही सहजता आणि उत्कटता कवितेत उतरली आहे. शेतकऱ्यांच्या जीवनातील अपार कष्ट, त्याचे अभावग्रस्त जगणे याचे चित्रण करताना त्यांची कविता अधिक टोकदार होते. म्हणून गव्हासारख्या पिकावरील कवितेतही शेतकऱ्याचे अभावग्रस्त जगणे ते अधोरेखित करतात.

शेतकऱ्याचे अभावग्रस्त जगणे, प्रचलित व्यवस्थेत त्याचे होणारे शोषण या गोष्टी प्रामुख्याने त्यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहेत. शेतकऱ्यांच्या शोषणाला जबाबदार असलेल्या घटकांचे त्यांना पक्के भान आहे. म्हणून समाजव्यवस्थेतला कालचा वामन आणि नव्या अर्थप्रधान व्यवस्थेला आजचा वामन यांची जातकुळी वरकरणी भिन्न वाटत असली तरी शेतकऱ्यांच्या शोषणाबाबत त्यांची असलेली एकवाक्यता ते अधोरेखित करतात. शहरातल्या दुस्मानाबरोबरच पोटचे हनुमानही शेतकऱ्यांच्या शोषणाचे लाभार्थी आहेत, हे त्यांना माहीत आहे. व्यवस्थेशी हातमिळवणी करत शेतकऱ्यांच्या शोषणाला हातभार लावणाऱ्या तथाकथित भूमिपुत्रांवरही ही कविता आघात करते. शेतकऱ्याला सृष्टीचे सहावे तत्त्व समजावे असे मानणारी त्यांची कविता शेतकऱ्याला, जगाच्या पोशिंद्याच्या रूपात बघते, जगाचा पालनकर्ता समजते; म्हणूनच शेतकऱ्याचे 'बाप'पण त्यांच्या कवितेत जागोजाग दिसते. या बापाचे पिळले जाणे त्यांना पहावत नाही. त्यासंबंधीची चीड त्यांच्या कवितेतून व्यक्त होताना दिसते.

आम्ही लावली कुपाटी केली आम्हीच राखन
बोंड बोंड येचतानी गेली कंबर वाकून
खुरकुट्या टोचू टोचू अंगावर आली आव
कोन कोठून आले हे आता ठरवाया भाव (आम्ही काबाडाचे धनी, पृ. १७)

कृषिजीवनातील सौंदर्यस्थळांचा वेध घेतानाही त्याच्या बुडाशी असलेली शेतकऱ्याच्या कष्टांबद्दलची खोल जाणीव आपसूकच व्यक्त होते. त्यामुळेच केळीवरील कवितेत ते म्हणतात-

बाग केळीचा लावला
सांगताना वाटे खुशी
जगवता तगवता
रोज आठवते काशी (भूमीचे मार्दव, पृ. १८)

केळीच्या बनातील सौंदयपिक्षाही शेतकऱ्याला करावे लागणारे कष्ट आणि दलालाकडून त्याचे होणारे शोषण अधोरेखित करणे त्यांना महत्त्वाचे वाटते. बळी पोटी येण्याची आस बाळगूनही पुन्हा पुन्हा वामनच पोटी येतो तेव्हा शेतकऱ्यांना जगण्यापेक्षा मरण जवळचे वाटते आणि सुरू होते ते शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र. याबाबत त्यांची कविता म्हणते-

आपल्या डोक्यावरच्या कर्जाला
पाप समजणारा पुण्यवंत आत्मा
फक्त तुझ्याच शरीरात का राहतो ?
सगळयांनीच कमरेची सोडून
डोक्याला गुंडाळलेली असताना
तू इतका सलज्ज कशासाठी ? (टाहो, पृ. १५)

जागतिकीकरणाच्या झपाट्यात उद्ध्वस्त होत जाणाऱ्या शेतीव्यवस्थेचे चित्रण त्यांच्या कवितेत येते, संघर्षाची भाषा त्यांची कविता बोलू लागते. अस्मानी आणि सुलतानी संकटांना निमूटपणे सहन करणाऱ्या शेतकऱ्यांना संघर्ष करण्याचे आवाहनकरते. अत्यंत संयत आणि समतोल प्रकृतीधर्म असणारी त्यांची 'पीकपाणी' मधील कविता 'टाहो' मधील काही कवितांत वेगळे रूप घेऊन येताना दिसते. शेतीव्यवस्थेच्या परिवर्तनाची भूमिका घेऊन कुणब्यांच्या येणाऱ्या पिढ्यांना नव्या लढाईसाठी सिद्ध होण्याचे आवाहन करते. म्हणूनच कृषिव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवू पाहणाऱ्या शेतकरी चळवळीतील नेते आणि कार्यकर्त्यांना त्यांची कविता आपली भावना व्यक्त करण्यास अधिक जवळची वाटते. शोषितांच्या एका मोठ्या वर्गाच्या भावना अत्यंत निष्ठेने व्यक्त करण्याचे सामर्थ्य त्यांच्या कवितेने दाखवून दिले आहे. रसिक आणि समीक्षकांचा वर्ग ओलांडून सामान्यांपर्यंत पोहोचलेली अलीकडच्या काळातील 'शीक बाबा शीक, लढायला शीक' ही एकमेव कविता आहे. जनसामान्यांच्या भावना मुखर करण्यातच कवितेची फलश्रुती असते.

इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतील ठळकपणे लक्षात येणारी दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यातील स्त्री चित्रण. मुळातच पारंपरिक लोकगीते, जात्यावरच्या ओव्या यांचे संस्कार पचवलेली त्यांची कविता आहे. आई आणि बहिणीच्या तोंडून ऐकलेल्या ओव्यांनी त्यांच्या कवितेला बळ दिल्याचे ते मान्य करतात. ग्रामीण स्त्रियांच्या सुख-दुःखाची वेगवेगळी रूपे त्यांनी जवळून अनुभवली आहेत. त्यामुळे त्यातील बारकाव्यांसह उत्कटपणे आलेले चित्रण त्यांच्या कवितेत दिसते. आई, सासू, सून, बहीण, आजी अशा विविध नात्यांबरोबरच दाइणीच्या रूपातील दलित स्त्रीही या कवितेत भेटते. शेती व्यवस्थेत स्त्रियांच्या वाट्याला येणारे कष्ट आणि रांगड्या किंवा रानटीपणाकडे झुकलेल्या पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांचा होणारा कोंडमारा भालेराव यांनी अत्यंत समर्थपणे टिपला आहे. स्त्रीत्वाची आणि त्यातील दुःखाची जाणीव आईच मुलीला करून देते.

बहिणीची बोळवण करताना
आईनं आंदणात आरसा दिला
म्हणाली आरसा शिनगारासाठी नाही
आपण चुकलो तरी, नवरा चुकला तरी
आमच्यापासून दूर तुला हाच वाट दाखवील! (वेचलेल्या कविता, पृ. ६३)

आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या विधवा स्त्रीची परिस्थिती तर आणखीच वाईट. घरदार आणि समाज सांभाळताना तिची होणारी घालमेल याचे चित्रण ते अत्यंत सूचकतेने करतात. ते म्हणतात-

तिच्या कपाळावरच्या कुंकवाची
लालजर्द जाळाची भीती संपल्यामुळे
कुपाटी आता रानात शिरेल
वाटा धान तुडवतील
मोकाट जनावरांचा शहाजोगपणा वाढेल
विहिरीतल्या पाण्याचे उमाळे चावळतील
डोळ्यावर पापणी ओढून तिला
काही दिवस हे नुसतंच पहावं लागेल (टाहो, पृ. २२)

कवितेच्या वरील ओळी आणि इतर अनेक कवितांमधून हतबल आणि परिस्थितीशरण स्त्री हे ग्रामीण जीवनातले आजचेही वास्तव आहे. शेतकरी कुटुंबातील स्त्री हाच शेतीव्यवस्थेचा खरा आधार आहे. उपजत असलेली सोशिकता दुर्गुण ठरावा एवढ्या पातळीवरचा आहे; परंतु दुसरा पर्यायही तिच्यासमोर उपलब्ध नाही. अशा या स्त्रीच्या विविध भावना भालेराव यांच्या कवितेत प्रकट झाल्या आहेत. प्रेम, शृंगार, विरह, भावनिक घुसमट यांच्या विविध तऱ्हा त्यांनी चित्रित केल्या आहेत. 'कुळंबिणिची कहाणी' या दीर्घ कवितेतून आलेले स्वतःचे अस्तित्व निर्माण करू पहाणाऱ्या स्त्रीरूपाचे आणखी वेगळे दर्शन घडते. कृषिसंस्कृतीशी अतूट नाते ठेवून असणारी, पतीसोबत खांद्याला खांदा लावून कष्टाला तोंड देण्यास सदैव तयार असणारी, शेतीशिवार, गुरेढोरे यांच्यावर अपार प्रेम करणारी, देवाइतकीच श्रद्धा मातीवरही ठेवून 'मातीसाठीच जगावं, मातीसाठीच मरावं' असा संस्कार येणाऱ्या पिढ्यांवर करणारी, स्वतःच्या सुखाचा विचार न करता नातेसंबंधांना महत्त्व देणारी स्त्री त्यांच्या कवितेत भेटते.

त्यांच्या कवितेवर लोकगीते, लोकलय, ओवी आणि अभंग यांचा फार मोठा प्रभाव आहे. संस्कारक्षम वयात कानावर पडलेल्या जात्यावरच्या ओव्या, भजने, आरत्या, अभंग यांनी आपल्या कवितेला समृद्ध केल्याचे ते मान्य करतात. म्हणूनच संत तुकाराम, संत जनाबाई यांच्याबरोबरच वारकरी परंपरेतील सर्व संत मंडळी आणि बहिणाबाई चौधरी, ना. धों. महानोर, विठ्ठल वाघ आदींच्या रचना त्यांच्या पूर्वसुरी ठरतात. त्यांच्या कवितेची भाषा ही मराठवाड्यातल्या ग्रामीण माणसाची भाषा आहे. कवितेच्या भाषेबाबत आचार्य महावीर प्रसाद द्विवेदी यांचे मत इथे नोंदवणे आवश्यक आणि महत्त्वाचे वाटते. ते म्हणतात, 'कवि को ऐसी भाषा लिखनी चाहिए जिसे सब कोई सहज में समझ ले और अर्थ को हृदयंगम कर सके। पद्य पढते ही उसका अर्थ बुद्धीस्थ हो जाने से विशेष आनंद प्राप्त होता है और पढने में जी लगता है। परन्तु जिस काव्य का भावार्थ कठिनता से समझ मे आता है, उसके अवलोकन में जी नहीं लगता और बराबर अर्थ का विचार करते-करते उससे विरक्ती हो जाती है। जो कुछ लिखा जाता है, वह इसी अभिप्राय से लिखा जाता है कि लेखक का हृदगत भाव दुसरे समझ जाएँ। यदि इस उद्देश ही की सफलता न हुई तो लिखना ही व्यर्थ हुआ। अतएव क्लिष्ट की अपेक्षा सरल लिखना ही सब प्रकार वांछनिय है। जो काव्य सर्वसाधारण की समझ के बाहर होता है, वह बहुत कम लोकमान्य होता है। कविओं को इसका सदैव ध्यान रखना चाहिए।' (आचार्य महावीर प्रसाद द्विवेदी, साहित्यविचार, सं. भारत यायावर, वाणी प्रकाशन, दिल्ली). इंद्रजित भालेराव यांनी हे भान आपल्या कवितेत सदैव जपलेले आहे, हे मला महत्त्वाचे वाटते. आपण राहतो तो प्रदेश आणि प्रदेशातील लोकजीवन, लोकपरंपरा, दंतकथा, रूढी-संकेत यांचे भान बाळगून त्यांनी आपल्या कवितेला समृद्ध केले आहे.

सारांश

इंद्रजित भालेराव यांना गावगाड्याची पक्की समज आहे. शेतकरी आणि आलुतेदार-बलुतेदार यांच्या परस्पर संबंधांतील बारकावे त्यांना माहीत आहेत. गावगाड्यात बहुसंख्यकांकडून अल्पसंख्यकांवर होणारा अन्याय,

जातीजातींमधील परस्परसंबंध त्यातील तणावांसह ते व्यक्त करतात. कुटुंब, नातेसंबंध, भावभावकी, गावातील राजकारण असा गावगाड्याचा मोठा पट त्यांच्या कवितेतून साक्षात होतो. कृषिव्यवस्था केंद्रस्थानी असलेल्या ग्रामजीवनातील सर्व वृत्ती-प्रवृत्ती त्यांनी चित्रित केल्या आहेत. मानवी नाते संबंधांबरोबरच ग्रामसंस्कृतीचे निसर्गाशी असलेले अतूट नाते प्रामुख्याने त्यांच्या कवितेत दिसते. शेतीव्यवस्थेत पावसाला असलेले महत्त्व, पेरणी, सुगी या हंगामांना असलेले महत्त्व त्यांच्या कवितेत उत्कटतेने येते. गाव आणि गावाभोवतालचा निसर्ग, वेगवेगळी झाडे, विविध पिके आणि त्या पिकांचे गुणधर्म, गवताचे वेगवेगळे प्रकार या सर्व गोष्टींनी त्यांच्या कवितेत प्रवेश मिळवला आहे. त्यांच्या कवितेतून येणारा निसर्ग रस-रूप-गंध आणि चव घेऊन अवतरतो. निसर्गाचे इतके सहृदय चित्रण आणि सर्जनाच्या पातळीवर त्याचा केलेला आविष्कार यापूर्वी व्यंकटेशमाडगुळकरांच्या लेखनातच प्रामुख्याने दिसतो. वेगवेगळी पिके आणि गवतावरील त्यांच्या कविता केवळ माहितीच्या पातळीवर राहात नाहीत तर त्यामागे असलेल्या लोकधारणा, लोकजीवनात प्रचलित असलेले त्यांच्याबद्दलचे बरे-वाईट संदर्भ कवितांना वेगळे संदर्भमूल्य प्राप्त करून देतात. या दृष्टीनेही या कविता महत्त्वाच्या आहेत.

संदर्भ सूची:

१ भालेराव इंद्रजीत, आम्ही काबाडाचे धनी

२. भालेराव इंद्रजीत, भूमीचे मार्दव

३. भालेराव इंद्रजीत, टाहो

४. भालेराव इंद्रजीत, वेचलेल्या कविता

५. द्विवेदी, आचारी महावीर प्रसाद, साहित्य विचार, संपा. भारत यायावर, वाणी प्रकाशन, दिल्ली

प्रधानमंत्री आवास योजना

प्रा. डॉ. श्रीनिवास अशोकराव लोणीकर
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी (राज्यशास्त्र विभाग)

सर्वांसाठी घरे योजना:-

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सन 2022 पर्यंत सर्वांना घरे देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वसामान्यांना घर मिळावे यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबविण्याचा मानस जाहीर केला आहे. याची अंमलबजावणी शासन ठामपणे करेल आणि या दृष्टीने निर्णय घेण्यात आले आहेत. केंद्र शासनातर्फे दि. 17 जून 2015 रोजी सर्वांसाठी घरे (नागरी) योजना प्रधानमंत्री आवास योजना मंजूर करण्यात आली. ही योजना दि. 25 जून 2015 रोजी सुरू करण्यात आली. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत 51 शहरे मंजूर करण्यात आली आहेत. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील 51 शहरांची निवड करण्यात आली आहे असून या योजनाची अंमलबजावणी या शहरालगतच्या नियोजित क्षेत्रामध्ये करण्यात येणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार झोपडपट्टी वासीय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्ती, अल्प उत्पन्न गटातील व्यक्ती या योजनेसाठी पात्र ठरविण्यात येणार आहेत. लाभार्थ्यांच्या कुटुंबाच्या व्याख्येत पती-पत्नी व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या नावे भारतात कुठेही पक्के घर नसावे तसेच स्व-प्रमाणपत्र (सेल्फ सर्टिफिकेशन – Self Certification) अनुदेय करण्यासाठी केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री आवास योजने करिता केंद्र व राज्य शासनाचा आर्थिक सहभाग:

केंद्र शासनाने जाहीर केलेल्या "सर्वांसाठी घरे-2022" या संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये जमिनीचा साधन संपत्ती म्हणून वापर करून त्यावरील झोपडपट्ट्यांचा "आहे तेथेच' पुनर्विकास केला जाईल. कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिक दृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकासाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्यात येणार आहे. खाजगी भागीदारी द्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती केली जाईल. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्याद्वारे वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधण्यास अनुदान देण्यात येणार आहे. जमिनीचा साधन संपत्ती म्हणून वापर करून त्यावरील झोपडपट्ट्यांचा "आहे तिथेच" पुनर्विकास करण्यासाठी (SAR लागू असलेली शहरे वगळून) केंद्र व राज्य शासनाकडून एक लाख कर्ज आधारित व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिक दृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्यासाठी केंद्र शासनाकडून रुपये 06 लाखापर्यंतच्या कर्जावर 15 वर्षासाठी 6.5% इतका व्याज अनुदान तर राज्य शासनाकडून 01 लाखापर्यंत खाजगी भागीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्याच्या प्रयत्नात किमान 35% घरे आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गासाठी असावीत. एका प्रकल्पात किमान 250 घरे असावी त्यासाठी केंद्र शासनाकडून दीड लाख तर राज्य शासनाकडून एक लाखापर्यंत अनुदान देण्यात येणार आहे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांद्वारे वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधण्यास केंद्र मदत करते.

प्रधानमंत्री आवास योजने करिता लाभार्थ्यांची प्रतिवर्ष आर्थिक मर्यादा:

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थी प्रति वर्ष आर्थिक मर्यादा तीन लक्ष (30 चौ.मीटरपर्यंतच्या क्षेत्रासाठी) अल्प उत्पन्न गटातील लाभार्थी (केवळ घटक क्र.2.साठी) लाभार्थी प्रती वर्ष आर्थिक मर्यादा रु.तीन लाख ते सहा लाख (60 चौ. मीटर पर्यंतच्या क्षेत्रासाठी) इतकी आहे. प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरी योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील 32 प्रकल्पामधील एक लाख 76 हजार घरकुलांचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले आहेत. अशा प्रकारे प्रधानमंत्री आवास योजनेची रूपरेषा थोडक्यात आहे.

संदर्भ:

१. दैनिक गावकरी
२. www.wikipedia.com

शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन : डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे समाजशास्त्रीय विश्लेषण

डॉ. शिल्पा मेश्राम

सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, आर्ट्स अँड कॉमर्स नाईट कॉलेज नागपूर.

सारांश :

भारतीय समाजाची रचना शतकानुशतके जातीव्यवस्थेच्या कठोर शृंखलांनी बांधली गेली आहे. ही व्यवस्था केवळ सामाजिक-आर्थिक असमानता निर्माण करत नाही तर व्यक्तींच्या बौद्धिक आणि मानसिक विकासालाही अडथळा आणते. अशा पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रमुख हत्यार म्हणून ओळखले. त्यांच्या मते, शिक्षण केवळ अक्षरज्ञान किंवा पदवीप्राप्ती नव्हे, तर ते सामाजिक गुलामगिरीचा नाश करणारे, आर्थिक स्वावलंबन साधणारे आणि राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करणारे शस्त्र आहे. "शिक्षित करा, जागृत करा, संघटीत व्हा" (Educate, Agitate, Organize) हा त्यांचा मंत्र सामाजिक क्रांतीचा मूलमंत्र ठरला.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आंबेडकरांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. ते जातीव्यवस्थेला केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक समस्या म्हणून पाहत नव्हते, तर ती एक 'graded inequality' असलेली सामाजिक रचना आहे, जी वर्चस्व आणि शोषण टिकवते. शिक्षण या रचनेला आव्हान देणारे साधन आहे, कारण ते व्यक्तींमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचारसरणी आणि समतेची जाणीव निर्माण करते. आंबेडकरांचा दृष्टिकोन संघर्ष सिद्धांताशी (Conflict Theory) जवळचा वाटतो; शिक्षण सामाजिक पुनरुत्पादन (Social Reproduction) थांबवून सामाजिक गतिशीलता (Social Mobility) वाढवते आणि लोकशाही मूल्यांची पायाभरणी करते. त्यांनी दलित वर्ग शिक्षण संस्था (1928) आणि पीपल्स एज्युकेशन सोसायटी (1945) सारख्या संस्थांद्वारे व्यावहारिक पातळीवर हे तत्त्वज्ञान अमलात आणले. आजच्या भारतात जातीय असमानता, शैक्षणिक विषमता आणि डिजिटल विभाजन अजूनही कायम आहे. अशा वेळी आंबेडकरांच्या विचारांचे समाजशास्त्रीय विश्लेषण केवळ ऐतिहासिक अभ्यास नाही तर समकालीन धोरणे, शिक्षण सुधारणा आणि सामाजिक न्यायाच्या लढ्यासाठी मार्गदर्शक ठरते. हा अभ्यास आंबेडकरांच्या शैक्षणिक दर्शनाला समाजशास्त्रीय संकल्पनांशी जोडून, शिक्षण कसे सामाजिक परिवर्तन घडवू शकते याचे सखोल परीक्षण करेल. त्याद्वारे एक समतामूलक, बौद्धिकदृष्ट्या जागृत आणि लोकशाही समाजनिर्मितीची दिशा स्पष्ट होईल.

महत्वाचे शब्द : सामाजिक परिवर्तन, शिक्षण, डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विचार,

प्रस्तावना:

"सामाजिक परिवर्तन म्हणजे स्वीकृत जीवन प्रणालीतील परिवर्तन होय. मग ते परिवर्तन भौगोलिक परिस्थितीत, सांस्कृतिक घटक, लोकसंख्येची रचना किंवा विचार प्रणालीत झालेले असो, हे परिवर्तन किंवा आविष्कार कोणत्याही रीतीने समूहांतर्गत झालेले असते."[1] सामाजिक परिवर्तन म्हणजे एका व्यक्तीच्या जीवनातील किंवा काही व्यक्तींच्या जीवन प्रतिमानातील परिवर्तन नाही. तर सामाजिक परिवर्तन म्हणजे संपूर्ण समुदायाच्या जीवनातील परिवर्तन होय. थोडक्यात परिवर्तन हे वैयक्तिक स्वरूपाचे नसून सामाजिक असते.सोप्या शब्दात सांगायचे तर सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजाच्या रचना, मूल्य आणि वर्तन पद्धतीत होणारे बदल होय. शिक्षण हे या परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे. भारतीय समाजात दीर्घ काळापासून जातीय भेदभाव, असमानता आणि अज्ञान यांचा प्रभाव दिसून येतो. या पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकर यांनी शिक्षणाला मुक्तीचे साधन मानले आणि समाजातील वंचित घटकांना शिक्षणाद्वारे सशक्त करण्यावर भर दिला. डॉ. आंबेडकरांच्या विचारात शिक्षण म्हणजे

केवळ पदवी मिळवणे नव्हे तर व्यक्तीचे मानसिक दास्यत्व संपवून तिला आपल्या हक्कांची जाणीव करून देणारी एक क्रांतिकारी प्रक्रिया आहे. प्रस्तुत शोधनिबंधात डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचे समाजशास्त्र दृष्टिकोनातून विश्लेषण करून त्यांनी शिक्षणाद्वारे सामाजिक परिवर्तनाची वाट कशी प्रशस्त केली याचा आढावा घेण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

1. सामाजिक परिवर्तनाची संकल्पना स्पष्ट करणे.
2. आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार मांडणे.
3. शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक बदलाची प्रक्रिया समजून घेणे.
4. आधुनिक समाजात या विचारांची उपयुक्तता स्पष्ट करणे.

संशोधन पद्धती : गुणात्मक संशोधन पद्धतीच्या अंतर्गत वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

तथ्य संकलन- तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक साधनांमध्ये डॉ. आंबेडकर लिखित पुस्तकांचा वापर करण्यात आला आहे तर दुय्यम साधनांसाठी संदर्भ ग्रंथ, पुस्तक इत्यादी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विचार : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार हे जनसामान्यांसाठी तसेच वंचितांसाठी अत्यंत मोलाचे होते. समाजाचे शिक्षणाद्वारे उत्थान व्हावे असे त्यांना कायमच वाटत असे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तीन मानव कल्याणाच्या तत्त्वास अनुसरून जीवन व्यक्तीत करणारा समाज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षणातून निर्माण व्हावा हे अभिप्रेत होते. त्यासाठी सतत प्रयत्नशील राहण्याची आवश्यकता त्यांनी वेळोवेळी सांगितली आहे. डॉ. आंबेडकर शिक्षणाची व्याख्या करताना म्हणतात 'व्यक्तीला जाणीव करून देते ते शिक्षण होय.'[2] शिक्षणाविषयी पुन्हा ते म्हणतात 'शिक्षणाअभावी माणूस म्हणजे निवड पशु होय.'[3] ते असेही म्हणतात की, 'उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस बलहीन होऊन अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्यांचा गुलाम होतो.'[4] म्हणून ते समाजाला कायम संबोधित करीत असत की शिक्षणाद्वारे माणसाने त्याच्या कर्तव्याची व अधिकारांची जाणीव करून घेतली पाहिजे. शिक्षण प्रसारासाठी समाजाने कार्य करावे हे देखील त्यांना अपेक्षित होते. याविषयी ते म्हणतात, 'समाजातील प्रत्येक व्यक्तीने तसेच हर एक संस्थेने शिक्षणाच्या बाबतीत आपल्या तरुण पिढीचे पाऊल पुढे कसे पडेल या प्रश्नाकडे आपल्याला लक्षपूर्वक पहिले पाहिजे व त्या अनुरोधाने आपली कार्याची दिशा ठरवली पाहिजे.'[5] डॉ. आंबेडकर समाजातील जाती धर्म पंथ इत्यादी विषमता नष्ट करू पाहत होते. धर्मामुळे, जातीमुळे होणारे शोषण व विभाजन शिक्षणानेच संपवता येईल यावर त्यांचा विश्वास होता. सर्व प्रकारच्या विषमता नष्ट करण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही प्राप्त करण्यासाठी शिक्षण हा एक राजमार्ग असल्याचे ते मान्य करत होते. शोषणापासून मुक्ती मिळविण्यासाठी व समाजातील अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी संघर्ष आवश्यक असले तरी हा संघर्ष शिक्षणाशिवाय होऊ शकत नाही. आणि शिक्षणाशिवाय समाज संघटित होऊ शकत नाही. हेही त्यांना मान्य होते. त्यामुळेच त्यांनी समाजाला शिका, चेतवा आणि संघटित व्हा असा संदेश ते देतात. शिक्षणाची आवश्यकता ते समाजातील सर्वांसाठीच मान्य करतात. आणि म्हणूनच 'शिक्षण प्रत्येकाच्या आवाक्यात आणता आले पाहिजे म्हणून निम्नस्तरीय वर्गासाठी शिक्षण जेवढे स्वस्थ व सुलभ करता येईल तेवढे करता आले पाहिजे,'[6] यावर ते भर देतात. ते प्राथमिक शिक्षणाचाही आग्रह धरतात. प्राथमिक शिक्षण सर्वांना मिळावे यासाठी प्रयत्न करतात. आणि शिक्षणाची जबाबदारी सरकारने स्वीकारावी हे परखड शब्दात मांडताना ते म्हणतात, 'व्यक्ती स्वातंत्र्याची आवश्यकता जर मान्य असेल तर दर एक व्यक्तीच्या ठाई आपले स्वातंत्र्य रक्षण करण्याची शक्ती उत्पन्न होणे अत्यंत जरुरी आहे व ती शिक्षणाशिवाय उत्पन्न होऊ शकत नाही. या कारणास्तव दरेक सुधारलेला राष्ट्रात प्रजेला सुशिक्षित करण्याची जबाबदारी सरकारला आपल्या अंगावर घेणे आवश्यक आहे.'[7] व्यक्तीच्या जीवनाला शिस्त लावण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता मानतात. चारित्र्यसंवर्धनासाठी सुद्धा शिक्षणाला महत्त्व देतात. व्यक्तीच्या शिस्तप्रिय जीवनातूनच आणि चारित्र्यसंपन्न व्यक्तीच्या माध्यमातूनच समाजाची प्रगती होऊ शकते यावर त्यांचा विश्वास होता. शिक्षणाला त्यांनी महत्त्व दिले मात्र शिक्षण हे केवळ शिक्षित होण्यापुरते नाही, मूल्याधिष्ठित शिक्षण असावे, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. नैतिकता, शिक्षण व लोकशाही याविषयी डॉ.

बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'लोकशाही यशस्वी करायची असेल तर जनता किंवा समाज नैतिक मूल्याधिष्ठित शिक्षणाद्वारे सांस्कृतिक असावा. लोकशाहीसाठी सुशिक्षित समाजाची अत्यंत गरज आहे. शिक्षित नैतिक मूल्याधिष्ठित समाजाची लोकशाही ही सर्वाधिक यशस्वी किंवा हमखास यशस्वी ठरू शकेल.'[8] शिक्षणाच्या माध्यमातूनच स्त्रियांची दैना अवस्था दूर होऊ शकते यावर त्यांचा ठाम विश्वास होता. शिक्षण हे सर्वांसाठी असावे हे सांगताना स्त्री शिक्षणाला सुद्धा ते महत्त्व देतात. मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलींच्या ही शिक्षणासाठी धडपड केल्यास आपल्या समाजाची प्रगती झपाट्याने होईल. हे स्पष्ट करतात.

शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन यावरील विचार हे भारतीय समाजाच्या पुनर्रचनेच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण अध्याय आहेत. ते शिक्षणाला केवळ व्यक्तिगत प्रगतीचे साधन नव्हे तर सामाजिक क्रांतीचे आणि गुलामगिरीतून मुक्तीचे प्रभावी हत्यार मानत होते. त्यांच्या मते शिक्षणाशिवाय कोणतेही सामाजिक परिवर्तन शक्य नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात 'शिक्षण हे समाज परिवर्तनाचे हत्यार आहे. अशिक्षित समाज सर्वस्व गमावतो तर शिक्षणामुळे माणसात कर्तव्य आणि हक्काची जाणीव येते.' ते स्पष्ट करतात की 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.' शिक्षण माणसाला स्वाभिमानी, स्वावलंबी आणि संघर्षशील बनवतो. अज्ञान हे गुलामगिरीचे मूळ कारण आहे. शिक्षण त्यातून मुक्ती देते. हे सांगून शिक्षणाची उपयुक्तता अधोरेखित करतात. ब्राह्मणी शिक्षण पद्धतीचा विरोध करतात. ब्राह्मणी शिक्षण पद्धतीची कठोर चिकित्सा करतात आणि शिक्षणाचे सार्वत्रिकरण व्हावे, सर्वांना शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न करतात. एवढेच नव्हे तर शिक्षण ही सरकारची जबाबदारी असल्याचेही सांगतात आणि मुक्तिदायी शिक्षणाचा पुरस्कार करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचा माध्यम समजत असल्यामुळेच समाजाने शिक्षित व्हावे, समाजाला चेतवावे आणि समाजाने संघटित व्हावे हा मूलमंत्रते देतात. हा त्यांचा मूलमंत्र त्यांच्या संपूर्ण शैक्षणिक व सामाजिक विचारांचा गाभा ठरतो. हा मंत्र त्यांनी केवळ दलितांसाठी नव्हे तर संपूर्ण शोषित समाजासाठी दिला आहे. शिक्षणाशिवाय व्यक्तीचा विकास होऊ शकत नाही आणि स्वतःला ओळखल्याशिवाय माणूस म्हणून जगता येत नाही, असे ते कायम संदेश देत असत. प्राथमिक शिक्षणाला ते राष्ट्रीय प्रगतीचा पाया मानत आणि प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार हा सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. त्यासाठी सक्तीचा कायदा करावा अशी मागणी करतात. उच्च शिक्षणाविषयी बोलताना डॉ. आंबेडकर म्हणतात, 'आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्च शिक्षण हेच एकमेव औषध आहे. उच्च शिक्षणामुळे दलित शोषित वर्ग प्रशासनातील महत्त्वाच्या जागा मिळवू शकतात आणि समाजात आपले स्थान निर्माण करू शकतात. त्यांच्यातला न्यूगंड दूर होऊ शकतो. विद्यापीठ केवळ शिक्षण देणारे नव्हे तर व्यक्तिमत्व घडविणारी आणि वैज्ञानिक दृष्टी निर्माण करणारी असावीत असाही उपदेश ते विद्यापीठीय शिक्षणाला देतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्त्री शिक्षणाचे कट्टर पुरस्कर्ते होते. स्त्रियांच्या प्रगतीवर समाजाची प्रगती अवलंबून आहे यावर त्यांचा गाढा विश्वास होता. जाती वर्ग विरहित समाजासाठी स्त्री शिक्षण आवश्यक आहे, असे ते वारंवार सांगत असत. शिक्षणाने स्त्रिया स्वतंत्र, स्वाभिमानी आणि सामाजिक परिवर्तनात सहभागी होऊ शकतात. यावर त्यांचा ठाम विश्वास होता. शिक्षणातून होणाऱ्या सामाजिक परिवर्तनावर केवळ त्यांनी वक्तव्य केले नाहीत, भाषणे दिले नाहीत, लेखन केले नाही तर त्यासाठी प्रत्यक्ष कृती देखील केली आणि शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन करण्यासाठी त्यांनी संस्थांची निर्मिती केली. त्यामध्ये 1924 मध्ये बहिष्कृत हितकारणी सभा स्थापन करून शिक्षण प्रसार केला. पीपल्स एज्युकेशन सोसायटी 1945 मध्ये स्थापन करून त्याद्वारे सिद्धार्थ कॉलेज हे 1946 ला त्यांनी स्थापन केले आणि मिलिंद महाविद्यालयाची स्थापना 1950 ला केली. दलित शोषित वर्गासाठी शाळा, वस्तीगृहे आणि उच्च शिक्षण संस्था उभारल्या. डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचे सार ते सामाजिक क्रांतीतून दिसून येते शिक्षणाशिवाय राजकीय आर्थिक आणि सामाजिक स्वातंत्र्य मिळणे अशक्य आहे, हे ते जाणत होते. ते म्हणतात, 'शिक्षण हे गुलामगिरीतून मुक्तीचे साधन आहे.' आजही त्यांचा हा संदेश प्रासंगिक आहे. शिक्षण सर्वांना समान, गुणवत्ता पूर्ण आणि मुक्तीदायी हवे. त्यातून जातीव्यवस्था, अंधश्रद्धा आणि अन्याय संपून स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव असलेला समाज घडविला येईल. बाबासाहेबांचे हे शैक्षणिक विचार केवळ दलित-शोषितांसाठी नव्हे तर संपूर्ण भारतासाठी मार्गदर्शक आहे.

सांगली जिल्ह्याची ओळख प्रामुख्याने एक 'कृषिप्रधान' जिल्हा म्हणून आहे. येथील अर्थव्यवस्था मुख्यत्वे शेतीवर आधारित असून ऊस, द्राक्षे, ज्वारी आणि भात ही पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. ग्रामीण भागातील सामाजिक रचनेत कुणबी समाज हा शेतीशी जोडलेला एक महत्त्वाचा घटक आहे. या समाजातील स्त्रिया घर आणि शेतीची जबाबदारी समर्थपणे पेलत असल्या, तरी राजकारणातील त्यांचा वावर मात्र कौटुंबिक आणि सामाजिक कारणांमुळे मर्यादित राहिला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला आरक्षण आणि विविध सरकारी योजनांमुळे ग्रामीण स्त्रियांच्या स्थितीत बदल होत आहेत. या बदलांच्या पार्श्वभूमीवर, कुणबी समाजातील महिलांमध्ये राजकीय जाणीव किती निर्माण झाली आहे आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग किती वाढला आहे, याचा सखोल अभ्यास करण्यासाठी सांगली जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनामध्ये सांगली जिल्ह्यातील ग्रामीण कुणबी समाजातील स्त्रियांच्या राजकीय जाणीवेचा सर्वांगीण अभ्यास करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही माहिती स्रोतांचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. प्राथमिक माहिती संकलनासाठी संशोधकाने प्रत्यक्ष क्षेत्रकार्य (Field Work) करून प्रश्नावली, मुलाखत आणि निरीक्षण या तीन प्रमुख तंत्रांचा अवलंब केला. यामध्ये प्रामुख्याने संरचित प्रश्नावलीच्या माध्यमातून महिलांची पंचायत राज व्यवस्थेबद्दलची समज, आरक्षणात्मक तरतुदींची माहिती आणि विविध सक्षमीकरण योजनांविषयीची त्यांची जागरूकता तपासण्यात आली. केवळ उत्तरांवर अवलंबून न राहता, संशोधकाने स्वतः ग्रामसभा, स्थानिक राजकीय बैठका आणि प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेचे निरीक्षण करून, संकलित केलेल्या माहितीची वस्तुनिष्ठता पडताळून पाहिली आहे.

विषयाची सैद्धांतिक आणि संदर्भात्मक पार्श्वभूमी भक्कम करण्यासाठी दुय्यम माहिती स्रोतांचा विस्तृत आधार घेण्यात आला आहे. यामध्ये नामांकित संदर्भग्रंथ, शैक्षणिक पुस्तके, जर्नल्समधील शोधनिबंध, शासकीय अहवाल, अधिकृत दस्तऐवज, जनगणना अहवाल आणि जिल्हा गॅझेटीअर्सचा समावेश होतो. तसेच, अद्ययावत सांख्यिकी माहितीसाठी अधिकृत सरकारी संकेतस्थळांचा वापर करून विषयाचे सखोल विश्लेषण केले आहे. योग्य प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी संपूर्ण सांगली जिल्ह्याचे तालुकानिहाय विभाग करून 'स्तरित नमुना निवड पद्धती' (Stratified

Sampling) स्वीकारण्यात आली. प्रत्येक तालुक्यातून २२ ग्रामीण कुणबी महिलांची निवड करून एकूण २२० उत्तरदात्यांचा एक प्रातिनिधिक नमुना निश्चित करण्यात आला, ज्यामुळे संशोधनाचे निष्कर्ष अधिक व्यापक आणि विश्वासार्ह होण्यास मदत झाली.

संकलित केलेल्या सर्व माहितीचे विश्लेषण करताना आधुनिक संगणकीय आणि सांख्यिकी साधनांचा वापर करून ती दोन टप्प्यांत विभागली गेली आहे. पहिल्या टप्प्यात तथ्यांचे संकलन केले गेले आणि दुसऱ्या टप्प्यात त्यांचे चिकित्सक पृथक्करण करण्यात आले. विशेषतः ग्रामीण कुणबी महिलांच्या निवडणूक प्रक्रियेतील प्रत्यक्ष सहभागाचे अचूक मोजमाप करण्यासाठी 'लिकर्ट स्केल' (Likert Scale) आधारित गुणांकन पद्धतीचा वापर केला आहे. या विश्लेषणातून महिलांचा 'राजकीय जाणीव निर्देशांक' (Political Awareness Index) काढण्यासाठी एका विशिष्ट सांख्यिकी सूत्राचा आधार घेतला आहे –

$$PAI \qquad PI = \frac{\sum (f_i \times s_i)}{N \times M}$$

वरील सूत्राच्या आधारे उत्तरदात्याने मिळवलेले प्रत्यक्ष गुण आणि एकूण कमाल गुण यांच्या गुणोत्तराद्वारे राजकीय प्रगल्भतेचे मोजमाप केले आहे. या शास्त्रीय पद्धतीमुळे ग्रामीण महिलांच्या राजकीय स्थितीचे वस्तुनिष्ठ निष्कर्ष मांडणे शक्य झाले आहे.

कुणबी समाजातील स्त्रियांची राजकीय जाणीव

ग्रामीण भागाच्या विकासात आणि लोकशाहीच्या बळकटीकरणात महिलांचा सहभाग अत्यंत मोलाचा ठरतो. विशेषतः कुणबी समाजातील स्त्रिया, ज्या शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहेत, त्यांच्यामध्ये राजकीय जाणीव असणे ही काळाची गरज आहे. राजकीय जाणीव म्हणजे केवळ मतदानापुरते मर्यादित न राहता, पंचायत राज व्यवस्थेची कार्यपद्धती समजून घेणे, महिलांसाठी असलेल्या ५०% आरक्षणाचे महत्त्व ओळखणे आणि सरकारकडून राबविल्या जाणाऱ्या विविध सक्षमीकरण योजनांचा लाभ मिळवणे होय. जेव्हा ग्रामीण भागातील एखादी स्त्री आपल्या हक्कांबद्दल आणि कर्तव्यांबद्दल जागृत होते, तेव्हाच खऱ्या अर्थाने सत्तेचे विकेंद्रीकरण यशस्वी होते. प्रस्तुत संशोधनात, या महिलांना स्थानिक राजकारणाचे किती ज्ञान आहे, हे जाणून घेण्यासाठी 'पंचायत राज' या विषयावर काही प्रश्न विचारण्यात आले, ज्याची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

तक्ता १ : पंचायत राज व्यवस्थेविषयी माहिती

माहितीची पातळी	**उत्तरदात्यांची संख्या**	**टक्केवारी**
पूर्ण माहिती	५४	२४.५५
थोडी माहिती	१०८	४९.०९
नाही	५८	२६.३६
एकूण	**२२०**	**१००.००**

स्त्रोत : क्षेत्रीय सर्वेक्षणावर आधारित प्राथमिक माहिती (२०२५–२६)

वरील तक्ता क्र. १ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, ग्रामीण कुणबी समाजातील महिलांमध्ये राजकीय जाणीवेचे स्वरूप संमिश्र आहे. सर्वात जास्त म्हणजे ४९.०९% महिलांनी आपल्याला पंचायत राज व्यवस्थेबद्दल 'थोडी माहिती' असल्याचे सांगितले. याचा अर्थ असा की, या महिलांना ग्रामपंचायत किंवा स्थानिक राजकारणाबद्दल ऐकून माहिती आहे, परंतु त्यातील तांत्रिक बाबी किंवा सखोल प्रक्रियेशी त्या अद्याप पूर्णपणे जोडल्या गेलेल्या नाहीत.

केवळ २४.५५% महिला अशा आहेत ज्यांना या व्यवस्थेची 'पूर्ण माहिती' आहे. ही टक्केवारी कमी असली तरी, ग्रामीण भागात शिक्षणाचे प्रमाण आणि राजकीय सक्रियता वाढत असल्याचे हे सकारात्मक लक्षण आहे.

परंतु चिंतेची बाब म्हणजे आजही २६.३६% महिलांना पंचायत राज व्यवस्थेबद्दल कोणतीही माहिती नाही. घरकाम आणि शेतीकामाच्या व्यापापुढे त्यांना सार्वजनिक व्यवस्थेशी संवाद साधण्याची संधी मिळत नसल्याचे हे निदर्शक आहे.

थोडक्यात सांगायचे तर, निम्म्याहून अधिक महिलांना थोडीफार माहिती असूनही, त्यांना 'पूर्ण माहिती' असलेल्या गटात आणण्यासाठी अधिक जाणीवजागृतीची आवश्यकता आहे. जेव्हा माहितीचे हे प्रमाण वाढेल, तेव्हाच कुणबी समाजातील महिलांचा राजकीय निर्णय प्रक्रियेतील वाटा खऱ्या अर्थाने वाढेल.

तक्ता २ : महिलांसाठी राजकीय आरक्षणाविषयी माहिती

आरक्षणाविषयी माहिती	उत्तरदात्यांची संख्या	टक्केवारी
होय	९६	४३.६४
थोडी माहिती	७४	३३.६४
नाही	५०	२२.७३
एकूण	**२२०**	**१००.००**

स्त्रोत : क्षेत्रीय सर्वेक्षणावर आधारित प्राथमिक माहिती (२०२५–२६)

प्रस्तुत तक्त्याचे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, ग्रामीण कुणबी समाजातील महिलांमध्ये राजकीय आरक्षणाविषयीची जाणीव सकारात्मक दिशेने विकसित होत आहे. सर्वेक्षणातील ४३.६४% महिलांना आरक्षणाबद्दल स्पष्ट माहिती असून, ही आकडेवारी पंचायत राज व्यवस्थेच्या माहितीच्या तुलनेत अधिक समाधानकारक आहे. आरक्षणात्मक तरतुदींमुळे केवळ मतदानापुरते मर्यादित न राहता आपण स्वतः निवडणुका लढवून सत्तेत सहभागी होऊ शकतो, हा आत्मविश्वास या महिलांमध्ये निर्माण झाला आहे. महिलांसाठी राखीव असलेल्या जागांमुळे राजकारण हे केवळ पुरुषांचे क्षेत्र नसून त्यात आपल्यालाही हक्काची जागा आहे, ही जाणीव ग्रामीण भागात रुजत असल्याचे यातून स्पष्ट होते.

दुसरीकडे, आरक्षणाविषयी माहिती असलेल्या महिलांची संख्या मोठी असली तरी त्यातील तांत्रिक स्पष्टतेचा अभाव जाणवतो. सुमारे ३३.६४% महिलांना आरक्षणाची प्राथमिक माहिती आहे, परंतु आरक्षणाचे नेमके प्रमाण, बदलती चक्री पद्धत (Rotation System) आणि आरक्षणातून मिळणारे अधिकार याबद्दल त्यांच्या मनात साशंकता आहे. याउलट, २२.७३% महिला आजही या महत्त्वाच्या घटनात्मक तरतुदींपासून पूर्णपणे अनभिज्ञ आहेत, ज्याला कौटुंबिक मर्यादा आणि राजकीय चर्चांमधील अलिप्तता ही कारणे असू शकतात. थोडक्यात सांगायचे तर, आरक्षणाबद्दलची ही प्राथमिक माहिती जेव्हा सखोल ज्ञानात रूपांतरित होईल, तेव्हाच कुणबी महिलांचा राजकारणातील नामधारी सहभाग संपून त्या खऱ्या अर्थाने प्रभावी 'निर्णयकर्त्या' म्हणून पुढे येतील.

तक्ता ३ : महिला सक्षमीकरण योजनांविषयी माहिती

योजनांविषयी माहिती	उत्तरदात्यांची संख्या	टक्केवारी
नियमितपणे	४२	१९.०९
कधी कधी	१०२	४६.३६
नाही	७६	३४.५५
एकूण	**२२०**	**१००.००**

स्त्रोत : क्षेत्रीय सर्वेक्षणावर आधारित प्राथमिक माहिती (२०२५–२६)

तक्ता क्र. ३ चे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, ग्रामीण कुणबी महिलांमध्ये सरकारी योजनांविषयीची माहिती ही 'नियमित' स्वरूपाची नसून ती बऱ्याच अंशी 'ओझरती' किंवा 'प्रसंगिक' आहे. सुमारे ४६.३६% महिलांनी आपल्याला योजनांची 'कधी कधी' माहिती मिळते असे सांगितले आहे. याचा अर्थ असा की, जेव्हा गावात एखाद्या

योजनेचा मोठा प्रसार होतो किंवा निवडणुका जवळ येतात, तेव्हाच या महिलांपर्यंत माहिती पोहोचते. मात्र, योजनेचा लाभ घेण्याची प्रक्रिया काय आहे किंवा त्यासाठी कोणती कागदपत्रे लागतात, याबद्दल त्यांच्यात कायमस्वरूपी जागरूकता असल्याचे दिसत नाही. केवळ १९.०९% महिला अशा आहेत ज्या योजनांच्या बाबतीत अपडेट असतात आणि नियमितपणे माहिती घेत असतात, जे प्रमाण तुलनेने खूपच अल्प आहे.

दुसरीकडे, ३४.५५% महिला अशा आहेत ज्यांना सक्षमीकरणाच्या कोणत्याही योजनांविषयी माहिती नाही. ग्रामीण भागात आजही दळणवळणाची साधने, शिक्षणाचा अभाव आणि डिजिटल साक्षरतेची कमतरता यामुळे एक मोठा गट या फायदेशीर योजनांपासून वंचित राहत असल्याचे स्पष्ट होते. थोडक्यात सांगायचे तर, कुणबी समाजातील महिलांची ही स्थिती सुधारण्यासाठी केवळ योजना जाहीर करून चालणार नाही, तर त्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष मोहिमांची गरज आहे. जोपर्यंत 'माहिती नाही' आणि 'कधी कधी माहिती मिळते' या गटातील महिला 'नियमित माहिती' असलेल्या गटात येत नाहीत, तोपर्यंत महिला सक्षमीकरणाचे ध्येय पूर्ण होणे कठीण आहे.

राजकीय जाणीव निर्देशांक

कुणबी समाजातील महिलांची राजकीय समज केवळ स्वतंत्र घटकांनुसार न पाहता, ती एकत्रितपणे किती प्रगल्भ आहे हे मोजण्यासाठी 'राजकीय जाणीव निर्देशांक' (PAI) निश्चित करण्यात आला आहे. यामध्ये पंचायत राज, आरक्षण आणि सरकारी योजना या तिन्ही महत्त्वाच्या विषयांच्या गुणांची सरासरी काढून महिलांच्या जागरूकतेचा एक निश्चित आकडा समोर आणला आहे.

तक्ता४ राजकीय जाणीव निर्देशांक

(Political Awareness Indes – PAI)

घटक	**भारांकित गुण (Weighted Score)**
पंचायत राज व्यवस्थेविषयी माहिती	२१६
महिलांसाठी राजकीय आरक्षणाविषयी माहिती	२६६
महिला सक्षमीकरण योजनांविषयी माहिती	१८६
एकूण भारांकित गुण	६६८
राजकीय जाणीव निर्देशांक (PAI)	**०.५१**

प्रस्तुत तक्त्यावरून असे दिसून येते की, कुणबी समाजातील महिलांमध्ये सर्वाधिक जागरूकता 'राजकीय आरक्षणा' बाबत (२६६ गुण) आहे. आरक्षणाने महिलांना दिलेला कायदेशीर अधिकार आणि त्यामुळे मिळणारी सत्तेची संधी याबद्दल ग्रामीण महिला अधिक सकारात्मक आणि माहितीपूर्ण असल्याचे दिसते. त्यापाठोपाठ 'पंचायत राज' व्यवस्थेच्या माहितीचा (२१६ गुण) क्रमांक लागतो. मात्र, सर्वात कमी जागरूकता 'महिला सक्षमीकरण योजनां' बाबत (१८६ गुण) असल्याचे दिसून आले आहे. हे स्पष्ट करते की, महिलांना राजकीय संरचनेची माहिती असली तरी, स्वतःच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीसाठी असणाऱ्या सरकारी योजनांपर्यंत त्या अजूनही पूर्णपणे पोहोचू शकलेल्या नाहीत.

सर्व घटकांचा एकत्रित विचार केला असता, या महिलांचा एकूण राजकीय जाणीव निर्देशांक (PAI) हा ०.५१ इतका आला आहे. सांख्यिकी दृष्टीकोनातून पाहिले तर, हा निर्देशांक मध्यम स्तरावर (Moderate Level) आहे. म्हणजेच, कुणबी समाजातील महिला राजकीयदृष्ट्या पूर्णपणे अनभिज्ञ नाहीत, पण त्या 'पूर्णपणे प्रगल्भ' आहेत

असेही म्हणता येणार नाही. हा निर्देशांक ५० टक्क्यांच्या (०.५०) वर सरकला असला तरी, तो १.०० या आदर्श स्थितीपासून बराच लांब आहे. थोडक्यात, ग्रामीण महिलांमध्ये राजकारणाबद्दल प्राथमिक ओढ निर्माण झाली आहे, मात्र त्यांना अधिक सक्षम आणि जागरूक करण्यासाठी योजनांच्या माहितीचे आणि राजकीय प्रशिक्षणाचे प्रमाण वाढवणे आवश्यक आहे.

गृहीताकाची पडताळणी

प्रस्तुत संशोधनात ग्रामीण सांगली जिल्ह्यातील कुणबी समाजातील स्त्रियांची राजकीय जाणीव लक्षात घेऊन त्यासाठी स्वतंत्र निर्देशांक (PAI) विकसित करण्यात अला आहे. या निर्देशांकाच्या आधारे मांडलेल्या गृहीतकाची वर्णनात्मक पद्धतीने पडताळणी पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

पडताळणी पद्धत

राजकीय जाणीव निर्देशांक (PAI) – स्वरूपात्मक विश्लेषण

विश्लेषण व चर्चा

राजकीय जाणीव निर्देशांक (PAI) च्या आधारे (तक्ता ५.२५) कुणबी समाजातील स्त्रियांची राजकीय माहिती पूर्णतः अपुरी नाही, हे स्पष्ट होते. महिलांसाठी राजकीय आरक्षणाविषयीची माहिती तुलनेने अधिक असून, पंचायत राज व्यवस्था व महिला सक्षमीकरण योजनांविषयी माहिती मध्यम पातळीची आहे.

PAI चे मूल्य ०.५१ असून, ते मध्यम स्तरावरील राजकीय जाणीव दर्शवते. तथापि, ही जाणीव सर्वत्र सक्रिय, सातत्यपूर्ण व प्रभावी राजकीय सहभागात रूपांतरित होत असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे राजकीय जाणीव अस्तित्वात असूनही तिचा सक्रिय सहभागावर मर्यादित परिणाम होत असल्याचे निरीक्षण या गृहीतकाच्या पडताळणीसाठी महत्त्वाचे ठरते.

निर्णय

शून्य गृहीतक (H0) : स्वीकारले

पर्यायी गृहीतक (H1) : फेटाळले

कुणबी समाजातील ग्रामीण स्त्रियांची राजकीय जाणीव अस्तित्वात असली, तरी ती व्यापक व कृतीप्रधान राजकीय सहभागात पुरेशा प्रमाणात रूपांतरित झालेली नाही.

निष्कर्ष (Conclusion)

प्रस्तुत संशोधनातून सांगली जिल्ह्यातील ग्रामीण कुणबी समाजातील स्त्रियांच्या राजकीय जाणीवेचे वास्तव स्वरूप स्पष्ट झाले आहे. संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष खालीलप्रमाणे मांडता येतील:

१. राजकीय जाणीवेचा स्तर: कुणबी समाजातील महिलांची राजकीय जाणीव ही प्रामुख्याने 'आरक्षणा' भोवती केंद्रित असल्याचे दिसून येते. सुमारे ४३.६४% महिलांना राजकीय आरक्षणाबद्दल स्पष्ट माहिती आहे, जे पंचायत राज व्यवस्थेच्या (२४.५५%) तुलनेत अधिक सकारात्मक आहे. महिलांसाठी राखीव असलेल्या जागांमुळे त्यांना स्थानिक राजकारणात आपली हक्काची जागा असल्याचे उमजू लागले आहे.

२. योजनांच्या माहितीचा अभाव: राजकीय संरचनेबद्दल थोडीफार माहिती असली, तरी महिला सक्षमीकरणाच्या शासकीय योजनांबाबत या महिला आजही मागे असल्याचे आढळले. सुमारे ३४.५५% महिलांना सक्षमीकरण योजनांची कोणतीही माहिती नाही, तर ४६.३६% महिलांना केवळ प्रसंगानुरूप (कधी कधी) माहिती मिळते. याचा अर्थ असा की, या योजनांचे फायदे प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अजूनही माहितीचा मोठा अडथळा (Information Gap) आहे.

३. राजकीय जाणीव निर्देशांक (PAI): संशोधनाअंती मिळालेला राजकीय जाणीव निर्देशांक ०.५१ असून, तो या समाजातील महिलांची राजकीय प्रगल्भता 'मध्यम' स्तरावर असल्याचे दर्शवितो. ही जाणीव केवळ नावापुरती नसली

तरी, ती तांत्रिकदृष्ट्या सखोल झालेली नाही. महिलांकडे राजकीय माहिती आहे, परंतु ती विखुरलेल्या स्वरूपात असून त्यात स्पष्टतेचा अभाव आहे.

थोडक्यात, ग्रामीण कुणबी महिलांची राजकीय जाणीव आता केवळ मतदानापुरती मर्यादित राहिलेली नाही; त्या आता आरक्षण आणि अधिकारांबाबत जागरूक होत आहेत. मात्र, त्यांच्या या जाणीवेला खऱ्या अर्थाने प्रभावी बनवण्यासाठी शासकीय योजनांचे शिक्षण, तांत्रिक प्रशिक्षण आणि राजकीय प्रक्रियेचे योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. ही जाणीव जेव्हा 'मध्यम' स्तरावरून 'उच्च' स्तरावर जाईल, तेव्हाच ग्रामीण महिला खऱ्या अर्थाने नेतृत्व करू शकतील.

शिफारशी (Recommendations)

१. राजकीय साक्षरता मोहिमा: ग्रामीण कुणबी स्त्रियांमधील राजकीय समज वाढविण्यासाठी गावपातळीवर विशेष 'राजकीय साक्षरता' वर्गांचे आयोजन करण्यात यावे, जेणेकरून त्यांना पंचायत राज व्यवस्थेची तांत्रिक माहिती मिळेल.

२. शासकीय योजनांचा प्रभावी प्रसार: महिला सक्षमीकरण योजनांविषयीची अनास्था दूर करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर 'माहिती केंद्र' स्थापन करावेत, जिथे महिलांना नियमितपणे नवीन योजना आणि त्या मिळवण्याच्या प्रक्रियेबद्दल मार्गदर्शन मिळेल.

३. आरक्षणोत्तर प्रशिक्षण: केवळ आरक्षणाबद्दल माहिती असणे पुरेसे नाही, तर आरक्षणातून निवडून आल्यानंतर अधिकार कसे वापरावेत, यासाठी महिलांना 'प्रशासकीय आणि धोरणात्मक' प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

४. डिजिटल साक्षरता: सरकारी योजनांची माहिती इंटरनेट आणि ॲप्सवर उपलब्ध असल्याने, ग्रामीण महिलांना 'डिजिटल साक्षर' करण्यासाठी विशेष उपक्रम राबवावेत, जेणेकरून त्या स्वतः योजनांचे अपडेट्स मिळवू शकतील.

५. सामाजिक जाणीवजागृती: महिलांच्या राजकीय जागरूकतेत कुटुंब आणि समाज हे महत्त्वाचे घटक आहेत. महिलांना राजकीय चर्चांमध्ये सहभागी करून घेण्यासाठी ग्रामीण भागातील पुरुष वर्गाचे प्रबोधन करणे आवश्यक आहे, जेणेकरून महिलांना मोकळे वातावरण मिळेल.

६. नेतृत्व विकास कार्यक्रम: स्वयंसेवी संस्था (NGOs) आणि शासकीय यंत्रणांनी मिळून ग्रामीण भागातील तरुण मुली आणि स्त्रियांसाठी 'नेतृत्व विकास शिबिरे' आयोजित करावीत, ज्यामुळे त्यांच्यातील निर्णयक्षमता आणि आत्मविश्वास वाढेल.

७. बचत गटांचा राजकीय वापर: ग्रामीण भागातील बचत गटांच्या मासिक बैठकांमध्ये केवळ आर्थिक चर्चा न करता, राजकीय आणि सामाजिक विषयांवर चर्चा घडवून आणण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, ज्यामुळे महिलांची राजकीय प्रगल्भता वाढण्यास मदत होईल.

संदर्भ (References)

1. Buch, N. (2010). *From Oppression to Assertion: Women in Local Government.* Routledge India.
2. Datta, B. (2005). *And Who Will Make the Pancakes? We Get Women into Local Government.* Women's Political Watch.
3. Jayal, N. G. (2006). *Representing India: Ethnic Diversity and the Governance of Public Institutions.* Palgrave Macmillan. (Focuses on caste and gender in local governance).
4. Government of India. (2021). *Economic Survey of Maharashtra 2024-25*. Directorate of Economics and Statistics, Government of Maharashtra.
5. Pai, S. (2001). *Panchayati Raj and Rural Governance: Experiences of a Decade.* Rawat Publications.
6. आंबेडकर, स. (२०१२). *पंचायत राज आणि महिला आरक्षण.* चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
7. गद्रे, वि. (२०१५). *महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला नेतृत्व.* डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
8. पवार, प्र. (२०१८). *महाराष्ट्रातील सत्ताकारण आणि समाजकारण.* साधना प्रकाशन, पुणे.
9. भोळे, भा. ल. (२००३). *भारतीय राजकीय व्यवस्था.* पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.
10. सांगली जिल्हा गॅझेटियर (सुधारित आवृत्ती). महाराष्ट्र शासन, दर्शनिका विभाग

जागरूक नागरिक काळाची गरज

डॉ. वैशाली शांताराम बागुल
(राज्यशास्त्र विभागप्रमुख)
कर्मवीर आबासाहेब तथा ना.म.सोनवणे.
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय. सटाणा. ता.बागलाण.जि.नाशिक.

गोषवारा :

आधुनिक काळात नागरिक जागरूक असणे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. नागरी साक्षरता म्हणजे'समाजातील नागरिक म्हणून प्रभावीपणे सहभागी होण्यासाठी व्यक्तीला असलेले ज्ञान आणि कौशल्य हे आहे.' व्यक्तीला देशाच्या संविधानाची संपूर्ण माहिती असणे गरजेचे आणि महत्वाचे आहे. देशातील नागरिकांना असलेले हक्क आणि कर्तव्य, देशातील राजकीय व्यवस्था, शासकीय कामकाजाची प्रक्रिया, देशातील शासकीय संरचना जसे केंद्र सरकार - राज्य सरकार, कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांचे कामकाज, देशातील निवडणूक प्रक्रिया जसे मतदान, राजकीय पक्ष,राजकीय नेतृत्व, राजकीय तसेच सामाजिक समस्या,आर्थिक समस्या यांची जाणीव असणे हे आहे. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये नागरी साक्षरतेचे महत्व आणि जागृकता असणे किती गरजेची आहे. तसेच त्यांच्या जागरूकतेचे सर्वात मोठे प्रमाण म्हणजे त्यांनी केलेले मतदानाची टक्केवारी हे आहे. हे केवळ टक्केवारी पुरताच मर्यादित आहे असे नव्हे तर याचा अर्थ त्यांचा राजकारणातील सहभाग आणि जागरूकता याचे हि प्रमाण आहे. यावरच लोकशाहीही अवलंबून आहे. त्यामुळे त्या संदर्भातून लेखाचे प्रयोजन आहे.

प्रस्तावना:-

नागरिक हा देशातील राज्यसंस्थेचा जबाबदार घटक असतो. नागरिक या शब्दाचा सर्वसाधारण अर्थ नगरात किंवा शहरात राहणारा असा पूर्वीच्या काळी केल्या जात असे. ग्रीक देशात पूर्वी नगर राज्य होती या नगर राज्यातील नागरिक समान भूमिकेवरून आणि सहकार्याने राज्याचा कारभार चालवित असत. त्याकाळी स्त्रिया आणि गुलाम यांना राज्यकारभारात भाग घेता येत नसे. ग्रीसमध्ये कार्यकारी आणि न्यायदान विषयक कार्यात प्रत्यक्ष भाग घेण्यापुरतेच नागरिकत्व मर्यादित घेतले होते, यामुळे (Aristotle) अरीस्तोतोलने कार्यकारी व न्यायदान विषयक कार्यात भाग घेण्याचा ज्याला अधिकार आहे तोच नागरिक आहे असे सांगितले आणि नागरिकत्वाच्या संकुचित दृष्टिकोनाचे समर्थन केले. सुरुवातीला रोमन लोकांनीही विशिष्ट हक्क असणाऱ्यांनाच नागरिक म्हणून मान्यता दिली होती. परंतु त्यानंतरच्या काळात रोमन लोकांनी व्यापक दृष्टिकोन स्वीकारून नागरिकत्वाच्या कल्पनेचा विकास केला. त्यांनी रोमन साम्राज्यातील जिंकलेल्या लोकांनाही रोमन नागरिकांचे हक्क दिले आणि नागरिकत्वाची व्याप्ती वाढली. आधुनिक काळातील नागरिकत्वाबाबतची कल्पनाही फार विस्तृत असून त्यामध्ये ग्रीक आणि रोमन लोकांच्या कल्पना समाविष्ट झालेल्या आहेत असे दिसून येते. ग्रीक कल्पनेप्रमाणे नागरिकांनी राज्याशी एकनिष्ठ राहून आपली राजकीय आणि सामाजिक कर्तव्य पार पाडावी. आधुनिक विचारप्रणाली प्रमाणे नागरिकत्व हे राज्यसंस्थेचे हक्क आणि कर्तव्य इत्यादीकांवर अवलंबून राहते. नागरिकत्वाची व्याप्ती वाढवण्यात आलेली असली तरी हक्क - कर्तव्य आणि राज्याचे सभासदत्व आवश्यक मानले जाते. आजच्या काळात नागरिकांची व्याख्या अशा रीतीने केली जाते नागरिक म्हणजे की जी व्यक्ती राज्याची सभासद असून राज्याशी एकनिष्ठ राहण्याच्या बदल्यात सर्व नागरिक आणि राजकीय हक्क मिळवते अशी व्यक्ती होय.

भारतीय नागरिकत्व सार्वभौम प्रजासत्ताक भारताची राज्यघटना 26 जानेवारी 1950 रोजी अमलात आली. भारतीय राज्यघटनेच्या दुसऱ्या विभागात कलम 5 ते 11 यात भारतीय नागरिकत्वा संबंधित तरतुदी दिल्या आहेत. परंतु त्या कायमस्वरूपाच्या आहेत असे नाही कारण कलम 11 प्रमाणे भारताच्या मध्यवर्ती कायदेमंडळाला म्हणजे संसदेला कायदे करून त्यात बदल घडवून आणण्याचा अधिकार राज्यघटनेने दिलेला आहे. भारताची राज्यघटना अमलात आली त्यावेळी जन्मसिद्ध नागरिकत्व आणि स्वीकृत नागरिकत्व असा भेद केलेला नव्हता. परंतु राज्यघटनेच्या कलम 11 अन्वये मिळालेला अधिकार वापरून भारतीय संसदेने किंवा पार्लमेंटने स्वीकृत नागरिकत्वाविषयी स्वतंत्र कायदा केला. भारतीय नागरिकत्वाची प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे भारतीय नागरिकत्व व्यापक

स्वरूपाचे असून अमेरिकेप्रमाणे दुहेरी नागरिकत्व नाही. जन्मस्थान किंवा भूमीतत्व आणि रक्त तत्व किंवा वंशतत्वही दोनही तत्व भारताने मान्य केलेली आहेतच परंतु त्याचबरोबर वास्तव आणि निष्ठा इत्यादी तत्त्वेने ही मान्य करण्यात आलेली असल्यामुळे भारतीय नागरिकत्व विशाल आणि व्यापक झालेले आहे.नागरीक योग्य रीतीने निर्णय घेण्याकरिता साक्षर असणे गरजेचे आहे, कारण देश आणि देशातील भविष्याची परिस्थिती ही नागरिक ठरवतात कारण जगात बहुतांश देशात लोकशाही व्यवस्था आहे. त्यामुळे अशा प्रकारात नागरिकांच्या जागरूकते वर सामाजिक विकासआणि परिवर्तन, राजकीय व्यवस्थेच्या स्थिरतेसाठी आवश्यक आहे. परंतु देशातील नागरिक जर यातून अनभिज्ञ असतील तर मात्र देशापुढे कालांतराने फार मोठी समस्या निर्माण होऊ शकते. सध्या जशी झेन जी ही संकल्पना आली आहे. त्यात नवीन पिढी देशात रस्त्यावर उतरत आहे. तिच्या ज्या समस्या आहेत त्याविरोधात नारे देत आहे. जसे नेपाळ, इंडोनेशिया,पेरू, इराण अशा काही देशात आपण त्यांचे वर्तन पाहिले आहे. युवाशक्ती मोठी शक्ती आहे मात्र तिला दिशा असणे फार गरजेचे आहे. दिशाहीनशक्ती देशाचे नुकसान करून जाते म्हणूनच हा विषय किती गंभीर आहे हे लक्षात आले आणि या परियोजनातूनच लेखातून नागरिक साक्षरता आणि जागरूकता एक अध्ययन या दृष्टिकोनातून अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते संशोधनाचे उद्देश खालील प्रमाणे आहे.

- नागरी साक्षरता नागरिक युवकांचे स्वरूप अभ्यासणे.
- नागरी साक्षरता आणि लोकशाहीतील महत्व अभ्यासणे.
- नागरी साक्षरता आणि सामूहिक जबाबदारी यांच्या परस्पर संबंधांचा अभ्यास करणे.
- नागरिक साक्षरतेचे सिद्धांतिक आणि संकल्पनात्मक विश्लेषण करणे.
- नागरिक साक्षरता आणि लोकशाही सहभागी यातील परस्पर संबंध अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके:

- एक नागरिक साक्षरतेचा अनुकूल प्रभाव व परिणाम लोकशाहीवर असतो.
- नागरी साक्षरतेतून नागरी सहभाग दिसून येतो.
- ग्रामीण व शहरी नागरिक जागरूकता परिणामकारक दिसून येते.

संशोधन पद्धती : प्रस्तुत शोध निबंधासाठी संशोधन पद्धतीतील ऐतिहासिक आणि विश्लेश्नात्म्क पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. यात संदर्भ ग्रंथ, शोधनिबंध मासिके, वृत्तपत्रलेख, इंटरनेट वरील विविध वेबसाईट आणि इतर संबंधित साहित्याचा उपयोग करण्यात आला आहे.

विधानसभा निवडणूक २०२४ च्या साक्षरतेवरून मतदानाची टक्केवारी जास्त असलेले महाराष्ट्रातील जिल्हे

अ.क्र	जिल्हा	साक्षरता	मतदानाची टक्केवारी
१	गडचिरोली	६४.४	७३.६८
२	नंदुरबार	६४.४	६९.१५
३	पालघर	६६.२	६५.९५
४	धुळे	७२.८	६४.७
५	जालना	७१.५	७२.३

विधानसभा निवडणूक २०२४ च्या साक्षरतेवरून मतदानाची टक्केवारी कमी असलेले महाराष्ट्रातील जिल्हे

अ.क्र	जिल्हा	साक्षरता	मतदानाची टक्केवारी
१	मुंबई	८९.२	४८
२	ठाणे	८६.२	५६.०५
३	पुणे	८६.२	६१.०५
४	कोल्हापूर	८१.५	३८.५६
५	लातूर	७९	३३.२७

काही जिल्ह्यामध्ये साक्षरता दर जास्त असूनही मतदानाची टक्केवारी कमी आहे तर काही जिल्ह्यामध्ये साक्षरता दे कमी असूनही मतदानाची टक्केवारी जास्त आहे. काही शहरी जिल्ह्यामध्ये साक्षरता दे जास्त असूनही मतदानाची टक्केवारी कमी आहे. यावरून सांगता येते कि त्याठिकाणी मतदानाबाबत उदासीनता दिसून येते.

निष्कर्ष :

जागरूक सक्रिय आणि जबाबदार नागरिक हे कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचे मुख्य आधार आहे. म्हणून नागरी साक्षरतेच्या विकास हा केवळ शैक्षणिक नसून राष्ट्रीय विकासासाठी महत्त्वाचा आहे.नागरी साक्षरता ही सामाजिक परिवर्तनाचा एक महत्त्वाचा कारक आहे. कारण ती व्यक्तीला समाजाच्या परिवर्तनासाठी आवश्यक ज्ञान आणि कौशल्य प्रदान करते. भारतामध्ये नागरी साक्षरता आणि सामाजिक परिवर्तन यातील संबंध समजून घेणे महत्त्वाचे आहे. कारण ती भारताच्या विकासासाठी आवश्यक आहे. भारतामध्ये नागरी साक्षरतेची स्थिती सुधारण्यासाठी अनेक सरकारी योजना आहे. परंतु भारतामध्ये सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया अजूनही चालू आहे. नागरिक साक्षरतेकडे मतदानाची जाणीवपूर्वक निवड वाटते. डिजिटल साक्षरता आणि लोकशाही सहभागी यामध्ये सकारात्मक सहसंबंध आहे. त्यामुळे डिजिटल साक्षरते अभावी दिशाभूल होण्याची शक्यता आहे. भारताच्या एक सक्षम आणि गतिमान लोकशाही म्हणून टिकवून ठेवण्यासाठी नागरी साक्षरता शिक्षण हे एक राष्ट्रीय धोरण म्हणून स्वीकारले पाहिजे. भारताला एक सक्षम आणि गतिमान लोकशाही म्हणून टिकवून ठेवण्यासाठी नवनवीन कृती वर आधारित शिक्षण आणि जीसीईडी यांचे एकत्रिकरण करून कार्यक्रम राबवावेत.

आव्हाने :

शिक्षणातील असमानतातसेचवैयक्तिक पूर्वग्रह यामुळे लोकशाहीत सहभागावर तसेच निवडणुकीत प्रतिकूल परिणाम दिसून येतात. नागरिकांमध्ये राजकीय उदासीनता हा घटकही घातक परिणामकारक ठरतो. आधुनिक युग हे डिजिटल आहे. प्रत्येक क्षेत्रात याचा वावर आहे असे असताना, राजकारणासारख्या क्षेत्रात त्र मोठी भूमिका या माध्यमातून राबवली जाते आणि टी प्रभावी ही ठरते पण डिजिटल साक्षरते बद्दल उदासीनता जर जनतेत असली तर मात्र मोठे नुकसान करून जातो.आणि सरते शेवटी युवकांमध्ये सामाजिक माध्यमांमुळे खूप सारी माहिती वाढली असली तरी, चिकित्सकदृष्टी कमी आढळते.

शिफारशी :

महाविद्यालयीन अभ्यासक्रमात नागरिक शिक्षण बळकट केले गेले पाहिजे. युवकांसाठी लोकशाही व तिच्या महत्त्वाच्या संकल्पनांवर कार्यशाळा आयोजित केली गेली पाहिजे. डिजिटल साक्षरता कार्यक्रम राबवले पाहिजे तसेच त्याचे समालोचनात्मक विश्लेषण कसे करावे याबद्दल युवकांना माहिती दिली पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये युवकांचा सहभाग वाढविला पाहिजे. स्वीप (SVEEP- systematic Voter Education and electoral Participation) मतदारांसाठी शिक्षित होण्यासाठी आणि विशेषतः तरुण महिला व दुर्बल घटकांच्या मतदानाचा टप्पा टप्पा वाढविण्यासाठी कार्यक्रम राबवेत.

थोडक्यात नागरी साक्षरतेचा मुख्य उद्देश नागरिकांना त्यांच्या हक्कांसाठी जागरूक करण्यासोबतच त्यांना त्यांच्या कर्तृत्वाची जाणीव करून देणे हा आहे ज्यामुळे एक समतोल आणि सुजाण नागरिक निर्माण होतो.

संदर्भ सूची :-

१. भोले भा.ल. २०१५ भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण , नागपूर पिंपळापुरे प्रकाशन.
२. जाधव तुकाराम , शिरपूरकर महेश, २०२२ , भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया पुणे, द युनिक अकेदेमी पब्लिकेशन.
३. व्ही.बी पाटील .मानवी हक्क के सं सकरण के,सागर.
४. रा.वी.ओतूरकर व गो.हु.महाजन. १९६५ नागरिकशास्त्र आणि भारतीय शासनपद्धती. सदाशिव पेठ पुणे.
५. आर.एम.गोखले १९७१ नागरिकशास्त्र आणि भारतीय शासनपद्धती. पुणे.
६. महाराष्ट्र शासन आणि निवडणूक आयोग वेबसाईट.

जातिव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी डॉ. आंबेडकरांचा मार्ग : एक चिकित्सक अभ्यास

डॉ. शिल्पा दि. मेश्राम

सहाय्यक प्राध्यापक,

डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग, डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर.

सारांश :

या शोधनिबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या जातीव्यवस्थेच्या निर्मूलनाच्या मार्गाचा सखोल व चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. भारतीय समाजातील जातीव्यवस्था ही एक प्राचीन, जन्माधारित आणि श्रेणीबद्ध सामाजिक रचना असून ती सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विषमतेचे मूळ कारण मानली जाते. या पार्श्वभूमीवर आंबेडकरांनी केलेले विश्लेषण आणि त्यांनी सुचवलेले उपाय या शोधनिबंधाचा मुख्य गाभा आहे.

या अभ्यासात प्रथम जातीव्यवस्थेचे स्वरूप, तिची वैशिष्ट्ये आणि तिचे सामाजिक-आर्थिक परिणाम यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यानंतर आंबेडकरांनी मांडलेल्या "Division of Labourers", "Graded Inequality" यांसारख्या संकल्पनांच्या आधारे जातीव्यवस्थेचे मूलभूत दोष स्पष्ट करण्यात आले आहेत. तसेच धर्म आणि सामाजिक संरचना यावर त्यांनी केलेली टीका, विशेषतः धार्मिक आधारावर टिकून असलेल्या जातिभेदाचे विश्लेषण, याचाही विचार करण्यात आला आहे.

शोधनिबंधात आंबेडकरांनी सुचवलेल्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. "Educate, Agitate, Organize" ही त्रिसूत्री, संविधानिक उपाययोजना, आरक्षण धोरण, आर्थिक सक्षमीकरण, तसेच बौद्ध धर्माचा स्वीकार या माध्यमातून त्यांनी जातीव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी बहुआयामी मार्ग सुचवला आहे. या उपाययोजनांची उपयुक्तता, मर्यादा आणि अंमलबजावणीतील अडचणी यांचेही चिकित्सक विश्लेषण करण्यात आले आहे.

याशिवाय, या शोधनिबंधात आंबेडकरांच्या विचारांची सध्याकालीन प्रासंगिकता अधोरेखित करण्यात आली आहे. आधुनिक भारतात कायदेशीर समानता असली तरी सामाजिक आणि आर्थिक स्तरांवर जातीय विषमता अद्याप अस्तित्वात आहे. त्यामुळे आंबेडकरांचा समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांवर आधारित दृष्टिकोन आजही अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

या शोधनिबंधातून असे स्पष्ट होते की आंबेडकरांचा जाती निर्मूलनाचा मार्ग हा वैज्ञानिक, न्यायाधिष्ठित आणि परिवर्तनवादी आहे. त्यांच्या विचारांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास समताधिष्ठित आणि समावेशक समाज निर्माण करण्याची दिशा मिळू शकते.

किवर्ड्स : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जातीव्यवस्था ,जाती निर्मूलन, सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधुता, श्रमिकांचे विभाजन, श्रेणीबद्ध असमानता, सामाजिक परिवर्तन, वंचित वर्ग सशक्तीकरण

प्रस्तावना :

भारतीय समाजरचना ही विविधतेने नटलेली असली तरी तिच्या केंद्रस्थानी दीर्घकाळापासून टिकून असलेली जातीव्यवस्था ही एक अत्यंत गुंतागुंतीची आणि विषमतापूर्ण सामाजिक संस्था आहे. प्राचीन काळात उदयास आलेली ही व्यवस्था कालांतराने अधिक कठोर बनत गेली आणि तिने समाजात श्रेणीबद्ध असमानतेची (graded inequality) रचना निर्माण केली. या व्यवस्थेमुळे व्यक्तीचे सामाजिक स्थान, व्यवसाय, शिक्षणाच्या संधी आणि जीवनमान हे जन्मावर आधारित ठरवले गेले, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर सामाजिक अन्याय आणि आर्थिक विषमता निर्माण

झाली.विशेषतः अनुसूचित जाती(SC) आणि अनुसूचित जमाती (ST) या घटकांना ऐतिहासिकदृष्ट्या वंचित, शोषित आणि बहिष्कृत ठेवण्यात आले. 2011 च्या जनगणनेनुसार SC आणि ST यांची लोकसंख्या मिळून भारताच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे 25 टक्क्यांहून अधिक आहे. तरीही या मोठ्या लोकसंख्येला शिक्षण, रोजगार आणि संपत्तीच्या संधींपासून दीर्घकाळ वंचित राहावे लागले आहे. यामुळे केवळ सामाजिक विषमता नव्हे तर आर्थिक विकासालाही मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आणि विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांनी जातीव्यवस्थेचे केवळ वर्णन न करता तिचे सखोल, तर्कशुद्ध आणि वैज्ञानिक विश्लेषण केले. त्यांच्या मते जातीव्यवस्था ही केवळ सामाजिक समस्या नसून ती आर्थिक आणि राजकीय विषमतेचे मूळ आहे. त्यांनी जातीव्यवस्थेला "Division of Labourers" असे संबोधून तिच्या अन्यायकारक स्वरूपावर प्रकाश टाकला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या Annihilation of Caste या ग्रंथातून जातीव्यवस्थेच्या निर्मूलनाची ठाम भूमिका मांडली. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की सामाजिक समता प्रस्थापित केल्याशिवाय लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. त्यांच्या मते, समाज परिवर्तनासाठी केवळ कायदे पुरेसे नसून सामाजिक मानसिकतेत बदल होणे आवश्यक आहे.

आंबेडकरांनी जातीव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी एक सर्वसमावेशक आणि बहुआयामी मार्ग सुचवला. त्यांनी "Educate, Agitate, Organize" या त्रिसूत्रीच्या माध्यमातून सामाजिक जागरूकता, संघटन आणि संघर्ष यावर भर दिला. याशिवाय त्यांनी संविधानिक उपाययोजना, आर्थिक सुधारणा आणि बौद्ध धर्माचा स्वीकार या माध्यमातून समतेवर आधारित समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या विचारसरणीत सामाजिक न्याय, समता आणि बंधुता या मूल्यांना केंद्रस्थानी स्थान आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि आधुनिकतेच्या युगातही जातीव्यवस्थेचे विविध स्वरूपात अस्तित्व दिसून येते. शिक्षण, रोजगार आणि सामाजिक संबंधांमध्ये अजूनही सूक्ष्म किंवा उघड भेदभाव आढळतो. त्यामुळे आंबेडकरांनी सुचवलेला समाज परिवर्तनाचा मार्ग आजही अत्यंत प्रासंगिक आणि आवश्यक ठरतो.

या शोधनिबंधात जातीव्यवस्थेचे स्वरूप, तिचे सामाजिक-आर्थिक परिणाम आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुचवलेला तिच्या निर्मूलनाचा मार्ग यांचे सखोल आणि चिकित्सक विश्लेषण केले जाईल. तसेच त्यांच्या विचारांची सद्यकालीन उपयुक्तता आणि अंमलबजावणीतील मर्यादा यांचाही अभ्यास केला जाईल

संशोधनाची उद्दिष्टे :

1. जातीव्यवस्थेचे स्वरूप व परिणाम समजून घेणे.
2. डॉ. आंबेडकरांच्या जातीविषयक विचारांचे विश्लेषण करणे.
3. जाती निर्मूलनासाठी त्यांनी सुचवलेल्या उपायांचा अभ्यास करणे.
4. डॉ. आंबेडकरांच्या जातीविषयक विचारांची सद्यकालीन उपयुक्तता तपासणे.

सैद्धांतिक चौकट :

जातीव्यवस्थेच्या निर्मूलनाचा अभ्यास करताना केवळ वर्णनात्मक दृष्टिकोन पुरेसा ठरत नाही; त्यासाठी सुस्पष्ट सैद्धांतिक आधार आवश्यक असतो. या शोधनिबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना केंद्रस्थानी ठेवून सामाजिक न्याय, समता, मानवाधिकार आणि परिवर्तनवादी दृष्टिकोन या संकल्पनांवर आधारित सैद्धांतिक चौकट मांडली आहे.

सामाजिक न्याय :

सामाजिक न्याय म्हणजे समाजातील सर्व घटकांना समान संधी अधिकार आणि सन्मान मिळणे होय. अन्यायकारक रचना दूर करणे, आणि संसाधनांचे न्याय्य वितरण करणे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला अतिशय महत्त्व देतात. सामाजिक न्यायाशिवाय लोकशाही अपूर्ण असल्याचे ते मानतात.

समता :

समता ही आंबेडकरांच्या विचारांची केंद्रबिंदू आहे. ते सामाजिक समता, आर्थिक समता, राजकीय समता यांचे पुरस्कर्ते होते. जातीय भेदभावाचा अंत केल्याशिवाय सर्वांना समान सामाजिक स्थान प्राप्त होऊ शकत नाही यावर त्यांचा ठाम विश्वास होता. म्हणूनच त्यांनी जाती निर्मूलनासाठी प्रयत्न केले. भारतीय समाजामध्ये अत्यंत आर्थिक असमानता आहे. ही आर्थिक असमानता कमी करण्यासाठी त्यांनी संसाधनांचे समान वितरण करून आर्थिक विषमता कमी करण्यावर भर दिला. राजकीय समता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी समान मतदान अधिकाराचा पुरस्कार केला आणि सर्वांनाच राजकीय प्रतिनिधित्व मिळावे, प्रतिनिधित्वाची संधी मिळावी यासाठी प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समतेला लोकशाहीचे मूलभूत तत्व मानले. समता प्रस्थापित झाल्याशिवाय लोकशाही यशस्वी होऊ शकणार नाही यावर त्यांचा विश्वास होता.

मानवाधिकार :

मानवाधिकार म्हणजे प्रत्येक व्यक्तीला जन्मतः मिळणारे मूलभूत हक्क. समानता, स्वातंत्र्य, प्रतिष्ठा या मानवाधिकाराच्या मूलभूत संकल्पना आहेत. प्रत्येक व्यक्तीला जोपर्यंत समाजामध्ये समानता, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा मिळणार नाही. तोपर्यंत व्यक्तीच्या मानवाधिकाराचे संरक्षण होणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'जातीव्यवस्था या मानवाधिकाराच्या हक्कांचे उल्लंघन करते.' जातीव्यवस्थेतून अस्पृश्यता निर्माण झाली. जातीव्यवस्थेने अस्पृश्यांना माणूस म्हणून सुद्धा नाकारले. अस्पृश्यांचे सर्व अधिकार काढून घेतले. अस्पृश्यांच्या वाट्याला अत्यंत दयनीय जीवन आले. जातिव्यवस्थेने समाजामध्ये भेदभाव निर्माण केला. व्यक्तीला व्यक्तीपासून दूर ठेवले. जातिव्यवस्थेनेच सामाजिक बहिष्कार यासारखे क्रूर शस्त्र वापरून व्यक्तीच्या मानवाधिकाराचे उल्लंघन केले. डॉ. आंबेडकर मात्र व्यक्तीच्या मानवाधिकाराचा पुरस्कार करतात मानवाधिकारांचे संरक्षण झाले नाही तर समाज परिवर्तन होऊ शकणार नाही हे त्यांना माहिती होते आणि म्हणूनच त्यांनी मानवाधिकाराच्या संरक्षणासाठी महाड चवदार तळे, मंदिर प्रवेश सत्याग्रह अशा रूपाच्या चळवळीही केलेल्या दिसतात.

संघर्ष व परिवर्तन सिद्धांत :

जातीव्यवस्था ही शक्ती आणि संसाधनांच्या असमान वितरणावर आधारित आहे .आर्थिक राजकीय सामाजिक , शैक्षणिक ,धार्मिक अशा सर्वच स्वरूपाच्या सत्ता उच्च जाती स्वतःकडे ठेवतात आणि या सर्व सत्तांपासून निम्न जातींना वंचित ठेवतात .यात परिवर्तन करायचे असल्यास यासाठी संघर्ष संघटन आणि जागरूकता या गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत .डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी या त्रिसूत्रीचा वापर करत' शिका ,चेतवा ,संघटीत 'व्हा असा बहिष्कृत हितकारिणी सभेचे वेळी घोषवाक्य ठेऊन समाजामध्ये परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला.

रचनात्मक-कार्यात्मक व टीकात्मक सिद्धांत :

पारंपारिक विचार प्रवाहानुसार आणि मतानुसार जातीव्यवस्था सामाजिक स्थैर्य अबाधित ठेवते. सामाजिक स्थिरतेसाठी जातीव्यवस्था आवश्यक आहे, असे मानले जाते. मात्र टीकात्मक दृष्टिकोनातून पाहिल्यास जातीव्यवस्था शोषण आणि असमानता निर्माण करते. जातीव्यवस्थेत कनिष्ठ जातींचे दुबळ्या जातींचे अत्यंत शोषण होते. सर्व अधिकार उच्च जाती स्वतःकडे ठेवतात. त्यामुळे समाजात असमानता निर्माण होते आणि कनिष्ठ जाती केवळ शोषणाच्या बळी ठरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी टीकात्मक दृष्टिकोन स्वीकारला. जातीव्यवस्थेविरोधात काम केले. इतकेच नव्हे तर जातीव्यवस्था संपविण्यासाठी पुरेपूर प्रयत्न केला.

बौद्ध तत्त्वज्ञानाचा सिद्धांतिक आधार :

डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारून समतेवर आधारित समाजाची कल्पना मांडली. बुद्ध तत्त्वज्ञानाची प्रमुख तत्वे म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता न्याय, मैत्री, करुणा आणि मध्यम मार्ग होय. या तत्वांचा पुरस्कार करत समाजात परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला.

एकत्रित विश्लेषण :

जातीव्यवस्थेची सिद्धांतिक चौकट ही सामाजिक, न्याय, समता, मानवाधिकार, संघर्ष व परिवर्तन या सर्व संकल्पनांचा एकत्रित वापर करून विश्लेषित केली जाते. सिद्धांतिक चौकट स्पष्ट करते की जातीव्यवस्था ही केवळ सामाजिक समस्या नसून ती एक संरचनात्मक विषमता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुचवलेला मार्ग हा या

विषमतेवर मात करण्यासाठी वैज्ञानिक आणि प्रभावी मार्ग आहे. त्यांच्या विचारांवर आधारित ही चौकट समाज परिवर्तनासाठी उपयुक्त ठरते.

भारतीय जातीव्यवस्थेचे स्वरूप :

भारतीय समाजरचनेत जातीव्यवस्था ही एक प्राचीन, गुंतागुंतीची आणि बहुआयामी सामाजिक संस्था आहे. ही जातीव्यवस्था कशी तयार झाली याविषयी डॉ. जी.एस. धुर्वे (Dr. G. S. Ghurye) यांनी 'Caste Class and Occupation' (1961) या ग्रंथात म्हटले की, 'आर्य जेव्हा भारतात आले तेव्हाच त्यांच्या मध्ये ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे तीन सुस्पष्ट वर्ण निर्माण झालेले होते. आर्यांनी ज्यांच्यावर स्वामित्व मिळविलेले होते अशा येथील मूळच्या स्थानिक रहिवाशांचा समावेश शुद्रांमध्ये करण्यात आला'. 'हिंदू जातीव्यवस्था' ही आर्यांनी निर्माण केली या सेनार्ट यांच्या विचारांशी धुर्वे सहमत होते.'[1] ही जातीव्यवस्था केवळ सामाजिक विभागणी नसून धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय घटकांशी जोडलेली एक समग्र व्यवस्था आहे. अशा स्वरुपाची मांडणी डॉ. सक्सेना देखील करतांना दिसतात. ते म्हणतात, ' जाती हिंदू सामाजिक संरचनेचा मुख्य आधार आहे. जातीव्यवस्थेने हिंदूंचे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय जीवन प्रभावित केले आहे.'[2] भारतीय समाज व्यवस्थेचा अभ्यास करायचा असेल तर जातिव्यवस्थेच्या अभ्यासाशिवाय तो पूर्ण होऊ शकत नाही. या जाती व्यवस्थेने समाजाची श्रेणीबद्ध रचना निर्माण केली आहे. सामाजिक स्तरीकरणाचा अभ्यास करणाऱ्या लुई ड्यूमा यांनी सुद्धा भारतीय जाती व्यवस्थेचा अभ्यास करताना म्हटले की, 'जाती प्रथेच्या अध्ययनाशिवाय भारतीय समाजाचे अध्ययन पूर्ण होऊ शकत नाही.'[3]

भारतीय जातीव्यवस्थेचे वैशिष्ट्ये :

'डॉ.एन.के. दत्त यांनी 'Origin and Growth of Caste in India' या ग्रंथात आंतर्विवाही समूह, खानपानविषयक बंधन, व्यवसाय निश्चिती, उच्च-निच स्तरिकरण, जन्म आधारित सदस्यत्व, ब्राह्मणांच्या प्रतिष्ठेचा आधार अशी सहा वैशिष्ट्ये नमूद केले आहेत.'[4] तर धुर्ये यांनी पुढील प्रमाणे जातीची वैशिष्ट्ये सांगितली आहेत-

- **समाजाचे खंडात्मक विभाजन:** समाजाला जाती व्यवस्थेने विविध खंडात विभाजित केलेआहे. या खंडातील लोक म्हणजेच प्रत्येक जातीतील लोक आपली सामूहिक भावना स्वतःच्या जातीपूर्तीच मर्यादित ठेवतात. व्यक्तीनिष्ठ श्रद्धा फक्त आपल्याच जातीवर असते. एक जात दुसऱ्या जातीपासून अलिप्त असते.
- **सोपान परंपरा:** जातीनिष्ठ स्वरूपाच्या स्तर रचनेत श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या तत्वावर अनेक जाती समुदायाचे विभाजन झालेले असते. प्रत्येक जाती समुदायात उपजाती व पोटजातींची रचना देखील श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या तत्त्वावर आधारित असते. उच्च-निच व्यवस्थेत ब्राह्मण जातीचे श्रेष्ठ स्थान असून बाकी सगळ्या जाती कनिष्ठ असतात परंतु अस्पृश्यांपेक्षा श्रेष्ठ मानल्या जातात. जातींना उच्च वा कनिष्ट मिळणारे स्थान हे हिंदू धर्म विचारानुसार असल्यामुळे त्यामध्ये परिवर्तन होणे कठीण होते.
- **सामाजिक संबंध आणि खानपान विषयक निर्बंध :** श्रेष्ठ कनिष्ठतेच्या तत्वावर आधारलेल्या जातीनिहाय स्तर रचनेत व्यक्तीच्या वैयक्तिक, कौटुंबिक, व्यावसायिक संबंध किंवा वर्तन कसे असावे, याबाबतच्या नियम पालनाविषयी बंधने जाती समुदाय टाकत असे. जातिव्यवस्थेत परस्परांमध्ये खानपान विषयक अनेक निर्बंध होते. उच्च जाती कनिष्ठ जातींच्या पंक्तीत जेवण घेत नव्हते. त्यांच्या अन्न पाण्याला कनिष्ठ जातींच्या व्यक्तींनी साधा स्पर्शही केला तरी गैर मानले जात असे. 'धुर्येच्या मते, ब्राह्मणांनी तयार केलेले कच्चे अन्न व पक्के अन्न कनिष्ठ जातीचे लोक घेत होते. परंतु कनिष्ठ जातीच्या लोकांनी शिजविलेले पक्के अन्न वरिष्ठ जातीचे लोक ग्रहण करीत नव्हते. कच्चे अन्न मात्र स्विकारीत होते. एकूणच जाती व्यवस्थेत सामाजिक संबंध आणि खानपानविषयक कडक निर्बंध होते.'[5]
- **सामाजिक व धार्मिक अयोग्यता आणि विशेष अधिकार :** सामाजिक व धार्मिक क्षेत्रात उच्च जातीच्या लोकांना जे अधिकार प्राप्त झालेले असतात ते कनिष्ठ जातीच्या लोकांना प्राप्त होत नाहीत. वरिष्ठ जातीच्या लोकांना जी अधिकाऱ्यांची योग्यता असते ती योग्यता कनिष्ठ जातींच्या लोकांची नसते, अशी जाती रचनेची धारणा असते. वरिष्ठ जातीच्या लोकांना सामाजिक व धार्मिक क्षेत्रात जे विशेष अधिकार प्राप्त झालेले असतात, त्यांचा वापर आपली

प्रतिष्ठा दर्जा किंवा विशेष स्वरूपाचा लाभ करून घेण्याकरिता केला जातो आणि कनिष्ठ जातीच्या लोकांना त्यापासून वंचित ठेवले जाते.

- **व्यवसाय निवडीवर मर्यादा :** जातीव्यवस्थेमध्ये व्यक्तीला त्याच्या इच्छेनुसार व्यवसाय निवडण्याचा अधिकार नसतो. प्रत्येक व्यक्तीला त्याचा जन्मजात म्हणजेच वडिलोपार्जित मिळालेला व्यवसायच त्याला करावा लागतो. अप्रत्यक्षपणे व्यक्तीची आर्थिक परिस्थिती निर्धारित करण्याचा प्रयत्न जातिव्यवस्थेने केलेला आहे.
- **जोदिगर निवडीवर मर्यादा :** अंतर्विवाह हे जातीव्यवस्थेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे जातीतल्या जातीतच विवाह करण्याचे बंधन जातीव्यवस्थेत असते. त्यामुळे जाती अधिक घट्ट होत जातात.

भारतीय जातीव्यवस्थेचे परिणाम:

- **व्यवसाय स्वातंत्र्य नाही :** जातीव्यवस्थेनुसार प्रत्येक जातीचा व्यवसाय ठरलेला होता. ज्या जातीत व्यक्ती जन्माला येत असेल त्याच जातीचा व्यवसाय त्याला करणे बंधनकारक असे त्याला दुसरा व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य नसे.
- **मानवता विरोधी :** जातीव्यवस्थेचे विषमतामूलक मूल्य मानवता विरोधी आहेत. मानवाला निसर्गतः स्वातंत्र्य, समता न्याय या मानवी मूल्यांची शाश्वती मिळायला पाहिजे. मात्र भारतीय समाजात ही शाश्वती उच्चवर्णी यांनी कनिष्ठ जातींकडून काढून घेतली. उलट अनेक अमानवीय वर्तन कनिष्ठ जातीच्या लोकांसोबत वरिष्ठ जातींनी केले. अनेक अन्याय अत्याचार कनिष्ठ जातींवर करण्यात आले. मानव म्हणून जगण्याचे सर्व अधिकार हिरावून घेण्यात आले.
- **सामाजिक ऐक्याला तडा :** भारतीय समाजाचे जातीव्यवस्थेने विभाजन केल्यामुळे भारतीय समाज एक होऊ शकला नाही. आजही समाज जातीव्यवस्थेत अडकून आहे आणि केवळ जाति बांधवांचाच विचार जातीतील लोक करताना दिसत आहेत. त्यामुळे सामाजिक एकट्याला तडा जात आहे.
- **व्यक्ती स्वातंत्र्य आणि समान संधीचा अभाव :** जातीव्यवस्था श्रेष्ठ कनिष्ठतेच्या तत्वावर आधारित असल्यामुळे कनिष्ठ जातींवर विविध मर्यादा होत्या. काही क्षेत्रांमध्ये त्या अजूनही पहावयास मिळतात. व्यक्तीला स्वतःचा विकास करण्याची संधी जातिव्यवस्थेने दिली नाही. व्यवसाय, शिक्षण स्वतःची जीवनशैली निवडण्याचे स्वातंत्र्य दिले नाही. जातिव्यवस्थेत समान संधीचा अभाव पहावयास मिळतो.
- **सामाजिक गतीशिल्तेला अडथळा :** जातीचे सदस्यत्व जन्माने प्राप्त होते आणि जातीने मिळालेला दर्जा बदलता येत नाही. जातींच्या नियमाची कडक व्यवस्था असल्याने व्यक्तीच्या विकासाला अडथळा निर्माण होतो. कनिष्ठ जातीतील लोकांमध्ये कितीही गुण कौशल्य असले तरी त्यांचा दर्जा आणि स्थान बदलता येत नाही. त्यामुळे सामाजिक गतिशीलता स्थिरावते.
- **अस्पृश्यता :** जातिव्यवस्थेतून निर्माण झालेली अत्यंत क्रूर अशी अस्पृश्यता ही प्रथा आहे. अस्पृश्य जातींना मानव म्हणून समजण्यात आले नाही. त्यांच्या स्पर्शाचाही विटाळ मानण्यात आला. अस्पृशता कायद्याने नष्ट झाली असली तरी आजही अस्पृश्यतेच्या संबंधातील घटना पहावयास मिळतात. विविध समस्यांना अजूनही त्यांना तोंड द्यावे लागते आहे.
- **जातीवाद :** जाती व्यवस्थेने जातीवादाची भावना अधिक प्रबळ होते. प्रत्येक जात केवळ आपल्या जातीच्या हिताचाच विचार करते. सामाजिक विषमता टिकवण्याचे तंत्र जातीवादात दडलेले आहे. राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक इत्यादी सर्वच क्षेत्रात जातिवाद फोफावला आहे. म्हणूनच जातीवाद भारतीय समाजात एक ज्वलंत प्रश्न बनला आहे.
- **राष्ट्राच्या एकतेला बाधा :** जातीव्यवस्थेने व्यक्तीला स्वतःच्या जातीपुरते मर्यादित केले आहे. प्रत्येक व्यक्ती केवळ आपल्या जातीचाच विचार करते. त्यामुळे भारतीय समाजात जातीवाद बोकाळला आहे. आणि राष्ट्रीय भावनेचा विकास होताना दिसत नाही. राष्ट्रहित बाजूला ठेवून जातीभिमान वाढवला जातो. यातून राष्ट्राच्या एकट्याला बाधा निर्माण होते.

डॉ. आंबेडकरांचा जातीव्यवस्थेवरील दृष्टीकोण :

डॉ. आंबेडकरांनी केलेले जातीव्यवस्थेचे विश्लेषण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय जातीव्यवस्थेचे अत्यंत सखोल, वैज्ञानिक आणि चिकित्सक विश्लेषण केले. त्यांच्या मते जातीव्यवस्था ही केवळ सामाजिक संस्था नसून ती आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक विषमतेचे

मूळ आहे. त्यांनी या व्यवस्थेच्या उगम, रचना आणि परिणामांचा तर्कशुद्ध अभ्यास करून तिच्या निर्मूलनाची आवश्यकता अधोरेखित केली. जातीच्या उगमाविषयी डॉ. आंबेडकर म्हणतात, 'ब्राह्मणांनी प्रथम जात निर्माण केली ब्राह्मणांनी स्वतःभोवती प्रथम कुंपण टाकले व त्याचे अनुकरण इतर जातीने केले.'[6] जातीची वैशिष्ट्य सांगताना डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'जाती अंतर्गत विवाह हेच जातीचे एकमेव वैशिष्ट्य आहे. जातीच्या सदस्यांना जातीच्या बाहेर विवाह करण्याचा अधिकार नाही जातीच्या बाहेर विवाह करण्यासाठी अंतर्गत विवाहामुळे जात बंदिस्त झाली आहे म्हणून जात हा एक बंद झालेला वर्ग आहे.'[7] जातीला धर्माचा आधार आहे. जातीनुसार आचरण करणे हा धर्म आहे, अशी शिकवण हिंदू धर्मशास्त्राने दिली आहे. जातीप्रथेचे पालन करणे म्हणजेच धर्माचे पालन करणे असे लोकांची समजूत आहे. सर्व जातींचा दर्जा समान नाही. जाती हा श्रेष्ठ कनिष्ठतेच्या आधारावर विभाजित झाला आहे. जाती पद्धत ही श्रेणीपद्धत असून त्यात उच्च जातीला अग्रक्रम आणि कनिष्ठ जातीला इतरांपेक्षा न्यूनक्रम मिळतो. काही जाती इतर जातींपेक्षा श्रेष्ठ किंवा सर्वोच्च समजल्या जातात. ही सर्वोच्चता धार्मिकतेची निगडित आणि रुढीपरंपरेशी निगडित असते. या दोन्ही आधारावर श्रेष्ठ जातींचे वर्चस्व अबाधित राहते. प्रत्येक जातीचे स्वतंत्र नियम असतात जर कुणी स्वतःच्या जातीनुसार वर्तन करीत नसेल तर त्या व्यक्तीवर जातीचे लोक बहिष्कार टाकतात. अंतर्गत व्यवहाराबाबत एका जातीचा दुसरा जातीशी कोणत्याही संबंध येत नाही. प्रत्येक जातीचा परंपरागत व्यवसाय निश्चित असतो जातीचा जो कोणता व्यवसाय असेल तोच व्यवसाय करणे व्यक्तीला बंधनकारक असते.

डॉ. आंबेडकर यांनी केलेली जातीची समीक्षा :

जातीची आर्थिक समीक्षा : या संदर्भातले विश्लेषण डॉ. आंबेडकरांनी 'जातीचे निर्मूलन' या ग्रंथात केले आहे. श्रम विभागणी हे अर्थशास्त्राचे जगमान्य मुलतत्व आहे. 'श्रम विभागणी हे कुठल्याही सुसंस्कृत समाजाचे अत्यावश्यक असल्यामुळे जातीव्यवस्थेत काहीही गैर नाही असा युक्तिवाद केला जात होता. या युक्तिवादाचा खरपूस समाचार घेताना डॉ. आंबेडकर म्हणतात, जातीव्यवस्थेत केवळ श्रमांची विभागणी होत नाही तर श्रमिकांची देखील विभागणी होते.'[8] हे श्रम विभाजन उत्स्फूर्त किंवा मनुष्याच्या स्वभावाच्या प्रवृत्तीवर आधारलेले नाही तर त्याला जन्मजात हा एक आधार आहे. जातिव्यवस्थेमध्ये शूद्र आणि विशेषतः अतिशूद्र म्हणजेच अस्पृश्य जातींच्या लोकांचे प्रचंड आर्थिक शोषण केले जाते. याचे तरीसुद्धा आणि अतिशय जातीचे लोक त्याविरुद्ध संघर्ष करत नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे प्रत्येक जातीच्या लोकांमध्ये असलेली जाती जाणीव होय. जातींनी निर्माण केलेले श्रम विभाजन आणि श्रमिकांचे विभाजन हे आवड आणि भावना यावर आधारित नसते तर ती जन्मावर ठरवली जाते. यामध्ये डॉ. आंबेडकर म्हणतात, 'एक आर्थिक संस्थेच्या रूपात जात ही एक हानिकारक संस्था आहे कारण तिच्यामध्ये माणसांच्या नैसर्गिक शक्तींचे दमन होते आणि सामाजिक नियमांच्या तत्कालीन आवश्यकतांची प्रवृत्ती असते.'[9] जन्मजात व्यवसाय करण्याचे बंधन व्यक्तिवर असल्यामुळे व्यवसायात फेरफार किंवा समायोजन करण्यास मनाई आहे. त्यामुळे देशातील बेरोजगारीचे जात हे एक प्रत्यक्ष कारण बनले आहे, असे त्यांचे मत आहे. ते प्रतिपादन करतात की, 'जातीचे विभाजन अशा प्रकारे करण्यात आले आहे की, कोणत्याही विशेष लहान जाती ह्या प्रधान जाती पुढे नतमस्तक होतात. कारण प्रमुख जातीकडे बहुतांश जमीन असते त्या तुलनेत लहान जाती संख्येने कमी असतात आणि आर्थिक दृष्ट्या त्यांच्यावर अवलंबून असतात. त्यांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला दिला जात नाही त्यामुळे अधिकाधिक निर्धन आणि गरीब होत जातात.'[10]

जातीची राजकीय समीक्षा : राष्ट्रांनी राष्ट्राच्या एकतेमध्ये जातीव्यवस्थेने फार मोठा अडथळा निर्माण केला आहे. यासंदर्भात डॉक्टर आंबेडकरांचे विधान अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांच्या मते "जातीच्या आधारावर तुम्ही कोणतीही गोष्ट उभारू शकत नाही. तुम्ही राष्ट्राची उभारणी करू शकत नाही. तुम्ही नीतिमत्तेची उभारणी करू शकत नाही. जातीच्या पायावर तुम्ही जे काही बांधाल, ते कोसळून पडेल आणि ते एकच संघ कधीच होऊ शकणार नाही."[11] यातून डॉ. आंबेडकरांना सुचित करायचे होते की लोकशाहीच्या विकासामधील जातीव्यवस्था फार मोठा अडथळा आहे. राष्ट्र आणि राष्ट्रवादाच्या निर्मितीमध्ये अडथळा आहे. ते म्हणतात, देशातील सर्व लोकांमध्ये एकत्वाची भावना जातिव्यवस्थेने निर्माण होऊ दिली नाही. समाज एक संघ होण्यासाठी लोकांना सामाजिक कार्यांमध्ये सर्वांच्या बरोबर भाग घेता आला पाहिजे. म्हणजे सर्वांच्या मनात जे भावना असेल तेच त्याच्यातही जागवली जाते. मात्र जातीव्यवस्था अशा सामान्य कार्यास विरोध करून एक संघ जीवन आणि त्याची जाणीव असलेला समाज निर्माण होऊ देत नाही. अशाप्रकारे जात ही राष्ट्र आणि राष्ट्रवादीच्या निर्मितीमध्ये अडथळा असल्याचे ते स्पष्ट करतात. जातिव्यवस्थेने शूद्र आणि अतिशूद्रांना राजकीय सत्तेपासून वंचित ठेवले. त्यांना गुलाम बनविले. त्यामुळे बहुसंख्यांक असलेल्या शूद्र आणि

अतिशुद्र समाजात राजकीय क्षमतांचा विकास होऊ शकला नाही उलट त्यांच्यात राजकीय जाणिवेचा अभाव राहिला. त्यामुळे ते राजकीय अधिकारापासून अजूनही विन्मुख असलेले दिसतात.

जातीचे सामाजिक समीक्षा : जातिव्यवस्थेमुळे भारतीय समाजातील शूद्र आणि अतिशूद्रांचा सामाजिक विकास होऊ शकला नाही. त्यांच्यात विविध समस्या निर्माण झाल्या. शूद्र आणि अतिशूद्र विकासापासून वंचित राहिले. जातिव्यवस्थेने परस्परांमध्ये शत्रुत्वाच्या भावनेची वाढ केली त्यामुळे एकमेकांविषयी तिरस्कार आणि द्वेष निर्माण झाला. यातून समाजात सामाजिक एकतेचे भावना निर्माण होत नाही. म्हणून जातिव्यवस्था सामाजिक एकते मधील फार मोठा अडथळा असल्याचे ते स्पष्ट करतात. एक जात दुसऱ्या जातीच्या विकासामध्ये अडथळे निर्माण करते. सामाजिक सुदृढतेमध्ये अडथळा निर्माण करते. जातीव्यवस्थेतील ब्राह्मण जात वगळता सर्वच जातींवर अन्याय झाला आहे. परंतु कोणीही जातीच्या शोषणाविरुद्ध संघर्ष करण्याची तयारी ठेवत नाही. कारण कोणालाही जातिव्यवस्था नष्ट व्हावी असे वाटत नाही. जातिव्यवस्थेने एक प्रकारची मानसिक गुलामगिरी निर्माण केली आहे.

जातीव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मार्ग :

जातीव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेला मार्ग हा केवळ सुधारणा सुचवणारा नसून संपूर्ण समाजरचनेत मूलभूत परिवर्तन घडवून आणणारा आहे. त्यांच्या मते, जातीव्यवस्था ही भारतीय समाजातील सर्व प्रकारच्या विषमतेचे मूळ असून ती केवळ सामाजिक पातळीवर मर्यादित नसून आर्थिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रांमध्येही खोलवर रुजलेली आहे. त्यामुळे तिचे निर्मूलन करण्यासाठी केवळ एकाच क्षेत्रात बदल करून चालणार नाही, तर सर्व स्तरांवर समन्वित आणि व्यापक बदल घडवणे आवश्यक आहे.

आंबेडकरांनी जातीव्यवस्थेचा उगम आणि तिची रचना विश्लेषित करताना स्पष्ट केले की, ही व्यवस्था व्यक्तीच्या जन्मावर आधारित असून ती मानवी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या लोकशाही मूल्यांच्या पूर्णतः विरोधात आहे. त्यांच्या मते, जातीव्यवस्था ही "Division of Labour" नसून "Division of Labourers" आहे, म्हणजेच ती कामांचे नव्हे तर काम करणाऱ्या लोकांचे विभाजन करते. यामुळे व्यक्तीच्या क्षमता, आवड आणि कौशल्य यांना काहीही महत्त्व राहत नाही आणि सामाजिक प्रगतीला अडथळा निर्माण होतो. त्यामुळे या व्यवस्थेचे निर्मूलन हे केवळ नैतिकच नव्हे तर सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्याही अत्यावश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर आंबेडकरांनी समाज परिवर्तनासाठी "Educate, Agitate, Organize" ही त्रिसूत्री मांडली. त्यांच्या मते शिक्षण हे वंचित आणि शोषित वर्गाच्या सशक्तीकरणाचे सर्वात प्रभावी साधन आहे. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये जागरूकता निर्माण होते, अंधश्रद्धा आणि परंपरागत बंधने ढासळतात आणि स्वतःच्या हक्कांविषयी जाणीव निर्माण होते. परंतु केवळ शिक्षण पुरेसे नसून अन्यायाविरुद्ध संघर्ष करणे आणि संघटित होणेही तितकेच आवश्यक आहे. म्हणूनच त्यांनी सामाजिक चळवळींच्या माध्यमातून अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यावर भर दिला.

राजकीय क्षेत्रात आंबेडकरांनी संविधानिक उपाययोजनांना अत्यंत महत्त्व दिले. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत त्यांनी समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवले. त्यांनी मूलभूत अधिकारांच्या माध्यमातून सर्व नागरिकांना समान हक्क दिले आणि अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्यासाठी कायदेशीर तरतुदी केल्या. तसेच, अनुसूचित जाती आणि जमातींसाठी आरक्षणाची व्यवस्था करून त्यांनी त्यांना शिक्षण, रोजगार आणि राजकीय प्रतिनिधित्वात संधी उपलब्ध करून दिली. त्यांच्या मते, राजकीय सक्षमीकरणाशिवाय सामाजिक परिवर्तन अपूर्ण राहते.

आर्थिक क्षेत्रातही आंबेडकरांनी महत्त्वपूर्ण विचार मांडले. त्यांनी औद्योगिकीकरणाला प्राधान्य देऊन पारंपरिक जातीआधारित व्यवसायांची पकड कमकुवत करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते, आधुनिक उद्योग आणि शहरीकरणामुळे व्यक्तींना त्यांच्या जातीच्या बंधनातून मुक्त होण्याची संधी मिळते. याशिवाय त्यांनी जमीन सुधारणा, संसाधनांचे न्याय्य वितरण आणि राज्य हस्तक्षेप यावर भर दिला. आर्थिक समता साध्य केल्याशिवाय सामाजिक समता प्राप्त होऊ शकत नाही, ही त्यांची ठाम भूमिका होती.

धर्माच्या संदर्भात आंबेडकरांनी हिंदू धर्मातील जातीव्यवस्थेला कठोर विरोध केला. त्यांच्या मते, धार्मिक ग्रंथ आणि परंपरांनी जातिभेदाला वैधता दिली असून त्यामुळे सामाजिक असमानता टिकून राहिली आहे. म्हणूनच त्यांनी धर्माच्या पुनर्रचनेची आवश्यकता अधोरेखित केली. त्यांनी शेवटी बौद्ध धर्माचा स्वीकार करून समता, करुणा आणि तर्कशुद्धतेवर आधारित जीवनपद्धतीचा पुरस्कार केला. गौतम बुद्ध यांच्या शिकवणीवर आधारित समाजरचना हीच खऱ्या अर्थाने न्याय्य आणि समताधिष्ठित असू शकते, असे त्यांना वाटत होते.

आंबेडकरांच्या या सर्व उपाययोजनांमध्ये एक महत्त्वाची बाब म्हणजे सामाजिक मानसिकतेत बदल घडवण्यावर दिलेला भर. त्यांच्या मते, कायदे आणि धोरणे महत्त्वाची असली तरी समाजातील लोकांच्या विचारसरणीत बदल झाला नाही, तर खरे परिवर्तन शक्य नाही. त्यामुळे त्यांनी बंधुता (fraternity) या मूल्याला विशेष महत्त्व दिले. बंधुता निर्माण झाल्याशिवाय समाजात खऱ्या अर्थाने समता आणि न्याय प्रस्थापित होऊ शकत नाही.

जातीव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी आंबेडकरांनी मांडलेला मार्ग हा बहुआयामी, वैज्ञानिक आणि परिवर्तनवादी आहे. त्यांनी शिक्षण, संघर्ष, संघटन, संविधानिक उपाय, आर्थिक सुधारणा आणि धार्मिक परिवर्तन या सर्वांचा समन्वय साधून समाज परिवर्तनाची दिशा दिली. आजच्या काळातही जातीआधारित भेदभाव पूर्णतः नष्ट झालेला नसल्यामुळे त्यांचे विचार आणि मार्ग अत्यंत प्रासंगिक ठरतात. त्यांच्या दृष्टिकोनाची प्रभावी अंमलबजावणी केल्यास समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेवर आधारित एक न्याय्य समाज निर्माण करणे शक्य होईल.

डॉ. आंबेडकरांच्या जातीनिर्मुलनाच्या उपायांची उपयुक्तता, मर्यादा व अडचणी (चिकित्सक विश्लेषण) :

उपयुक्तता : जातीव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुचवलेले उपाय अत्यंत व्यापक, बहुआयामी आणि परिवर्तनवादी स्वरूपाचे आहेत. त्यांच्या उपाययोजनांची उपयुक्तता, मर्यादा आणि अडचणी समजून घेताना हे लक्षात येते की त्यांनी केवळ तात्कालिक सुधारणा नव्हे तर दीर्घकालीन सामाजिक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच त्यांच्या विचारांचे मूल्यांकन करताना त्यांच्या उपयुक्ततेबरोबरच प्रत्यक्ष अंमलबजावणीतील अडथळ्यांचाही विचार करणे आवश्यक ठरते.

आंबेडकरांच्या उपायांची सर्वात मोठी उपयुक्तता म्हणजे त्यांनी समाज परिवर्तनाचा एक सर्वसमावेशक आराखडा दिला. त्यांनी शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीच्या माध्यमातून वंचित समाजाला सशक्त करण्याचा मार्ग दाखवला. शिक्षणाला दिलेले महत्त्व हे विशेष अधोरेखित करावे लागते, कारण शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये आत्मविश्वास, जागरूकता आणि अधिकारांविषयीची जाणीव निर्माण होते. त्यामुळे सामाजिक गुलामीच्या साखळ्या तोडण्यास मदत होते. तसेच त्यांनी संविधानिक उपाययोजनांच्या माध्यमातून समानतेचे तत्त्व संस्थात्मक स्वरूपात लागू केले. मूलभूत अधिकार, अस्पृश्यतेचे उच्चाटन आणि आरक्षण यांसारख्या तरतुदींमुळे अनुसूचित जाती आणि जमातींना शिक्षण, रोजगार आणि राजकीय क्षेत्रात संधी मिळू लागली. या उपायांमुळे सामाजिक न्यायाची प्रक्रिया सुरू झाली आणि वंचित घटक मुख्य प्रवाहात येण्यास मदत झाली.

आंबेडकरांच्या उपायांची आणखी एक महत्त्वाची उपयुक्तता म्हणजे त्यांनी सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक अशा सर्व क्षेत्रांचा समन्वय साधला. त्यांनी औद्योगिकीकरण आणि आर्थिक पुनर्वाटपावर भर देऊन आर्थिक समतेची गरज अधोरेखित केली. त्यांच्या मते, आर्थिक सक्षमीकरणाशिवाय सामाजिक समता साध्य होऊ शकत नाही. त्याचबरोबर त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून समतेवर आधारित नैतिक मूल्यांची पुनर्स्थापना करण्याचा प्रयत्न केला. या सर्व उपाययोजनांमुळे समाजात समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांची जाणीव वाढण्यास मदत झाली.

मर्यादा : तथापि, या उपाययोजनांच्या काही मर्यादाही स्पष्टपणे दिसून येतात. सर्वप्रथम, आंबेडकरांनी सुचवलेल्या उपायांची अंमलबजावणी मोठ्या प्रमाणावर राज्य यंत्रणेवर अवलंबून आहे. अनेक वेळा धोरणे चांगली असली तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. उदाहरणार्थ, आरक्षण धोरणामुळे प्रतिनिधित्व वाढले असले तरी खाजगी

क्षेत्रात अजूनही समान संधी उपलब्ध नाहीत. तसेच, शिक्षणाच्या क्षेत्रात प्रवेश वाढला असला तरी गुणवत्ता आणि पूर्णता दर (dropout) अजूनही मोठे आव्हान आहे. त्यामुळे केवळ धोरणे तयार करणे पुरेसे नसून त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि सतत मूल्यांकन करणे आवश्यक आहे.

आंबेडकरांच्या उपायांतील आणखी एक मर्यादा म्हणजे सामाजिक मानसिकतेत बदल घडवण्याची प्रक्रिया अत्यंत धीमी आणि गुंतागुंतीची आहे. कायदे आणि धोरणे असली तरी समाजातील लोकांच्या मनोवृत्तीमध्ये खोलवर रुजलेली जातीयता सहजपणे नष्ट होत नाही. ग्रामीण भागात आजही वेगळ्या वस्त्या, सामाजिक भेदभाव आणि अस्पृश्यतेचे काही स्वरूप आढळते. शहरी भागातही सूक्ष्म (subtle) भेदभाव दिसून येतो, जसे की रोजगाराच्या संधींमध्ये किंवा सामाजिक संबंधांमध्ये. त्यामुळे सामाजिक परिवर्तनासाठी दीर्घकालीन प्रयत्नांची आवश्यकता आहे.

अडचणी : याशिवाय, आंबेडकरांच्या उपाययोजनांवर काही टीकाही करण्यात येते. काहींच्या मते, आरक्षणामुळे जातीची ओळख अधिक दृढ होते आणि समाजात विभाजन वाढू शकते. तथापि, ही टीका पूर्णपणे योग्य नाही, कारण आंबेडकरांनी आरक्षणाला तात्पुरते आणि सुधारात्मक (compensatory) उपाय मानले होते. परंतु, या संदर्भात धोरणांच्या कालबद्धतेबाबत आणि पुनरावलोकनाबाबत स्पष्टता आवश्यक आहे. ज्यासाठी आरक्षण सांगितले होते ते उद्देश पूर्णत्वास गेले का हे पाहणे देखील तितकेच रास्त आहे.

आर्थिक क्षेत्रातही काही अडचणी दिसून येतात. औद्योगिकीकरण आणि आधुनिकतेमुळे काही प्रमाणात जातीव्यवस्थेचा प्रभाव कमी झाला असला तरी आर्थिक विषमता अजूनही मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे. भूमिहीनता, बेरोजगारी आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांचे शोषण हे प्रश्न अजूनही गंभीर आहेत. त्यामुळे आंबेडकरांनी सुचवलेल्या आर्थिक सुधारणा पूर्णपणे अंमलात आणल्या गेल्या नाहीत, असे म्हणता येते.

धार्मिक परिवर्तनाच्या बाबतीतही काही मर्यादा आहेत. बौद्ध धर्माचा स्वीकार हा एक प्रभावी सामाजिक प्रतिकाराचा मार्ग असला तरी सर्व समाजघटकांनी तो स्वीकारलेला नाही. त्यामुळे धर्माच्या माध्यमातून संपूर्ण समाजरचनेत बदल घडवणे मर्यादित ठरते. तसेच, धार्मिक ओळख बदलल्याने लगेचच सामाजिक आणि आर्थिक स्थितीत सुधारणा होईलच असे नाही. धार्मिक परीवार्तानासोबत मानसिक परिवर्तन ही आवश्यक आहे, ही बाबही लक्षात घेणे आवश्यक आहे.

एकूणच पाहता, आंबेडकरांच्या उपाययोजनांची उपयुक्तता अत्यंत मोठी असून त्यांनी सामाजिक न्यायासाठी एक ठोस दिशा दिली आहे. मात्र, त्यांच्या अंमलबजावणीमध्ये अनेक संरचनात्मक, सामाजिक आणि मानसिक अडचणी आहेत. या अडचणी दूर करण्यासाठी केवळ सरकारी प्रयत्न पुरेसे नसून समाजातील सर्व घटकांनी सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. शिक्षणाचा प्रसार, सामाजिक जागरूकता, आर्थिक संधींची वाढ आणि नैतिक मूल्यांची जपणूक या माध्यमातूनच आंबेडकरांचा मार्ग प्रभावीपणे राबवता येईल. त्यांच्या विचारांची आजही प्रासंगिकता कायम असून, समताधिष्ठित आणि न्यायपूर्ण समाज निर्माण करण्यासाठी ते मार्गदर्शक ठरतात.

सद्यकालीन प्रासंगिकता:

"जातीव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी आंबेडकरांचा मार्ग: सध्याकालीन प्रासंगिकता" हा विषय समजून घेताना हे स्पष्ट होते की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले विचार केवळ ऐतिहासिक संदर्भापुरते मर्यादित नसून आजच्या भारतातही ते तितकेच उपयुक्त आणि आवश्यक आहेत. आधुनिक भारतात संविधानिक समानता, कायदे आणि धोरणे अस्तित्वात असली तरी सामाजिक वास्तवात जातीय विषमता विविध स्वरूपात टिकून आहे. त्यामुळे आंबेडकरांचा मार्ग आजच्या काळातही मार्गदर्शक ठरतो.

सर्वप्रथम, सामाजिक पातळीवर पाहिले तर आजही अनेक ठिकाणी जातीय भेदभाव पूर्णपणे नष्ट झालेला नाही. ग्रामीण भागात वेगळ्या वस्त्या, सामाजिक अंतर, आंतरजातीय विवाहांवरील विरोध, तसेच काही ठिकाणी अस्पृश्यतेचे बदललेले स्वरूप दिसून येते. शहरी भागात हे भेदभाव उघडपणे न दिसता सूक्ष्म स्वरूपात (subtle

discrimination) प्रकट होतात—उदा., नोकरीच्या संधी, घरभाडे, सामाजिक नेटवर्किंग यामध्ये. अशा परिस्थितीत आंबेडकरांनी दिलेले "Educate, Agitate, Organize" हे सूत्र आजही अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण सामाजिक जागरूकता आणि संघटनाशिवाय अशा सूक्ष्म भेदभावाला तोंड देणे कठीण आहे.

शैक्षणिक क्षेत्रातही आंबेडकरांचा दृष्टिकोन प्रासंगिक ठरतो. जरी शिक्षणाचा प्रसार वाढला असला तरी गुणवत्तापूर्ण शिक्षण, उच्च शिक्षणातील प्रवेश, आणि शिक्षण पूर्ण करण्याचे प्रमाण (dropout) या बाबतीत अनुसूचित जाती-जमाती अजूनही मागे आहेत. डिजिटल युगात "डिजिटल डिव्हाइड" ही नवीन समस्या निर्माण झाली आहे, ज्यामुळे तंत्रज्ञान आणि ज्ञानसंपन्नतेत असमानता वाढते. त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमातून सशक्तीकरण हा आंबेडकरांचा विचार आज अधिक व्यापक स्वरूपात लागू होतो.

आर्थिक क्षेत्रातही आंबेडकरांच्या विचारांची उपयुक्तता स्पष्टपणे दिसते. उदारीकरण आणि जागतिकीकरणामुळे नवीन रोजगार संधी निर्माण झाल्या असल्या तरी आर्थिक विषमता अजूनही मोठ्या प्रमाणात आहे. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांमध्ये अनुसूचित जाती-जमातींचे प्रमाण अधिक आहे. भूमिहीनता, बेरोजगारी आणि कमी वेतन या समस्या अजूनही कायम आहेत. अशा परिस्थितीत आंबेडकरांनी सुचवलेले आर्थिक न्याय, संसाधनांचे समान वितरण आणि राज्य हस्तक्षेप यांचे महत्त्व वाढते. "Inclusive growth" म्हणजेच सर्वसमावेशक विकास साधण्यासाठी त्यांचे विचार अत्यंत आवश्यक ठरतात.

राजकीय पातळीवर पाहता, आरक्षण धोरणामुळे अनुसूचित जाती-जमातींना प्रतिनिधित्व मिळाले आहे, परंतु राजकारणात जातीय समीकरणे अजूनही प्रभावी आहेत. "Vote bank politics" मुळे जाती ही अजूनही एक महत्त्वाची राजकीय ओळख बनलेली आहे. या पार्श्वभूमीवर आंबेडकरांनी मांडलेली लोकशाहीची संकल्पना—जी केवळ राजकीय नसून सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीवर आधारित आहे—आजही अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांच्या मते, लोकशाही टिकण्यासाठी समाजात समता आणि बंधुता असणे आवश्यक आहे, आणि ही बाब आजच्या परिस्थितीतही पूर्णतः साध्य झालेली नाही.

धार्मिक आणि सांस्कृतिक स्तरावरही आंबेडकरांचे विचार प्रासंगिक आहेत. त्यांनी धर्माला नैतिकतेशी जोडून पाहिले आणि समता, करुणा आणि तर्कशुद्धतेवर आधारित समाजाची कल्पना मांडली. आजच्या काळात वाढत्या सामाजिक तणावाच्या आणि ओळख-आधारित राजकारणाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या बौद्ध मूल्यांचा—समता, सहिष्णुता आणि बंधुता—विशेष महत्त्व आहे. गौतम बुद्ध यांच्या विचारांवर आधारित सामाजिक नैतिकता आजच्या बहुसांस्कृतिक समाजात समन्वय निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते.

तसेच, आधुनिक काळात सामाजिक माध्यमे आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्समुळे अभिव्यक्तीची संधी वाढली आहे, परंतु त्याचबरोबर जातीय द्वेष आणि भेदभावाचे नवे स्वरूपही दिसून येते. या संदर्भात आंबेडकरांचा तर्कशुद्ध, वैज्ञानिक आणि मानवतावादी दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा ठरतो. त्यांच्या विचारांमुळे सामाजिक चर्चेला दिशा मिळते आणि समतेच्या मूल्यांचा प्रसार होतो.

एकूणच, आंबेडकरांचा मार्ग हा केवळ भूतकाळातील समस्यांवर उपाय देणारा नसून तो आजच्या आणि भविष्यातील सामाजिक आव्हानांवरही उत्तर देणारा आहे. सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठा या मूल्यांवर आधारित त्यांची विचारसरणी आजच्या भारतासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे जातीव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी आंबेडकरांचा मार्ग सध्याच्या काळातही तितकाच प्रासंगिक, उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरतो.

निष्कर्ष : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेला जातीव्यवस्थेच्या निर्मूलनाचा मार्ग हा केवळ एका विशिष्ट काळापुरता मर्यादित नसून आजच्या आधुनिक, लोकशाही भारतासाठीही तितकाच आवश्यक आणि मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांमधील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे त्यांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि धार्मिक या सर्व स्तरांवर एकत्रित परिवर्तनाची आवश्यकता अधोरेखित केली. त्यांनी स्पष्ट केले की केवळ कायदे किंवा धोरणे बनवून

जातीव्यवस्था संपुष्टात येणार नाही; त्यासाठी समाजाच्या मानसिकतेत, मूल्यव्यवस्थेत आणि आचार-विचारांमध्ये मूलभूत बदल घडवणे आवश्यक आहे.

आजच्या काळात संविधानिक समानता, आरक्षण धोरणे, शिक्षणाचा प्रसार आणि विविध कल्याणकारी योजना यांमुळे वंचित घटकांच्या स्थितीत काही प्रमाणात सुधारणा झाली असली तरी सामाजिक वास्तवात जातीय भेदभाव विविध स्वरूपात अजूनही टिकून आहे. ग्रामीण भागात उघड स्वरूपातील भेदभाव दिसून येतो, तर शहरी आणि आधुनिक क्षेत्रांमध्ये तो अधिक सूक्ष्म आणि अप्रत्यक्ष पद्धतीने प्रकट होतो. या परिस्थितीत आंबेडकरांनी दिलेली "Educate, Agitate, Organize" ही त्रिसूत्री आजही अत्यंत प्रभावी ठरते, कारण ती केवळ हक्क मिळवण्यावर नव्हे तर त्या हक्कांसाठी सजग, संघटित आणि सक्रिय होण्यावर भर देते.

आंबेडकरांच्या मार्गाची उपयुक्तता त्यांच्या समताधिष्ठित आणि मानवतावादी मूल्यांमध्ये आहे. त्यांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांना केवळ राजकीय घोषवाक्य म्हणून नव्हे तर सामाजिक जीवनाचा पाया म्हणून मांडले. या मूल्यांची अंमलबजावणी केल्याशिवाय लोकशाही केवळ औपचारिक राहते, हे त्यांनी अधोरेखित केले. आजच्या काळात वाढती आर्थिक विषमता, सामाजिक तणाव आणि ओळख-आधारित राजकारण या पार्श्वभूमीवर त्यांच्या विचारांची आवश्यकता अधिक प्रकर्षाने जाणवते.

तथापि, त्यांच्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीत काही मर्यादा आणि अडचणीही आहेत. सामाजिक मानसिकता बदलण्याची प्रक्रिया धीमी आहे, तसेच धोरणांची प्रभावी अंमलबजावणी आणि सर्वसमावेशक विकास साध्य करणे हे मोठे आव्हान आहे. तरीही, या मर्यादा आंबेडकरांच्या विचारांचे महत्त्व कमी करत नाहीत; उलट त्या विचारांची सातत्याने पुनर्रचना आणि प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज अधोरेखित करतात.

एकूणच, जातीव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी आंबेडकरांचा मार्ग हा वैज्ञानिक, न्यायाधिष्ठित आणि दूरदृष्टी असलेला आहे. त्यांच्या विचारांचा सारांश असा की, समाजात खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवण्यासाठी कायदे, धोरणे, शिक्षण, आर्थिक संधी आणि नैतिक मूल्ये यांचा समन्वय आवश्यक आहे. त्यांच्या मार्गाचा स्वीकार आणि प्रभावी अंमलबजावणी केल्यासच समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेवर आधारित एक न्याय्य व समावेशक समाज निर्माण करणे शक्य होईल.

शिफारशी :

1. प्राथमिक ते उच्च शिक्षणात समान संधी उपलब्ध करून देणे.
2. डिजिटल दरी कमी करण्यासाठी तंत्रज्ञानाची उपलब्धता निर्माण करणे.
3. सामाजिक जागरूकता मोहिमा राबविणे.
4. वंचित घटकांचे संघटन आणि नेतृत्व विकास यावर भर देणे.
5. भेदभावविरोधी व अत्याचारविरोधी कायदे प्रभावीपणे राबवणे.
6. तक्रार निवारण यंत्रणा मजबूत करणे.
7. शिक्षण, नोकरी व प्रतिनिधित्वात प्रभावी अंमलबजावणी करणे.
8. गरजेनुसार सुधारणा आणि विस्तार करणे.
9. कौशल्य विकास, उद्योजकता यांना प्रोत्साहन देणे.
10. भूमिहीनांसाठी जमीन व संसाधनांची उपलब्धता करून देणे.
11. सामाजिक एकात्मता वाढवण्यासाठी प्रोत्साहन योजना राबवणे.
12. प्रत्येक व्यक्तीला सुरक्षा आणि सामाजिक समर्थन मिळेल याची जबाबदारी घेणे.
13. माध्यमे, शिक्षण आणि सांस्कृतिक उपक्रमांद्वारे समतेचा प्रसार करणे.

14. पूर्वग्रह कमी करण्यासाठी जनजागृती करणे.
15. समान संधी (Equal Opportunity) धोरणे लागू करणे.
16. विविधता आणि समावेशन (Diversity & Inclusion) उपक्रम राबविणे.
17. पायाभूत सुविधा, शिक्षण व रोजगाराच्या संधी ग्रामीण भागात वाढवणे.
18. समता, बंधुता आणि करुणा या मूल्यांवर आधारित सामाजिक संस्कारावर भर देणे.
19. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करणे.

संदर्भ सूची :

1. आगलावे प्रदीप , समाजशास्त्र विषय आणि संकल्पना ,श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2024, पृष्ठ क्र. 131
2. पाटील प्रमोद, समाजशास्त्र : परिचय आणि दृष्टीकोण, अंशुल पब्लिकेशन, नागपूर, 2016, पृष्ठ क्र. 180,181,
3. तत्रैव, पृष्ठ क्र. 181
4. तत्रैव, पृष्ठ क्र. 182
5. तत्रैव, पृष्ठ क्र. 183
6. गाठाळ एस. एस., आंबेडकरी चळवळीचा इतिहास,कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, 2010, पृष्ठ क्र.314
7. आगलावे प्रदीप, मुलभूत समाजशास्त्रीय विचार, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2014, पृष्ठ क्र. 137
8. जाधव नरेंद्र, डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्वज्ञान,सुगावा प्रकाशन, पुणे,1992 पृष्ठ क्र. 66
9. आगलावे प्रदीप, मुलभूत समाजशास्त्रीय विचार, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2014, पृष्ठ क्र. 145
10. तत्रैव
11. तत्रैव पृष्ठ क्र. 146

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींची सामाजिक स्थिती

संशोधक विद्यार्थिनी
कु. प्राची माणिकराव जहागिरदार
एम.ए, बी. एड, एम. फिल

प्रस्तावना :

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. देशातील मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या ही शेतीवर अवलबून आहे. परंतु गेल्या काही दशकामध्ये कृषी क्षेत्र अनेक संकटांना सामोरे जात आहे. वाढता उत्पन्न खर्च, पिकांचा अनिश्चित बाजारभाव, हवामानातील बदल, दुष्काळ, कर्जबाजारीपणा आणि अपुरी शासकीय मदत या कारणांमुळे अनेक शेतकरी आर्थिक आणि मानसिक तणावाखाली येतात. या परिस्थितीचा परिपाक म्हणून शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढलेले दिसते. जे समाजासाठी अत्यंत गंभीर आणि चिंताजनक आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येमुळे केवळ एका व्यक्तीचे जीवन संपत नाही, तर त्यामागे संपूर्ण कुटुंब उध्वस्त होते. विशेषतः त्या शेतकऱ्याच्या पत्नीवर याचा सर्वाधिक परिणाम होतो. अचानक आलेल्या या संकटामुळे ती महिला आर्थिक, सामाजिक आणि मानसिकदृष्ट्या असुरक्षित बनते. कुटुंबाचा मुख्य आधार गमावल्यामुळे तिच्यावर घर चालवण्याची, मुलांचे संगोपन करण्याची आणि कर्ज फेडण्याची जवाबदारी येते.

सामाजिक स्तरावरही ह्या महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. पारंपारिक रूढी, अंधश्रद्धा आणि पितृसत्ताक मानसिकतेमुळे त्यांना दुय्यम स्थान दिले जाते. अनेक वेळा त्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी होऊ दिले जात नाही. काही ठिकाणी त्यांच्याशी सहानुभूती दाखवली जाते. तर काही ठिकाणी त्यांना दुर्लक्षित केले जाते. पुनर्विवाहासंदर्भातही समाजात अजूनही अनेक बंधने आणि नकारात्मक दृष्टीकोन आढळतो.

याशिवाय, या महिलांच्या मानसिक स्थितीकडेही गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. पतीच्या मृत्युनंतर त्यांना एकटेपणा नैराश्य, भीती आणि असुरक्षितता याचा सामना करावा लागतो. समाजातील आधारव्यवस्था अपुरी असल्यामुळे त्यांच्या समस्या अधिक तीव्र होतात.

सरकारकडून विविध योजना आणि मदतीचे उपक्रम राबवले जात असले तरी त्या सर्व लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचत नाहीत. मदतीचा अभाव, प्रशासकीय अडचणी आणि भ्रष्टाचार यामुळे अनेक विधवा महिलांना या योजनांचा लाभ मिळत नाही.

या पार्श्वभूमीवर आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींच्या सामाजिक स्थितीचा सखोल अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या अडचणी, गरजा आणि समस्यांचे स्वरूप समजून घेतल्याशिवाय योग्य उपाययोजना आखता येणार नाहीत या संशोधनाचा उद्देश त्यांच्या जीवनातील वास्तव परिस्थिती उलगडून दाखवणे आणि त्यांच्या सक्षमीकारणासाठी प्रभावी उपाय सुचवणे हा आहे.

उद्दिष्टे :

१) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींची सामाजिक स्थिती समजून घेणे .
२) समाजातील त्यांची वागणूक तपासणे.
३) पुनर्वसनासाठी उपाय सुचवणे

गृहीतकृत्य :

१) विधवा महिलांना समाजात दुय्यम वागणूक दिली जाते.
२) निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग कमी असतो.

पद्धतीशास्त्र :

संशोधन हे अत्यंत महत्वाचे तंत्र असून त्याद्वारे तथ्य शोधून काढली जातात सामाजिक घटना आणि समस्या ह्याबाबत नवीन ज्ञान प्राप्त केले जाते. कोणत्याही वस्तू, विषय किंवा घटनेचे ज्ञान मिळवायचे असेल तर वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे असते. त्या शिवाय त्या वस्तू, विषय किंवा घटनांचे ज्ञान प्राप्त होणार नाही. याचाच अर्थ वैज्ञानिक पद्धत महत्वाची आहे. कारण वैज्ञानिक पद्धतीने त्या विषयीचे क्रमबद्ध (Systematic Knowledge)

ज्ञान मिळविले जाते. शास्त्र आणि विज्ञानाची अतिशय प्रसिद्ध व्याख्या "क्रमबद्ध ज्ञान" (Systematic Knowledge) अशी आहे. विज्ञान किंवा शास्त्र म्हणजेच क्रमबद्ध ज्ञान होय.

प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास करण्यासाठी द्वितीयक साहित्याचा उपयोग करण्यात आला असून त्यात प्रकशित मासिके, वर्तमानपत्रे आणि संदर्भ पुस्तकांचा उपयोग करण्यात आला आहे. विधवा महिलांची सामाजिक स्थिती आणि त्यांच्या अनुभवांचे सखोल विश्लेषण करण्यासाठी ही पद्धत उपयुक्त आहे.

ज्या वेळेस एखाद्या महिलेचा पती आत्महत्या करतो त्या वेळेस महिलेवरती अनेक प्रश्न उभी केले जातात. जरी शेतकऱ्याने शेतीच्या आर्थिक समस्यांमुळे आत्महत्या केली असेल तरी आपल्या पुरुषप्रधान संस्कृती असणाऱ्या देशात त्यात पहिले महिलेची चूक असेल हे अगदी सर्रासपणे गृहीत धरले जाते. नक्कीच पत्नीमध्येच काहीतरी कमतरता असेल किंवा पत्नीनेच नवऱ्याला काही त्रास दिला असेल म्हणून नवऱ्याने आत्महत्या केली असे समज समाज निर्माण करतो. पतीच्या आत्महत्येने महिला आधीच खूप खचलेली असते. तिच्या वर दुःखाचा डोंगर कोसळलेला असतो. अशा आवघड प्रसंगी समाजाकडून विधवा महिलेला कशी वागणूक मिळते हे अत्यंत महत्वाचे आहे. अशा प्रसंगात ती मानसिकरित्या पूर्ण खचून गेलेली असते. म्हणून हे संशोधन अत्यंत महत्वाचे आहे.

पतीच्या मृत्युनंतर अनेक महिलांना त्यांच्या घरात दुय्यम वागणूक दिली जाते. यांना महत्वाच्या निर्णयांमध्ये समाविष्ट करून घेतले जात नाही किंवा त्यांचे मतही विचारात घेतले जात नाही. त्यामुळे समाजातील अनेक लोकांकडून देखील तिला दुय्यम वागणूक दिली जाते. अनेक निर्णयांमध्ये तिला वेगळी वागणूक दिली जाते. जर पत्नी आर्थिक दृष्ट्या कमकुवत असेल , तिच्या नावाने काही जमीन, पैसे, घर नसेल तर तिला घरात मानाचे स्थान पण मिळत नाही. त्यामुळे तिला आर्थिक निर्णय घेण्याचे पण स्वातंत्र्य दिले जात नाही. पतीच्या निधनामुळे ती स्त्री अबला म्हणून गृहीत धरली जाते. सर्वात महत्वाचे म्हणजे जर विधवा पत्नीच्या दुसऱ्या लग्नाचा विचार करण्यासाठी तिला सामाजिक बंधनात बांधले जाते. खूप विदारक घटना म्हणजे घरातील मांगलिक कार्यामध्ये विधवा महिलांना सहभागी करून घेतले जात नाही त्यांना शुभ कार्यात सहभागी होण्यापासून रोकले जाते. ही समाजातील अत्यंत असंवेदनशील कृत्य आहे. त्यामुळे विधवा महिलेला घृणास्पद वागणूक दिली जाते. तिच्या मानसिक स्थितीचा विचार केला जात नाही. असे आत्तापर्यंत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींच्या सामाजिक स्थिती कोणताही लक्षणीय फरक आढळत नाहीये. त्यामुळे प्रस्तुत संशोधन होणे अत्यंत गरजेचे आहे.

निष्कर्ष विवेचन :

सादर संशोधनातून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा महिलांची सामाजिक स्थिती अत्यंत संवेदनशील आणि आव्हानात्मक असल्याचे स्पष्ट होते. गोळा केलेल्या माहितीच्या विश्लेषणावरून असे आढळून आले कि, बहुतांश विधवा महिलांना समाजात दुय्यम स्थान दिले जाते.

अनेक प्रतीसादकर्त्यांनी असे नमूद केले की, पतीच्या मृत्युनंतर त्यांच्या प्रति समाजाचा दृष्टीकोन बदलतो. त्यांच्याशी सहानुभूतीपेक्षा दया किंवा दुर्लक्षाची वागणूक दिली जाते. काही ठिकाणी त्यांना सामाजिक कार्यक्रमांमध्ये कमी सहभाग दिला जातो. किंवा त्यांना गौण मानले जाते.या परिस्थितीमुळे त्यांच्या आत्मसन्मानावर परिणाम होऊन त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होतो.

कुटुंबातील निर्णय प्रक्रियेबाबत महत्वपूर्ण निरीक्षणे समोर आली. त्याद्वारे असे समजले कि, अर्थिक, शैक्षणिक, किंवा मालमत्तेशी संबधित निर्णयांमध्ये त्यांचा सहभाग मर्यादित असतो. कुटुंबातील पुरुष सदस्य किंवा वडीलधारी मंडळीच मुख्य निर्णय घेतात. काही महिलांना स्वतःच्या आयुष्याशी संबधित निर्णय (उदा. मुलांचे शिक्षण, शेतीचे व्यवस्थापन) घेण्याचे स्वातंत्र्यही मिळत नाही. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग मर्यादित असतो.

या परीस्थितीमागे पारंपारिक पितृसत्ताक व्यवस्था, शिक्षणाचा अभाव, आर्थिक अवलंबित्व आणि सामाजिक रूढी या प्रमुख कारणीभूत आहेत. विशेषतः आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या महिलांना निर्णय प्रक्रियेत स्थान मिळण्याची शक्यता कमी असते. तथापि, काही अपवादात्मक प्रकरणांमध्ये असे आढळले कि,ज्या महिलांना शिक्षण, कुटुंबाचा पाठींबा आणि शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे , त्या महिलांनी स्वतःचे निर्णय घेण्याची क्षमता विकसित केली आहे आणि समाजात अधिक साशक्तस्थान निर्माण केले आहे. यावरून असे दिसते की, योग्य समर्थन मिळाल्यास परिस्थितीत सकारात्मक बदल होऊ शकतात.

एकूणच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा महिलांना सामाजिक स्तरावर अद्यापही अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यांच्या सक्षमीकारणासाठी केवळ आर्थिक मदत पुरेशी नसून सामाजिक दृष्टीकोनात बदल, शिक्षणाची संधी,आणि निर्णय प्रक्रियेत समान सहभाग देणे अत्यंत आवश्यक आहे.

संदर्भ सूची :

१) करे बिभीषण , २०१५ सामाजिक संशोधनाची मुलतत्वे , विद्या बुक पब्लिकेशन औरांपुरा संभाजीनगर

२) आगलावे प्रदीप , संशोधन पद्धतीशास्त्रे व तंत्रे

३) मैत्रेयी कृष्णराज , अरुणा कंची २०१३ भारताच्या महिला शेतकरी, नॅशनल बुक ट्रस्ट , इंडिया

४) महारष्ट्र शासन, कृषी विभाग – शेतकरी आत्महत्यावरील अहवाल

५) ए आर देसाई २०१९ एस. ए. जी. ए. पब्लिकेशन

'आठवणीचे पक्षी' आत्मकथनातील अनुभवविश्वाचे स्वरूपविशेष

डॉ. बडुरे दत्तात्रय मष्णाजी

मराठी विभाग, नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड

प्रास्ताविक:

१९६० नंतर मराठी साहित्यामध्ये दलित आत्मकथन हा एक महत्त्वाचा वाङ्मय प्रकार नव्याने निर्माण झाला. १९६०- ७० पर्यंतच्या काळात महाराष्ट्रातील बहुजन समाजातील मुले शैक्षणिक प्रवाहात आली नव्हती. मात्र १९६०- ७० च्या दरम्यान उपेक्षित, वंचित, शेतकरी कुटुंबातील मुलांनी शिकायला सुरुवात केली आणि शिकत असताना त्यांच्या वाचनात जे साहित्य आले. त्या साहित्याचा आस्वाद घेतल्यानंतर त्यांना असे जाणवू लागले की, यांच्या साहित्यकृतीतील अनुभवापेक्षा आपले अनुभव हे भयानक स्वरूपाचे आहेत. शिकलेल्या तरुणांना वाटू लागले. त्यांनाही जाणीव होऊ लागली. आपल्या जीवनातील अनुभव आपण का लिहू नये. तेव्हा आपले विचार, भावना, कल्पना याच्या साह्याने त्यांनी साहित्य लिहायला सुरुवात केली. त्यांचे जीवननुभव हे शब्दद्वारे मांडू लागले.त्यांच्या वाट्याला आलेले दुःख, वेदना, अस्पृश्यता,भूक याचे चित्रण दलित आत्मकथनातून येऊ लागले आत्मकथने मराठी दलित साहित्यात भरपूर प्रमाणात लिहिल्या गेली. त्यामध्ये बलुतं, आठवणीचे पक्षी, अक्करमाशी, उपरा, उचल्या,कोल्हाट्याच पोर, माझ्या जन्माची चित्तरकथा, अशी कितीतरी आत्मकथने मराठी वाङ्मयामध्ये निर्माण झाली.

प्रा. प्र.ई. सोनकांबळे यांचे 'आठवणीचे पक्षी' हे एक आत्मकथन अत्यंत महत्त्वाचे आत्मकथन म्हणून मराठी साहित्यात ओळखले जाते. या आत्मकथनाचा मराठी साहित्यातच नव्हे तर जगभरात वेगळा दर्जा निर्माण झाला. मराठी भाषेव्यतिरिक्त इंग्रजी, कानडी, हिंदी तेलुगु अशा अनेक भाषेमध्ये या आत्मकथनाची भाषांतर होऊन भारतामध्ये एक दलित साहित्यातील महत्त्वाचे आत्मकथन म्हणून ओळखले गेले. म्हणून या शोधनिबंधामध्ये प्र.ई.सोनकांबळे यांच्या आत्मकथनातील अनुभवविश्वाचे स्वरुपविशेष याचा विचार करणे महत्त्वाचे आहे.

उद्दिष्टे :

१) 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनातून जीवन जगण्यासाठी करावा लागलेला संघर्ष लक्षात येतो.

२) आठवणींचे पक्षी' या आत्मकथनातून भूक भागविण्यासाठी कोणता संघर्ष वाट्याला येतो हे कळते.

३) आठवणींचे पक्षी' या आत्मकथनामध्ये दलित समाजाच्या वाट्याला आलेले दुःख,वेदना कशाप्रकारचे आहे हे लक्षात येते.

४) 'आठवणीचे पक्षी' या आत्मकथनातून लेखकाबरोबर समाजाचे जीवन कशाप्रकारचे होते ते लक्षात येते.

आत्मकथन म्हणजे काय :

जगामध्ये कथा सांगण्याची आणि ऐकण्याची लोकपरंपरा फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. कथा सांगणे आणि ऐकणे ही मानवाची सहजप्रवृत्ती आहे. कथन करणे ही नैसर्गिक क्रिया आहे.माणसाला नेहमी दुसऱ्याने काहीतरी सांगावेसे वाटते आणि तिसऱ्याला ऐकावी वाटते. स्वतःला आलेले अनुभव इतरांना सांगून जे आपण जगलो ते दुसऱ्यांना सांगून मोकळे व्हावे. ही भावना सांगणाऱ्या व्यक्तीमध्ये निर्माण होते आणि त्याला सांगून मोकळे व्हावे

असे वाटते. ऐकणाऱ्याला दुसऱ्याचे अनुभव ऐकावेसे वाटते. एक सहज नैसर्गिक मानवीप्रवृत्ती आहे.म्हणूनच प्रा.प्र.ई.सोनकांबळे यांनी आपल्याला आलेले अनुभव निःसंकोचपणे मांडले आहे. आत्मकथन या साहित्य प्रकाराची व्याख्या सांगताना अनेक समीक्षकांनी वेगवेगळ्या व्याख्या केलेले आहेत.

१) डॉ. सदा कऱ्हाडे :

"स्वतः स्वतःचे चरित्र लिहायचे म्हणजे एक प्रकारचे आत्मनिवेदन, आत्मप्रकटीकरण, आत्मकथन, करण्यासारखे आहे."

२) डॉ. प्रकाश मेदककर :

"आत्मकथन व आत्मचरित्र यामध्ये लेखकाचा वयोगट, जीवनाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन, आशयद्रव्याशी लेखकाचे असणारे गतिमान नाते व त्याला पूरक असणारी भाषिकशैली यांच्या दृष्टीने अंतर्बाह्य पुरक असल्याचे दिसून येते".

आठवणीचे पक्षी आत्मकथनातील अनुभवविश्व स्वरूपविशेष :

प्र. ई. सोनकांबळे यांच्या 'आठवणीचे पक्षी' या आत्मकथनातील अनुभवविश्व हे मराठवाड्यातील उदगीर, अहमदपूर, जळकोट या परिसरातील बालपणीच्या आठवणी आहेत. तर काही लेखातून औरंगाबाद येथील आठवणी आहेत. त्यांच्या आत्मकथनात बालपण आणि विद्यार्थी दशेतील जीवनाचे दर्शन प्रामुख्याने दिसून येते. आत्मकथनाच्या मनोगतात प्रा. सोनकांबळे लिहितात, मी माझ्या लिखाणात माझ्या जीवनात आलेल्या अनेक खडतर भयानक अनुभवाचे नागडे - उघडे चित्र माझ्या बोली भाषेत केल्याचे पाहून मोठे सर व बाजूचे दोन्ही सर भारावून गेले व म्हणाले, तुम्ही सारखे लिहीत चला. न लाजता. तुम्हाला खूप सांगायचंय तुमच्या पोटात खूप साचले ते बाहेर येऊ द्या. म्हणजे मोकळं कॅथॉरसिस झाल्यासारखं वाटेल तुम्हाला".

मोठे सर म्हणजे प्राचार्य डॉ. म.ना वानखेडे हे होते. त्यांच्या सहवासात राहिल्यामुळे लेखन कार्याला प्रोत्साहन मिळाले असे स्वतः लेखक म्हणतो. 'आठवणीचे पक्षी' या आत्मकथनातून दलित जीवनाच्या मुलगामी दुःखाचे, वेदनेचे चित्रण आलेले आहे. बालपणातील आणि विद्यार्थी जीवनातील हालआपेष्टांचे जगणे आत्मकथनातून आले आहे. आरंभी या आत्मकथनात १५ लेख होते. मात्र नंतरच्या आवृत्तीमध्ये ही लेख संख्या २८ अशी झालेली आहे.

२८ लेख वेगवेगळे असले तरी या लेखातून उदगीर, शिरूर, चेरा, वांजरवाडा या परिसरातील बालवयातील अनुभवविश्व मांडले आहे. लेखकाचे आई-वडील वारल्यानंतर निवारा व पोटापाण्याचा प्रश्न गंभीर असल्यामुळे प्र. ई. सोनकांबळे आपल्या बहिणीकडे चेऱ्याला येतात. तेव्हा त्या गावातील लोकांकडून मिळालेली वागणूक अपमान सहन करून भुकेसाठी, जगण्यासाठी कसा संघर्ष करावा लागला. ते या विविध लेखातून आपले जीवनानुभव विश्व मांडतात. ते वेगवेगळ्या लेखातून लक्षात येते. उदाहरणार्थ 'गोष्ट पाटी पुस्तकाची', 'असे ते दिवस', 'तु बी माणूस हैस', 'बाभळीची साल', हाडकं, गिरणीचे पीठ, कणसाचे थाट, उंटावरचा प्रवास, कथा आणि व्यथा, पैशाला एक दगड अश्या वेगवेगळ्या लेखातून विविध अनुभव चित्रित केलेले आहेत.

'परक्षा' या लेखातील अनुभव सांगताना ते लिहितात, "म्हातारीनं मला सांगितलं की अरं आमच्या वतलात कुत्र मरून पडलंय. जरा काढून तर टाक रं. देईन तुला अर्धी चतकोर भाकर. मला वाटलं, चला बरं झालं. काम मिळालं गड्या. मन काबुत ठेवलो. नी त्या कुत्र्याच्या शेपटीला धरलो. धरलं तर शेपटाच्या शेवटचा भाग माझ्या हातातच आला. कारण तो होता सडका. मला वास येत होता. पण लालूचही व्हती, चतकोर का होईना भाकरी मिळण्याची.

त्या म्हातारीनं म्हनलं आरं ही घे दोरी ने बांध गच्च शेपटाला नि घेऊन जा ओढीत. तसा केलो; पण त्याचे सालवे सालवे निघत होते व लोक माझ्याकडे किळसवाण्या नजरेने बघत होते व म्हणत होते. की, कार घाण चालवली रस्त्याने नुसता वास सुटलाय."

या लेखातून लेखकाने आपला अनुभव व्यक्त करताना कुठलाही संकोचपणा न करता प्रांजळपणाने आपण जे अनुभव अनुभवले ते मांडले. दुःख, दैन्य, भुकेसाठी करावा लागलेला संघर्ष, अस्पृश्यता, वेदना या विशेषाच्याच अनुषंगाने आत्मकथनामध्ये विविध अनुभव आलेले आहेत. चतकोर भाकरीसाठी प्रल्हाद घाण कुत्र गावाच्या बाहेर नेऊन टाकतो.तरीही त्याला भाकर देत नाही. पुढे त्या घरची स्त्री म्हणते, तुला बलुतं दिल जातं. भाकर कशाची मागतो रे असे म्हणून हिनवते. अशा त्रासातून लेखक शिकतो मोठा होतो. तरीही औरंगाबाद गावाकडे येतो. तेव्हा 'उंटावरचा प्रवास' या याविषयीचा अनुभव व्यक्त करताना सांगतात.मी माझी जात सांगितली की उंटवाला बोलतचं नाही. अश्या अनेक लेखातून वेगवेगळे अनुभव मांडले.

प्र.ई.सोनकांबळे कुठल्याही प्रकारचा खोटा आव न आणता आपल्या आयुष्यातील संघर्षमय जीवनाची कहाणी येथे सांगतात. दलित समाज जीवनाच्या वाट्याला हजारो वर्षापासून भुकेसाठी करावा लागलेला संघर्ष त्यांच्या 'आठवणीचे पक्षी' या आत्मकथनातून मांडला आहे.म्हणून प्रा.वामन निंबाळकर म्हणतात, "जाती व्यवस्थेच्या विषमतेने कोवळ्या प्रल्हादचे काय काय हाल झाले. याचे मनाला सुन्न करणारे विदारक अनुभव 'आठवणीची पक्षी' वाचकांसमोर ठेवते. अर्धी, चतकोर, विटलेली, शिळी भाकर मिळावी म्हणून सडक कुत्र ओढणारा, शेन काढून गोठा साफ करणारा, लाकडे फोडणारा किंवा मिळेल ते काम मरेस्तोर करणारा परलाद वाचकास नुसताच अस्वस्थ करत नाही. तर या विषम समाज व्यवस्थेची चिड निर्माण करतो. व विद्रोहाचा ज्वालामुखी धगधगत ठेवतो." म्हणून असे म्हणता येते की प्र.ई.सोनकांबळे यांच्या 'आठवणीचे पक्षी' या आत्मकथनातील सर्वच अनुभव मनाला प्रचंड वेदना देणारे आहेत. त्यांचे अनुभव दुःखदायी आहेतच. तेवढेच वेदनादायी आहेत. म्हणूनच या आत्मकथनाची चर्चा महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर झालेली आहे.

समारोप :

१९६० नंतर मराठी साहित्यात दलित साहित्य हा वाङ्मय प्रवाह महत्त्वाचा साहित्य प्रवाह म्हणून ओळखला जातो. या साहित्य प्रवाहात कथा, कविता, कादंबरी, आत्मकथने भरपूर प्रमाणात निर्माण झाली आहेत. त्यामध्ये बलुतं, अक्करमाशी, उपरा, उचल्या, तराळ -अंतराळ, आत्मकथनाबरोबरच स्त्री आत्मकथने देखील पुष्कळ प्रमाणात निर्माण झाली आहेत. माझ्या जल्माची चित्तरकथा', जिचं आमुच, अंत: स्फोट आदी आत्मकथने मराठी वाङ्मयात निर्माण झाली असली तरी 'आठवणींचे पक्षी' हे आत्मकथन विशेष आहे. या आत्मकथनात भूक, दुःख,अस्पृश्यता, वेदना, जगण्यासाठी करावा लागलेला संघर्ष,या वैशिष्ट्यांमुळे हे आत्मकथन वाचकांच्या मनात अस्वस्थता निर्माण करते. एवढेच नाही तर मानवतेची सेवा करावी ही भावना निर्माण करते.या आत्मकथनामुळे मराठी साहित्य समृद्ध झाले आहे. प्र.ई.सोनकांबळे या आत्मकथनात कुठेही आपल्या लेखनातून आक्रस्ताळेपणा करत नाहीत. चिड व्यक्त करताना दिसत नाहीत.शांत संयमीपणाने आपली अनुभवाची मांडणी करतात. हे एक विशेष आहे.

संदर्भ ग्रंथ :

१) फडके डॉ. भालचंद्र, दलित - साहित्य : वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

२) मुलाटे डॉ. वासुदेव, दलितांची आत्मकथने : संकल्पना व स्वरूप, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.

३) खरात शंकरराव, दलित वाङ्मय प्रेरणा व प्रवृत्ती, इनामदार बंधू प्रकाशन, पुणे.

४) जाधव डॉ. मनोहर, दलित स्त्रियांची आत्मकथने : स्वरूप आणि चिकित्सा, सुविद्या प्रकाशन, पुणे.

५) लुलेकर डॉ. प्रल्हाद, वेदनांचा प्रदेश (मराठवाड्यातील दलित आत्मकथने),कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

६) निंबाळकर वामन, दलित साहित्य स्वरूप व भूमिका, प्रबोधन प्रकाशन, नागपूर.

संत गाडगेमहाराजांचे सामाजिक विचार आणि समाजपरिवर्तनातील योगदान : एक चिकित्सक अभ्यास

पाटील शीतल अविनाश
सामाजिक शास्त्रे संकुल,
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड

सारांश :

संत गाडगेमहाराज हे महाराष्ट्रातील विसाव्या शतकातील एक महान समाजसुधारक, संत आणि समाजप्रबोधक होते. त्यांनी आपल्या कीर्तन, प्रवचन आणि प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, अस्पृश्यता, हुंडा प्रथा, अस्वच्छता आणि अशिक्षण यांविरुद्ध प्रभावी लढा उभारला. त्यांच्या विचारांमध्ये मानवता, समता, स्वच्छता, शिक्षण, विवेकनिष्ठता आणि मानवसेवा यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये संत गाडगेमहाराजांच्या सामाजिक विचारांचा आणि समाजपरिवर्तनातील त्यांच्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास करण्यात आलेला आहे. हा अभ्यास ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीच्या आधारे करण्यात आला असून विविध संदर्भग्रंथ, लेख आणि उपलब्ध साहित्याचा उपयोग करण्यात आलेला आहे. या अभ्यासातून असे स्पष्ट होते की, संत गाडगेमहाराजांचे विचार आजच्या आधुनिक समाजातही अत्यंत उपयुक्त आणि प्रेरणादायी आहेत.

की-वर्ड्स : संत गाडगेमहाराज, समाजप्रबोधन, अंधश्रद्धा निर्मूलन, समता, मानवता, समाजपरिवर्तन, महाराष्ट्र

प्रस्तावना

भारतीय संतपरंपरेने समाजजागृती आणि समाजसुधारणेचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. महाराष्ट्रातील संतांनी भक्तीबरोबरच समता, नैतिकता आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला. या संतपरंपरेमध्ये संत गाडगेमहाराज यांचे स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांनी धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या अंधश्रद्धा, जातिभेद आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध संघर्ष करून समाजात विवेकनिष्ठ विचारांची रुजवात केली.

संत गाडगेमहाराजांनी केवळ उपदेश केला नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून समाजप्रबोधन घडवून आणले. हातात झाडू घेऊन गावांची स्वच्छता करणे, गरीब आणि वंचितांसाठी धर्मशाळा व वसतिगृहे उभारणे, शिक्षणाचा प्रसार करणे आणि मानवसेवेचा संदेश देणे हे त्यांच्या कार्याचे प्रमुख पैलू होते. "मानवसेवा हीच ईश्वरसेवा" हा त्यांचा मूलभूत विचार होता.

संत गाडगेमहाराजांचे समाजसुधारणेचे कार्य

संत गाडगेमहाराजांनी समाजसुधारणेसाठी अत्यंत प्रभावी कार्य केले. त्यांनी समाजातील अज्ञान, अस्वच्छता, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांना समाजाच्या अधोगतीची प्रमुख कारणे मानले. गावोगावी फिरून त्यांनी लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. ते स्वतः सार्वजनिक ठिकाणे साफ करत आणि त्यानंतर कीर्तनाद्वारे लोकांना सामाजिक संदेश देत. त्यांच्या मते, स्वच्छता हीच खरी पवित्रता आहे. त्यांनी लोकांना श्रमसंस्कार, नैतिकता आणि साधेपणाचे महत्त्व पटवून दिले. समाजातील गरीब, शोषित आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले.

जातिवादाविरुद्ध संघर्ष

संत गाडगेमहाराजांनी जातिभेद आणि अस्पृश्यतेचा तीव्र विरोध केला. त्यांच्या मते, सर्व माणसे समान आहेत आणि प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. त्यांनी सहभोजन, सामुदायिक कार्यक्रम आणि कीर्तनांच्या माध्यमातून सामाजिक समतेचा संदेश दिला. त्यांनी लोकांना प्रश्न विचारून जातिव्यवस्थेतील विसंगती दाखवून

दिली. "जर सर्व माणसांचे हात, पाय आणि शरीररचना सारखीच असेल, तर जातिभेदाचा आधार काय?" असा प्रश्न उपस्थित करून त्यांनी लोकांना विचार करण्यास भाग पाडले.

अंधश्रद्धेविरुद्ध लढा

संत गाडगेमहाराजांनी अंधश्रद्धेला समाजाच्या प्रगतीतील मोठा अडथळा मानले. त्यांनी नवस, झाडफुंक, भोंदूबाबा, जादूटोणा, प्राण्यांचे बळी आणि विविध अवैज्ञानिक प्रथांचा कठोर विरोध केला. त्यांच्या मते, देव दगडात नसून माणसात आहे. त्यांनी लोकांना विवेक, विज्ञान आणि मानवतेचा स्वीकार करण्याचे आवाहन केले. त्यांच्या कीर्तनांमध्ये सामाजिक वास्तवाचे प्रभावी चित्रण असे. त्यामुळे सामान्य लोक सहजपणे त्यांच्या विचारांशी जोडले जात. त्यांनी लोकांना समजावले की, अंधश्रद्धेमुळे समाजात भीती, शोषण आणि अज्ञान वाढते. त्यामुळे विवेकनिष्ठ आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे अत्यंत आवश्यक आहे.

शिक्षण आणि स्वच्छतेचे महत्त्व

संत गाडगेमहाराजांनी शिक्षणाला अत्यंत महत्त्व दिले. त्यांच्या मते, शिक्षणाशिवाय समाजाची प्रगती शक्य नाही. त्यांनी गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्याचप्रमाणे स्वच्छता हे त्यांच्या कार्याचे मुख्य वैशिष्ट्य होते. त्यांनी स्वच्छतेला धार्मिकतेपेक्षा अधिक महत्त्व दिले. सार्वजनिक आरोग्य, स्वच्छ गाव आणि स्वच्छ जीवनशैली यांचा त्यांनी सातत्याने प्रचार केला.

मानवतावादी विचारसरणी

संत गाडगेमहाराजांच्या विचारांचा केंद्रबिंदू मानवता होता. त्यांनी दुःखी, गरीब, पीडित आणि वंचित लोकांसाठी कार्य केले. त्यांनी धर्मशाळा, अन्नछत्रे, वसतिगृहे आणि समाजोपयोगी संस्था उभारल्या. त्यांच्या मते, खरा धर्म म्हणजे माणसाची सेवा. त्यांनी समाजातील प्रत्येक व्यक्तीकडे समानतेने पाहिले आणि मानवतावादाचा पुरस्कार केला.

समाजपरिवर्तनातील योगदान

संत गाडगेमहाराज यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रात व्यापक सामाजिक जागृती निर्माण झाली. त्यांनी आपल्या कीर्तन, प्रवचन आणि प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या कार्यामुळे समाजामध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण झाली आणि सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व लोकांना पटले. शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे सामान्य जनतेमध्ये शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टीकोन विकसित झाला. तसेच त्यांच्या समतेच्या संदेशामुळे जातिभेद आणि उच्च-नीचतेच्या विचारांना आव्हान मिळाले व सामाजिक समतेची भावना अधिक दृढ झाली. त्यांनी विवेक, विज्ञान आणि मानवतेवर आधारित जीवनमूल्यांचा पुरस्कार केल्यामुळे समाजात विवेकनिष्ठ दृष्टिकोन विकसित होण्यास मदत झाली. त्यामुळे संत गाडगेमहाराजांचे कार्य हे महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत अत्यंत प्रभावी आणि प्रेरणादायी ठरले. त्यांच्या विचारांचा प्रभाव आजही विविध सामाजिक चळवळींमध्ये दिसून येतो.

आधुनिक काळातील उपयुक्तता

आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने अभूतपूर्व प्रगती केली असली, तरी समाजामध्ये अंधश्रद्धा, जातीयता आणि सामाजिक विषमता यांसारख्या समस्या अजूनही अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत संत गाडगे महाराज यांचे विचार आजच्या काळात अधिक महत्त्वपूर्ण आणि मार्गदर्शक ठरतात. त्यांनी मांडलेला वैज्ञानिक दृष्टिकोन, समतेचा संदेश, शिक्षणाचे महत्त्व, मानवसेवेचा आदर्श आणि स्वच्छतेवरील आग्रह हे आधुनिक समाजाच्या उन्नतीसाठी अत्यंत आवश्यक मूल्ये आहेत. त्यांच्या विचारांमधून विवेकनिष्ठ, समताधिष्ठित आणि मानवतावादी समाजव्यवस्था निर्माण करण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळे संत गाडगेमहाराजांचे कार्य आणि विचार हे आजच्या समाजासाठी प्रेरणादायी तसेच दिशादर्शक ठरतात.

निष्कर्ष

संत गाडगेमहाराज हे केवळ संत नव्हते, तर ते एक महान समाजसुधारक आणि मानवतावादी विचारवंत होते. त्यांनी आपल्या कृतीतून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणले. त्यांच्या विचारांमध्ये समता, विवेक, मानवता आणि नैतिकता यांचा प्रभावी संगम दिसून येतो. त्यांनी अंधश्रद्धा, जातिभेद आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध उभारलेला लढा आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यामुळे आधुनिक समाजाने त्यांच्या विचारांचा स्वीकार करून अधिक समताधिष्ठित, विवेकनिष्ठ आणि मानवतावादी समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

संदर्भसूची

१. भगत, रा.तु. (१९९७). *संत गाडगेबाबांचे समाजप्रबोधन.* पुणे : लोकवाङ्मय गृह.

२. दांडेकर, ह.भ.प. (१९७६). *गाडगे महाराज चरित्र.* मुंबई : मौज प्रकाशन

३. तायडे, शंकर (२०१८). *गाडगेबाबांचे सामाजिक कार्य.* नागपूर : विदर्भ प्रकाशन.

४. रसाळे, स.ग. (१९९४). *समाजसुधारक संत गाडगेबाबा.* औरंगाबाद : साकेत प्रकाशन.

५. देखणे, मोहन (१९९७). *संत परंपरा आणि समाजपरिवर्तन.* पुणे : प्रतिमा प्रकाशन.

६. पोतदार, वि.कृ. (१९९८). *भारतीय समाज आणि संत विचार.* मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.

७. पटवर्धन, अ.ना. (१९८६). *महाराष्ट्रातील संतपरंपरा.* पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

A Study on Management Communication Strategies for Engaging the New-Age Consumer in a Digitally Driven Economy

Ms. Foram Jariwala
Professor, P P Savani University

Abstract

The modern consumer is no longer influenced solely by traditional advertising or linear communication channels. In today's hyper-connected, digitally integrated world, consumer behavior and communication patterns are undergoing a rapid transformation driven by technology, social media, and personalized marketing ecosystems. This study explores how digitalization, real-time interaction, and algorithmic communication have redefined consumer expectations, decision-making, and brand engagement. From influencer-led narratives to AI-powered conversational interfaces, businesses are navigating an ecosystem where consumer communication preferences evolve at the speed of a scroll or swipe.

The research investigates the psychological and emotional motivations of the new-age consumer, highlighting the role of digital communication—including social media, chatbots, live commerce, and user-generated content—in shaping purchasing behavior. Furthermore, the paper examines key market trends reflecting this behavioral and communicative shift, such as the rise of experiential buying, ethical consumption, and the increasing demand for authenticity and transparency in brand messaging. Leveraging primary data through structured surveys and secondary data from recent peer-reviewed studies and industry reports, this research decodes emerging communication-behavior patterns and offers strategic insights to marketers, communicators, and digital practitioners. Ultimately, it underscores the importance of agile, data-informed communication strategies in keeping pace with consumers who are more informed, selective, and digitally empowered than ever before.

Keywords: Consumer Behavior, Digital Communication, Digital Economy, Market Trends, E-commerce, Personalization, Social Commerce

1. Introduction

The marketing and communication landscape has undergone a seismic transformation with the widespread adoption of digital technologies. Traditional marketing paradigms, anchored in the 4Ps—Product, Price, Place, and Promotion—have progressively evolved to encompass the 4Es: Experience, Exchange, Everyplace, and Evangelism (Kotler & Keller, 2021). This shift reflects a deeper, more nuanced understanding of consumer engagement in the digital age, where personalized experiences, two-way communication, and value co-creation are not merely preferred but expected.

Communication, as a core component of the consumer journey, has been fundamentally reimagined. Where consumers once received one-directional brand messaging through print, television, or radio, they now engage in multi-channel, multi-modal dialogues with brands through social media platforms, messaging applications, live video commerce, and AI-driven chatbots. This transformation has elevated consumer agency—enabling them to seek, share and co-create information—while simultaneously placing an unprecedented burden on organizations to communicate with speed, authenticity, and contextual relevance.

In the Indian context, and particularly in Maharashtra, this evolution is distinctly observable. The state's economic dynamism—bolstered by sectors including information technology, financial services, entertainment, and manufacturing—provides fertile ground for innovative communication strategies that resonate with a diverse, tech-savvy consumer base. Urban centers such as Mumbai and Pune have emerged as hubs of digital consumer activity, where local influencers, regional content creators and hyperlocal digital platforms significantly shape consumer discourse and decision-making.

Contemporary trends in Maharashtra's marketing and communication landscape include the accelerated adoption of influencer marketing, the integration of AI and data analytics for hyper-personalized messaging, the growth of vernacular digital content, and the emergence of voice search and augmented reality (AR) as experiential communication tools. These trends not only enhance consumer satisfaction and engagement but also contribute to economic growth by stimulating demand and fostering market innovation.

However, structural challenges persist. Digital literacy disparities between urban and semi-urban populations, the uneven reach of high-speed internet infrastructure and varying degrees of consumer trust in digital platforms create a complex communication environment. Addressing these gaps is critical to ensuring inclusive digital growth and to fully realizing the potential of digital communication in shaping new-age consumer behavior.

This study, therefore, seeks to examine the intersection of evolving consumer behavior and digital communication—analyzing how new-age consumers respond to, interact with and are influenced by diverse digital communication strategies in the contemporary marketplace.

2. Literature Review

The growing influence of digital technologies has precipitated a paradigm shift in consumer communication and behavior across global markets. Scholarly discourse over the past several years has explored this transformation from multiple disciplinary lenses, including marketing, psychology, communication studies, and information technology.

Miah (2024), in his research *"Navigating Consumer Behavior in the Digital Age: The Role of Emerging Technologies and Ethical Considerations,"* emphasizes that emerging technologies such as artificial intelligence, machine learning, and data analytics have not only transformed marketing communication practices but have also raised critical ethical questions surrounding data privacy, transparency and consumer autonomy. His findings reveal a duality inherent in digital communication—the need to balance personalization-driven innovation with responsible, consent-based consumer relationships. The study underscores that consumer trust is increasingly contingent on perceived ethical conduct in brand communication.

Mishra (2023), through his work *"Understanding Consumer Behaviour in the Digital Age: A Study of Online Shopping Habits,"* explores how convenience, price transparency, and peer-generated communication—in the form of reviews and ratings—have become primary determinants in consumer decision-making. He highlights that while urban consumers have rapidly adapted to digital communication ecosystems, Tier-II and Tier-III cities in India are catching up at a remarkable pace, driven by increased smartphone penetration, affordable mobile data and the proliferation of regional-language digital content.

Efendioğlu (2024), in his systematic review *"Digital Consumer Behavior,"* aggregates studies from Europe and Asia to identify key patterns in consumer communication preferences: a marked inclination toward mobile-first content consumption, a demand for personalized and interactive communication, and a pronounced aversion to intrusive or irrelevant advertising. He further emphasizes the rise of social commerce—particularly among Gen Z and Millennials—as a communication-driven purchasing phenomenon where peer influence and community narratives drive conversion.

Walia (2024), in the IOSR Journal, complements these perspectives by examining macro consumer trends such as impulse buying behavior driven by influencer communication and the role of digital trust in shaping consumer choices. Her study, *"Consumer Behaviour Trends in the Digital Age,"* reflects the growing impact of ephemeral content formats—such as Instagram Stories and Reels—on consumer attention and purchase intent, illustrating the need for brands to communicate in ways that are both timely and authentic.

A particularly significant contribution is offered by Sun et al. (2024) in *"Live Streaming and Livelihoods: Decoding the Creator Economy's Influence on Consumer Attitude and Digital Behavior."* Their research investigates how live commerce and influencer-led shopping events on platforms such

as YouTube and Instagram are reshaping real-time communication between brands and consumers. The study highlights that digital charisma, interactive communication, and community-building are critical antecedents of consumer trust and purchasing loyalty in the live-streaming economy.

Adding a global bibliometric perspective, Figueiredo et al. (2025) in *"The Role of Digital Marketing in Online Shopping: A Bibliometric Analysis for Decoding Consumer Behavior"* demonstrate the growing academic and practical importance of AI-led product discovery, conversational commerce via chatbots and hyper-personalized communication journeys. Their analysis calls for a deeper understanding of consumer psychology within real-time, algorithm-mediated communication environments.

Supplementary insights from industry sources affirm the rise of hyperlocal marketing communication, augmented reality in digital retail, and the role of gamification in engaging younger consumer segments (IndiaRetailing, 2024; Times of India, 2024). Research on SMEs in Maharashtra further reveals that digital adoption among local businesses is creating new consumer communication touchpoints and reshaping consumption patterns across semi-urban zones (IJARIIE, 2024).

